सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणा संदर्भात महत्त्वाचे शासन आदेश

## सन २०१८ पर्यंत

****

# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## पिण्याच्या पाण्याची टंचाईच्या अनुषंगाने महत्त्वाचे शासन निर्णय व परिपत्रके.

## * अनुक्रमणिका *


| अ. क्र. | शासन निर्णय / परिपत्रक क्रमांक व दिनांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | टंचाई ३०९९ / प्र.क्र.१३ / पापु१४, दि. ०१.०२.१९९९ | पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी हाती घ्यावयाच्या आकस्मिक उपाययोजना. | १ |
| २. | टंचाई ३०९९ / प्र.क्र.१३ / पापु१४, दि. ०३.०२.१९९९ | ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई-परिस्थिती निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत करावयाची कार्यवाही. | ७ |
| ३. | टंचाई २००२ / प्र.क्र.३४५ / पापु१४, दि. २७.११.२००२ | पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रात विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणाऱ्या तातडीच्या योजना / उपाययोजना मंजूर करण्यासाठी स्थायी समिती स्थापन करणेबाबत. | ३५ |
| ४. | टंचाई १००५ / प्र.क्र.३०५ / पापु१४, दि. २४.०१.२००६ | राज्यातील ग्रामीण / नागरी भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ टँकरव्दारे करावयाच्या पाणी पुरवठयाबाबत मार्गदर्शक सूचना. | ३९ |
| ५. | टंचाई १००७ /प्र.क्र.१९७ / पापु१४, दि. २७.०२.२००८ | राज्यातील पाणी टंचाई निर्माण होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना ग्रामस्तरावर राबविण्याबाबत. | ४३ |
| ६. | टंचाई १००८/ प्र.क्र.१६८/ पापु-१४, दि. २४.१०.२००८ | पाणी टंचाई निवारणार्थ टंचाई कृती आराखडे तयार करणे व अंमलबजावणी करण्यासंदर्भात सूचना. | ५१ |
| ७. | टंचाई१००८/ प्र.क्र.१४९ / पापु-१४, दि. २१.०८.२००९ | नागरी क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या तातडीच्या पाणी पुरवठा योजना. | ६९ |
| ८ | टंचाई -१००९ / प्र.क्र.१३१/पापु-१४, दि. २७.०८.२००९ | ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेताना पशुधनास लागणाऱ्या पिण्याच्या पाण्याची गरज विचारात घेण्याबाबत. | ७९ |
| ९ | टंचाई २०१३/प्र.क्र.४१८/पापु-१४, दि. ०४.०१.२०१४ | पिण्याच्या पाण्याच्या खाजगी टँकर्सवर GPS यंत्रणा अनिवार्य करणे बाबत. तसेच टँकरने पाणी पुरवठा करताना घ्यावयाच्या दक्षता बाबत सूचना व खोल विंधन विहिरीच्या भूजल पातळी वाढविणे बाबत सर्वसाधारण सूचना. | ८१ |




रोटा/एच-१२२७[ ३५०-०२-१९]

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | टंचाई २०१६ /प्र.क्र.१४३ / पापु-१४, दि. ०४.०५.२०१६ | नागरी तथा ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई परिस्थिती निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत आर्थिक तथा भौतिक मर्यादा वाढविणे बाबत.<br>➢ **धरणामध्ये अथवा तलावामध्ये चर** खणणे या **उपाययोजनेचा समावेश** करणे.<br>➢ हायड्रन्ट उभारणे या उपाययोजनेस मान्यता.<br>➢ नागरी भागातील टंचाई उपाययोजनांसाठी आवश्यक **लोकवर्गणी** ५ टप्प्यात भरण्याची सवलत.<br>➢ **ग्रामीण भागातील** उपाययोजनेची लोकवर्गणीची अट **शिथिल करण्याबाबत.** | ८३ |
| ११. | टंचाई २०१८ / प्र.क्र.**२०** / **पापु १४**, दि. १४.०२.२०१८ | **राज्यातील ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या** पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शक सूचना.<br>➢ दि. ३१ मार्च नंतर तातडीच्या पाणी पुरवठा योजनांना तसेच नळ योजनांची विशेष दुरुस्ती या उपाययोजनांना क्षेत्रीय स्तरावर मंजूरी देण्यात येऊ नये.<br>➢ गावासाठी टँकर मंजूरीचे प्रस्ताव तहसिलदार, उपविभागीय कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या स्तरावर चार दिवसांपेक्षा जास्त काळ प्रलंबित ठेवू नयेत. | ८९ |
| १२. | टंचाई २०१८ / प्र.क्र.**२०** / **पापु-१४**. दि. २६.१०.२०१८ | **राज्यातील ग्रामीण व** नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या **टंचाई निवारणार्थ** घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत.<br>➢ **जिल्हा स्तरावर** टंचाई परिस्थितीवर मात **करण्यासाठी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकाऱ्याच्या** नियंत्रणाखाली टंचाई **नियंत्रण व समन्वयासाठी** एक स्वतंत्र कक्ष निर्माण **करण्यात यावा.** | ९५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | टंचाई २०१८ /प्र.क्र.१९१ / पापु-१४, दि. २७.११.२०१८ | १. टंचाई अंतर्गत घेण्यात आलेल्या उपाययोजनांसाठी निधी वितरीत करण्याची कार्यपद्धती.<br>२. शासनस्तरावरुन टंचाई अंतर्गत प्राप्त झालेला निधी प्राधान्याने विहिर अधिग्रहणाची देयके अदा करण्यासाठी वितरीत करणे आवश्यक आहे.<br>३. विहिर अधिग्रहणाची देयके एक महिन्याच्या कालावधीत प्रदान होणे आवश्यक आहे.<br>४. टंचाई अंतर्गत उपाययोजनांना शासनस्तरावरुन अथवा क्षेत्रिय स्तरावरुन प्रशासकीय मंजूरी देण्यात येते. तथापि अशा योजनांबाबत काही वाद-विवाद निर्माण झाल्यास अशा प्रकरणी विभागीय आयुक्तांनी निर्णय घ्यावा, असा विभागीय आयुक्तांनी घेतलेला निर्णय अंतिम असेल. | ९९ |
| १४. | एससीवाय-२०१८/प्र.क्र.२४७/म-७ दि.२९.११.२०१८ | टंचाई परिस्थितीत टँकर्सचे अधिकार उप विभागीय अधिकारी यांना प्रदान करणेबाबत. | १०३ |
| १५. | टंचाई २०१८ /प्र.क्र.१६७ /पापु-१४, दि. ३०.११.२०१८ | महाराष्ट्र पिण्याच्या पाणी पुरवठयाचे अधिग्रहण अधिनियम, १९८३ मधील कलम ८ मध्ये १९९२ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार पाणी टंचाईच्या कालावधीमध्ये अधिग्रहीत केलेल्या विहिरीच्या मोबदलयाचे सुधारित दर मंजूर करण्याबाबत.<br>➢ त्यानुसार डिझेल / विद्युत पंपाशिवाय प्रतिदिन रु. ३००/- मध्ये वाढ करुन रु.४५०/- तसेच डिझेल / विद्युत पंपासहीत रु.४००/- मध्ये वाढ करुन रु.६००/- अशी करण्यात आले आहे. | १०५ |
| १६ | एससीवाय- २०१८/प्र.क्र.२४६/म-७ दि. ११.१२.२०१८ | राज्यातील दुष्काळी भागातील ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनांची थकीत विद्युत देयकांची रक्कम टंचाई निधीतून देण्याबाबत.<br>➢ राज्यातील दुष्काळ घोषित भागातील नळपाणी पुरवठा योजनांची थकित विद्युत देयकांची ५ % रक्कम टंचाई निधीमधून भरुन योजना पुन्हा सुरु करणे. | १०९ |

<table>
<tr>
<td>१७.</td>
<td>टंचाई २०१८/प्र.क्र.२०६/पापु-१४,<br>दि. १९.१२.२०१८</td>
<td>पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणाऱ्या उपाययोजना राबविण्यासाठी आवश्यक असणारा निविदा प्रक्रिया कालावधी शिथिल करणे, डिझेलच्या जनरेटरचा खर्च आणि टँकर्स भरल्यामुळे नळ योजनेसाठी लागणाऱ्या वाढीव विद्युत देयकाची रक्कम टंचाई अंतर्गत मंजूर करणेबाबत.<br><br>➢ विहिर, तलाव उद्भवावरुन टँकर भरण्यासाठी डिझेल जनरेटरच्या भाडयाचा तसेच डिझेलचा खर्च टचाई निधीतून देण्यात यावा.<br>➢ टंचाई अंतर्गत उपाययोजनांसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यास निविदाचा कालावधी कमी करण्यात आला आहे.<br>➢ टंचाईग्रस्त गावांना पाणी पुरवठयासाठी अन्य गावाच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या विहिरीतून पिण्याच्या पाण्याचे टँकर्स भरले जातात, अशा प्रकरणी वाढीव विद्युत देयक टंचाई निधीमधून देण्यास मान्यता देण्यात आली.</td>
<td>१११</td>
</tr>
<tr>
<td>१८.</td>
<td>टंचाई २०१८/प्र.क्र.१६७/पापु-१४,<br>दि. १९.१२.२०१८</td>
<td>पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा करण्यासाठी भाडयाने घेण्यात येणा-या खाजगी टँकर्स व ट्रक्सच्या दराबाबत.<br><br>टँकर्सच्या दरात खालीलप्रमाणे वाढ करण्यात आली.
<table>
<tr><td rowspan="3">दराबाबत तपशिल</td><td colspan="4">वाहनाचा १ मेट्रीक टन चे दर</td></tr>
<tr><td colspan="2">दुर्गम व अतिदुर्गम भागासाठी</td><td colspan="2">सर्वसाधारण भागात</td></tr>
<tr><td>प्रतिदिन भाडे</td><td>प्रति कि.मि.</td><td>प्रतिदिन भाडे</td><td>प्रति कि.मि.</td></tr>
<tr><td>जुने शासकीय दर (रु.)</td><td>१९८</td><td>२.५०</td><td>१५८</td><td>२.००</td></tr>
<tr><td>सुधारीत शासकीय दर (रु.)</td><td>३३८</td><td>४.३०</td><td>२७०</td><td>३.४०</td></tr>
</table>
</td>
<td>११५</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | टंचाई २०१८/प्र.क्र.२१४/पापु-१४, दि. २७.१२.२०१८ | पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या अनुषंगाने घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी निविदा स्विकृतीचे अधिकार देण्याबाबत.<br>➢ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तसेच जिल्हा परीषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या पाणी टंचाई उपाययोजनांसाठी काढण्यात येणाऱ्या निविदांबाबत निविदा स्वीकृतीच्या अधिकारात सुधारणा करुन विविध अधिकाऱ्यांना जास्त अधिकार देण्यात आले आहे. | ११९ |
| २० | टंचाई २०१८/प्र.क्र.२१४/पापु-१४, दि. २७.१२.२०१८ | पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या अनुषंगाने घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी निधी वितरणाच्या कार्यपध्दतीबाबत.<br>➢ टंचाई अंतर्गत निधी वितरीत करण्याच्या पध्दतीत सुधारणा करण्यात आली असून पाणी पुरवठा विभागाकडून विभागीय आयुक्तांकडे व विभागीय आयुक्तांकडून जिल्हापरिषदेकडे तसेच मजीप्रा कडे प्रदान करण्यात येणारा निधी पाणी पुरवठा विभागाकडून थेट मजीप्रास वितरीत करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. | १२३ |
| **अधिनियम .** | | | |
| १. | सन १९८३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०<br>महाराष्ट्र पिण्याच्या पाणी पुरवठ्याचे अधिग्रहण करण्याबाबत अधिनियम, १९८३<br>(दिनांक ६ जुले, २००६ पर्यंत सुधारित) | टंचाईच्या काळात कोणत्याही विहिरीमधून, तलावातून आणि जलाशयातून पिण्याकरिता पाणीपुरवठ्याचे अधिग्रहण करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम. | १२७ |

**********

**पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी हाती घ्यावयाच्या आकस्मिक उपाययोजना.**

## महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रं. टंचाई-३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४.
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक :- १ फेब्रुवारी, १९९९.

संदर्भः-(१) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांकःएसडीडब्ल्यू- १३८०/१४२३१७/म-७, दि. १२/९/१९८०.

(२) दुरुस्तीपत्रक महसूल व वन विभाग क्रमांकःएसडीडब्ल्यू-१३८९/प्र.क्र.१३८/म-७, दि.१/१२/१९९३.

(३) शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांकःएसडीडब्ल्यू-१३८८/प्र.क्र.११४/म-७ दि.१४/२/१९९५.

(४) शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांकःएसडीडब्ल्यू-१३८८/प्र.क्र.११४/म-७ दि. ७/४/१९९५.

(५) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांकःएसडीडब्ल्यू- १३९५/प्र.क्र.५२/म-७, दि. १९/४/१९९५.

(६) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांकःएसडीडब्ल्यू- १३९५/प्र.क्र.१०५/म-७ दि. १३/२/१९९६.

(७) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांकःटंचाई-१०९२/ सिआर-३०८५/ ४३, दि. १८.२.९२.

(८) शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्रमांकःटंचाई-१०९५/सिआर-१३५/४३, दि. ६ एप्रिल १९९५.

(९) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांकःएसडीडब्ल्यू-३३९४/प्र.क्र.-३४०/म-७, दि. १२ मे १९९५.

(१०) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकःएसडीडब्ल्यू-३०९७/ प्र.क्र.९९/म-७, दि. २ जून १९९८

(११) शासन परिपत्रक पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकःएसडीडब्ल्यू -१०९७/ प्र.क्र.६६/म-७, दि. ४ जून १९९७.

**प्रस्तावना :-**

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या आकस्मिक योजनांच्या संदर्भात, उपरोक्त संदर्भाधीन आदेशान्वये, आवश्यक त्या सूचना निर्गमित केल्या आहेत. वरील सर्व सूचना विचारात घेऊन, एकत्रित आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

वर प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार संदर्भात नमूद केलेले विविध आदेश अधिक्रमीत करुन शासन आता खालीलप्रमाणे एकत्रित आदेश निर्गमित करीत आहे.

१. ज्यां गावांत/वाडयांत (क वर्गीय नागरी क्षेत्रासह) पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई (दर दिवशी २० लिटर्स प्रती डोई यापेक्षा कमी पाणी पुरवठा होत असेल), निर्माण होईल व जेथे दीड कि लोमीटरच्या परिसरात पाण्याचा उद्‌भव नसेल तेथे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी खाली नमूद केलेल्या भाग (एक) व भाग (दोन) मध्ये दर्शविलेल्या आकस्मिक पाणी पुरवठा योजना, प्राथम्यानुसार घेण्यास जिल्हाधिका-यांना परवानगी देण्यात येत आहे.

## भाग (एक):- आकस्मिक उपाययोजना.

(अ) अस्तित्वात असलेल्या विहिरी खोल करणे, खोदणे आणि पुनर्जिवित करणे,
(ब) जुन्या विहिरींची दुरुस्ती करणे.
(क) अस्तित्वात असलेल्या सामुदायिक विहिरी खोल करणे व दुरुस्त करणे.
(ड) नदी नाल्याच्या पात्रात बुडक्या खोदणे.
(ई) अत्यावश्यक असेल त्या ठिकाणी खाजगी विहिरी अधिग्रहीत करणे.

## भाग (दोन):- आकस्मिक उपाययोजना.

उपरोक्त भाग (एक) मधील उपाययोजनांद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे शक्य नसल्यास, टॅंकर/बैलगाडीद्वारे पाणी पुरवठा करणे.

२. उपरोक्त भाग (एक) आकस्मिक उपाययोजनांतील (अ) (ब) (क) आणि (ड) येथील उपाययोजनांना मंजूरी देण्याची वित्तीय मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उपाययोजना | जिल्हाधिका-यांचे अधिकार रुपये | विभागीय आयुक्तांचे अधिकार रुपये |
|---|---|---|---|
| १) | अस्तित्वात असलेल्या विहिरी खोल करणे, खोदणे आणि पुनर्जिवीत करणे | १२,०००/-पर्यंत | १५,०००/- पर्यंत |
| २) | जुन्या विहिरींची दुरुस्ती करणे | २,०००/- पर्यंत | ५,०००/-पर्यंत |
| ३) | अस्तित्वात असलेल्या सामुहिक विहिरी दुरुस्त करणे. | ५,०००/-पर्यंत | १०,०००/-पर्यंत |
| ४) | नदीच्या पात्रात बुडकी घेणे | १०,०००/- पर्यंत | ——— |

प्रस्तुत आदेशानुसार अस्तित्वात असलेल्या ज्या खाजगी विहिरींच्या बाबत, खोल करणे, खोदणे अथवा पुनर्जिवित करणे या उपाययोजना घेण्यात येतील अशा खाजगी विहिरींच्या प्रकरणी, आवश्यकतेनुसार त्या विहिरी अधिग्रहीत करण्याचे शासनाचे अधिकार जिल्हाधिका-यानी संबंधीत विहिर मालकांकडून लेखी स्वरुपात निश्चित करुन घ्यावेत.

उपरोक्त कामे मंजूर करतांना ती निविदा मागऊनच व त्यातील कमी खर्चाची निविदा स्विकारुन मंजूर करावीत तसेच निविदांना स्थानिक वृत्तपत्रातून /प्रसिध्दी माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

विहिरी खोल करण्याची कामे घेतांना, विहिरी खोल केल्यानंतर पाणी लागेल, याची निश्चित खात्री करुन घ्यावी.

३. आकस्मिक उपाययोजनेअंतर्गत, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी अत्यावश्यक असेल त्या ठिकाणी, खाजगी विहिरींचे अधीग्रहण करुन प्रश्न सोडविता येईल. "महाराष्ट्र पिण्याच्या पाणीपुरवठयाचे अधिग्रहण अधिनियम १९८३" अन्वये, लेखी आदेश काढून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी खाजगी विहिरींचे अधिग्रहण करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी वेळोवेळी प्राधिकृत करतील अशा अधिका-यांस देण्यात आलेले आहेत. या अधिनियमातील तरतुदीनुसार, तसेच अधिनियमास सुचविलेल्या दुरुस्ती अधिनियम १९९२ मधील तरतूदीनुसार अधिग्रहीत विहिरींच्या मालकाला दयावयाच्या अधिग्रहण मोबदल्याबाबत शासनाकडून वेळोवळी दिल्या जाणा-या सूचना व निश्चित करण्यात येईल अशा दराने अधिग्रहण मोबदला देण्याबाबत कार्यवाही करावी.

सद्या अधिग्रहण मोबदला खालील दराने देण्यात यावा.

अ) उक्त अधिनियमातील कलम ८ (अ) नुसार रु. १००/- प्रतिदिन या समान दराने अधिग्रहण मोबदला देण्यात यावा.

**किंवा**

ब) उक्त अधिनियमातील कलम ८ (ब) नुसार विहिर मालकाने पाणी उपसण्यासाठी साधनसामग्री उपलब्ध करुन दिलेली नसल्यास प्रति माणशी १५० लि. पाण्यासाठी ५० पेसे व विहिर मालकाने पाणी उपसण्याससाठी साधनसामुग्री उपलब्ध करुन दिल्यास प्रति माणशी १५० लि. पाण्यासाठी रु. १/- या दराने अधिग्रहण मोबदला देण्यात यावा.

४. उपरोक्त परिच्छेद १ मध्ये नमूद केल्यानुसार, जेव्हा पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ भाग १ मधील आकस्मिक उपाययोजना घेणे शक्य होणार नाही. अशाच ठिकाणी जनतेस टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात यावा. टँकरने पाणी पुरवठा करणे ही अत्यंत खर्चीक बाब असल्याने शंक्यतो शासकीय टँकरचा/वाहनांचाच उपयोग करण्यात यावा, जेव्हा शासकिय टँकर/वाहने अपुरे पडतील अशा वेळीच खाजगी टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यास जिल्हाधिका-यांनी मंजूरी द्यावी.

५. ज्या गावात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा टँकर/बैलगाडीने करणे आवश्यक वाटेल, त्या गावांची संयुक्त पहाणी करण्यासाठी जिल्हाधिका-यांनी खालीलप्रमाणे समिती गठीत करावी.

| | | |
|---|---|---|
| १. | संबंधीत आमदार :- | अध्यक्ष |
| २. | उपजिल्हाधिकारी (जिल्हाधिका-यांनी नियुक्त करावयाचे आहेत.):- | सदस्य |
| ३. | गटविकास अधिकारी :- | सदस्य |
| ४. | तहसिलदार :- | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीने टँकर/बैलगाडीद्वारे पाणी पुरवठा करणे आवश्यक असल्याचा दाखला दिल्यानंतरच जिल्हाधिकारी संबंधीत गावाला तशाप्रकारे पाणी पुरवठा करण्यासंबंधी आदेश देतील.

६. टँकरने पाणी पुरवठा करतांना शक्यतो शासकीय टँकरचा वापर करावयाचा आहे. तथापि जिल्हयात शासकिय टँकरची कमतरता भासून, खाजगी टँकर लावणे आवश्यक झाले तर खाजगी टँकर भाडयाने घेण्यासाठी जिल्हाधिका-यांनी निविदा मागवाव्यात व कमीत कमी दराची निविदा स्विकारावी, मात्र हे दर शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या दरापेक्षा जास्त नसावेत.

अ) सद्या दि. १ जून १९९८ पासून खाजगी टँकर्सना दयावयाचे दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत.

| टँकरची क्षमता | प्रति दिन भाडे रू. | प्रति कि.मी.भाडे रू. |
|---|---|---|
| ७.५ मे.टन | ७२०.०० | ४.४३ |
| १० मे.टन | ९६०.०० | ६.३१ |
| १२ मे. टन | ११५२.०० | ७.५७ |

वर विहित केलेल्या क्षमतेचे टँकर्स उपलब्ध न झाल्यास तसेच खाजगी ट्रकवर टाकी ठेऊन त्याचे रुपांतर टँकरमध्ये केल्यास प्रत्येक ट्रकची पाणी वाहण्याची क्षमता व तो ट्रक प्रत्यक्षात किती पाणी वाहतो हे लक्षात घेऊन वर निश्चित केलेल्या दरांच्या प्रमाणात खाजगी ट्रकला भाडे देण्यात यावे.

ब) १ एप्रिल ते ३० जून या कालावधीकरिता ज्या बैलगाडया पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी भाडयाने घेण्यात येतील त्यांना प्रतिदिनी जास्तीत जास्त रु. ९०/- इतका दर देण्यात यावा.

७. टँकरने/बैलगाडीने पाणी पुरवठा करण्याची उपाययोजना ग्रामीण भागास तसेच 'क' वर्गीय नागरीक्षेत्रास अनुज्ञेय आहे. तथापि ज्या नगर परिषदांना स्वखर्चाने टँकर/बैलगाडीद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करता येत नसेल अशा 'ब' वर्ग नगरपरिषदांच्या क्षेत्रात शासकिय खर्चाने टँकर/बैलगाडीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात यावा. या नगरपरिषदा निश्चित करतांना संबंधीत नगरपरिषदांची अंदाजपत्रके जेव्हा जिल्हाधिका-यांकडे मंजूरीसाठी येतात तेव्हा संबधीत नगरपरिषदांनी, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी आवश्यक ती धनराशी उपलब्ध करुन दिलेली आहे, आणि सदरहू धनराशीपेक्षा जास्त धनराशी उपलब्ध करुन देणे सदर नगरपरिषदेस शक्य होणार नाही, याची जिल्हाधिका-यांनी खात्री करुन घ्यावी व खालील अटीच्या अधीन राहून सदर नगरपरिषदेस टँकरने/बैलगाडीने पाणी पुरवठा करण्यात यावा.

अ) संबंधीत नगर परिषदेचे क्षेत्र हे संबंधीत जिल्हाधिका-यांनी टंचाईग्रस्त म्हणून घोषित केले आहे.

ब) संबंधीत 'ब' वर्ग नगरपरिषदेला टँकर/बैलगाडीद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी संबंधित जिल्हाधिका-यांची परवानगी घेण्यात यावी. ही परवानगी देतांना, "संबंधीत नगर परिषदेने आवश्यक ती धनराशी, पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी उपलब्ध करून दिली असून, यापेक्षा जास्त धनराशी सदरहू नगरपरिषद या कारणासाठी उपलब्ध करुन देऊ शकणार नाही," असा दाखला देणे आवश्यक राहील.

क) एका वित्तिय वर्षात एका 'ब' वर्ग नगरपरिषदेला जास्तीत जास्त रु. १२.०० लक्ष इतका खर्च, टँकर/बैलगाडीद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी आवश्यक तिथे मंजूर करता येईल.

८. आकस्मिकता योजना भाग (१) व भाग (२) वर होणा-या खर्चासाठी जिल्हाधिका-यांना, विभागीय आयुक्तांमार्फत लेखाशिर्ष, " २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय-०१--पिण्याच्या पाण्याचा पुरवठा (एक) निकडीच्या पाणी पुरवठा योजना-८२२४५००९३" अतंर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रु.न.देशमुख)
उप सचिव , महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) विभागीय आयुक्त, (सर्व)
२) सदस्य सचिव ,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
३) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
४) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, (सर्व)
५) जिल्हाधिकारी, (सर्व).
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
७) जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, (सर्व)
८) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, (सर्व)
९) विभागीय उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व).
१०) जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व).
११) कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) जिल्हा परिषद (सर्व).
१२) महालेखापाल , महाराष्ट्र -१ (मुंबई लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१३) महालेखापाल , महाराष्ट्र -२ (नागपूर लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१४) जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
१५) मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधि लेखा, मुंबई.
१६) वित्त विभाग, मंत्रालय मुंबई
१७) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागतील सर्व पर्यवेक्षिय अधिकारी,व कार्यासन अधिकारी.
२०) निवडनस्ती, पापु -१४

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची
टंचाई-परिस्थिती निवारणार्थ घ्यावयाच्या
उपाययोजनांबाबत करावयाची कार्यवाही.

**महाराष्ट्र शासन**
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकःटंचाई-१०९९/प्र.क्र.१२/पापु-१४,
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांकः- ३ फेब्रुवारी, १९९९.

संदर्भ:- शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांकःटंचाई-१०९४/प्र.क्र.८५/४३ दिनांकः- ८.४.१९९४.

**प्रस्तावना**

राज्यातील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याच्या कामास गती देण्याच्या दृष्टीने, "पाणी पुरवठा व स्वच्छता" या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे. दरवर्षी अपु-या पर्जन्यामुळे किंवा अन्य कारणामुळे, राज्यात ग्रामीण क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास, त्याबाबत करावयाच्या उपाययोजना वर संदर्भात नमूद केलेल्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णयानुसार घेण्यात येतात. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत कोणताही संभ्रम निर्माण होऊ नये म्हणून या विभागाकडून स्वतंत्र सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

वर प्रस्तावनेत स्पष्ट केल्याप्रमाणे ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भात नमूद केलेले आदेश अधिक्रमित करुन शासन आता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

(I) प्रत्येक जिल्ह्यात दर वर्षी पावसाळा संपल्यानंतर जिल्ह्याच्या वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी त्यांच्या सहाय्यक भूवैज्ञानिकांच्या मदतीने खालील बाबींचा अभ्यास करुन पुढील उन्हाळ्यात जिल्ह्यातील पाणी टंचाई भासण्याची शक्यता असणा-या गावांची/वाड्यांची तालुकानिहाय यादी तयार करावी.

१) संबंधित भागातील सरासरी वार्षिक पर्जन्यमान .
२) चालू पावसाळ्यात पर्जन्यमानातील फरक.
३) संबंधित भागातील निरिक्षण विहिरींच्या माहितीवरुन भूजलाच्या पातळीमध्ये आढळलेला फरक.
४) संबंधित गावांच्या/वाड्यांच्या १.५ कि.मी.च्या परिसरातील सार्वजनिक उद्भवातून दरडोई दरदिवशी २० लिटर्सपेक्षा कमी पाणी उपलब्ध होण्याची शक्यता.

सदरहू यादी तयार करतांना संबंधित गावांत/वाड्यांत उपलब्ध असलेली पाणी पुरवठ्याची सर्व साधने व त्यांची सद्यस्थिती याबाबतची तपशिलवार माहिती सोबतच्या प्रपत्र (अ) व (ब) मध्ये भरण्यात यावी. सदर यादी व माहिती तयार केल्यानंतर ती संबंधित

तहसिलदार व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या संयुक्त अहवालासह जिल्हाधिका-यांकडे पाठवावी. जिल्हाधिका-यांनी त्यावर खालील वर्गीकरणाप्रमाणे कार्यवाही करावी :-

(अ) ज्या गावांत/वाडयांत जिवंत उद्भव असलेली सार्वजनिक पाणी पुरवठयाची साधने आहेत व सहायक भूवैज्ञानिकांच्या अहवालानुसार चालू वर्षाच्या उर्वरित काळात किंवा पुढील उन्हाळयात सदर सार्वजनिक उद्भवातील पिण्याच्या पाण्याच्या प्रमाणावर विपरित परिणाम होण्याची व पर्यायाने पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता आहे, तेथे जिल्हाधिका-यांनी महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम, १९९३ च्या कलम ४ अन्वये पिण्याच्या पाण्याची टंचाई जाहीर करण्याबाबत विचार करावा. ज्या गावांत/वाडयांत वरीलप्रमाणे पिण्याच्या पाण्याची टंचाई जाहीर करण्यात येईल अशा ठिकाणी जिल्हाधिका-यांनी सर्वप्रथम सार्वजनिक उद्भवातील पाण्यावर संभाव्य दुष्परिणाम थांबविण्याच्या दृष्टीने सदर अधिनियमातील कलम ५ अंतर्गत, प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी. ही उपाययोजना करुनही संबंधित गावांत/वाडयांत पाण्याची टंचाई भासल्यास, म्हणजेच दरडोई दरदिवशी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता २० लिटर्स पेक्षा कमी झाल्यास, जिल्हाधिकारी यांना या शासन निर्णयातील पुढील सूचनांप्रमाणे तेथे उपयुक्त टंचाई निवारक उपाययोजना घेण्याचे अधिकार राहतील.

(ब) ज्या गावांत/वाडयांत सद्यस्थितीत कोणतेही पाणी पुरवठयाचे उद्भव नाहीत किंवा अस्तित्वात असलेला उद्भव जैविक/रासायनिकदृष्टया प्रदुषित आहे, अशी गावे राजीव गांधी पेयजल अभियानांतर्गत सर्वेक्षणात "सार्वजनिक उद्भव नसलेल्या गावांच्या/वाडयांच्या संवर्गात" किंवा "जैविक/रासायनिकदृष्टया प्रदूषित पाणी पुरवठा होत असलेल्या गावांच्या/वाडयांच्या संवर्गात" देखील मोडतील, अशी अपेक्षा आहे. अशा गावे/वाडया प्रचलित आदेशानुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत सर्वोच्च अग्रक्रमाने योजनांतर्गत तरतुदीतून उपयुक्त नियमित पाणी पुरवठा योजना घेण्यास पात्र असतात. अशा गावांचा/वाडयांचा समावेश संभाव्य टंचाईच्या गावांच्या/वाडयांच्या यादीत असल्यास तेथे पाणी टंचाई सुरु होण्यापूर्वीच नियमित ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाखालील योजनांतर्गत तरतुदीतून निधीच्या उपलब्धतेनूसार साधी विहीर, विंधण विहिरी किंवा नळ पाणी पुरवठा योजना यापैकी किमान खर्चाची योजना सर्वोच्च अग्रक्रमाने राबविण्यासाठी प्रयत्न करावेत. तसे शक्य नसल्यासच अशा गावांत/वाडयांत पुढील सूचनांना अनुसरुन तातडीच्या आणि उपयुक्त टंचाई निवारक उपाययोजना घेण्यास जिल्हाधिका-यांना मुभा राहिल.

(II) वरीलप्रमाणे पाणी टंचाई भासण्याची शक्यता असणा-या गावे/वाडयां निश्चित झाल्यानंतर एकंदरीत सदर पाणी टंचाई ज्या कालावधीत भासणार आहे, त्या संपूर्ण कालावधीसाठी पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारण करण्याकरिता आपल्या जिल्हयाचे टंचाई कृती आराखडे संबंधित जिल्हाधिका-यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याशी विचारविनिमय करुन या शासन निर्णयातील पुढील सूचनांना अनुसरुन (१) ऑक्टोबर ते डिसेंबर (२) जानेवारी ते मार्च आणि (३) एप्रिल ते जून, अशा तीन स्वतंत्र भागात तयार करावेत व आराखडयातील प्रस्तावयाच्या कामांकरीता आवश्यक अनुदानाचे नियोजन आर्थिक वर्षनिहाय करण्यात यावे. संबंधित टंचाईग्रस्त गावे/वाडयांसाठी टंचाई निवारणाकरीता खालील अनुज्ञेय उपाययोजनांपैकी योग्य

त्या उपाययोजनांची निवड करण्याची कार्यवाही वरील तीनही अधिका-यांशी विचारविनिमय करून व प्रपत्र (अ) व (ब) मधील माहितीचा विचार करून करण्याची आहे:-

१) बुडक्या घेणे.
२) विहिरी खोल करणे/विहिरीतील गाळ काढणे.
३) खाजगी विहिरींचे अधिग्रहण करणे.
४) टँकर/बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा करणे.
५) प्रगतीपथावरील पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करणे.
६) नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे.
७) विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे.
८) विंधण विहिरी घेणे.
९) तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे.

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणासाठी करावयाच्या तातडीच्या उपाययोजना ठरविताना त्यासाठी होणारा खर्च, त्याचा भविष्यात होणारा फायदा, तसेच त्या उपाययोजना कार्यान्वित करण्यासाठी लागणारा वेळ या बाबींचा प्राधान्याने विचार करण्यात यावा. टंचाई निवारण उपाययोजनेची निवड करतांना ती उपलब्ध माहिती, तोंड द्यावयाचा एकुण टंचाई कालावधी व स्थानिक परिस्थितीचा विचार करता, किमान खर्चाची असावी याची दक्षता घेण्यात यावी. याप्रमाणे तयार केलेल्या टंचाई कृती आराखड्याच्या कार्यान्वयनाचे संनियंत्रण जिल्हाधिका-यांकडे राहील.

(III) वरील परिच्छेद क्रमांक (II) मध्ये नमूद केलेल्या टंचाई निवारण उपाययोजनांपैकी प्रथम चार आकस्मिक उपाययोजना म्हणजे टँकर/बैलगाडीद्वारे पाणी पुरवठा करणे, बुडक्या घेणे, विहिरी खोल करणे/गाळ काढणे खाजगी विहिरींचे अधिग्रहण करणे याबाबत या विभागाच्या शासन निर्णय क्रमांक:टंचाई-३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४ दिनांक १.०२.९९ अन्वये निर्गमित केलेल्या स्वतंत्र आदेश प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

क्रमांक ५ ते ९ येथील उपायायोजनांबाबत शासन खालीलप्रमाणे स्थायी आदेश देत आहे :-

## (१) प्रगतीपथावरील पाणीपुरवठा योजना गतिमान करून पाणीपुरवठा सुरू करणे :-

पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेल्या अथवा संभाव्य असलेल्या गावात/वाड्यात पूर्वी हाती घेण्यात आलेली नळ योजनांची/साध्या विहिरींची कामे प्रगतीपथावर असल्यास, ती कामे संबंधित कार्यक्रमांतर्गत मंजूर निधीचा सर्वोच्च प्राधान्याने विनियोग करून गतिमान करून अशा योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात याव्यात, जेणकरून, ग्रामीण जनतेस त्यातून पिण्याचे पाणी उपलब्ध करून देता येईल व पाणी टंचाईवर मात करता येईल. शासन या संदर्भात असे आदेश देत आहे की, उपलब्ध योजनांतर्गत तरतूदींचा सर्वोच्च प्राधान्याने विनियोग संभाव्य टंचाईच्या गावांतील/वाड्यांतील प्रगतीपथावरील पाणीपुरवठा योजनांवर करण्यात यावा जेणेकरून, उपलब्ध योजने अंतर्गत निधीचा अधिकाधिक उपयोग टंचाईवर मात करण्याच्या दृष्टीने होऊ शकेल.

## (२) नळ पाणीपुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती करणे:-

(i) नळ योजनांच्या विशेष दुरुस्ती या सदरी नळ योजनांतील पंपिंग मशिनरी फार जुनी झाल्यामुळे नविन पंपिंग मशिनरी बसविणे, जुने झालेले पाईप बदलणे, पाणी साठवण टाकीची मोठी गळती दुरुस्त करणे, उन्हाळ्यात उद्भवाचे पाणी कमी झाल्यास, उद्भवाची खोली वाढविणे/इनवेल (उभे/आडवे) बोअर करुन उद्भवातील पाण्याचे प्रमाण वाढविणे, नळ कोंडाळ्यांची दुरुस्ती करणे इ. कामे मोडतील .

(ii) शासनाने शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक ग्रापापु-१०९३/सीआर-८३१/३९-अ, दिनांक ११ जानेवारी १९९४ अन्वये जिल्ह्यातील सर्व पूर्ण व क्रियान्वित पाणीपुरवठा साधनांचे नियमित सर्वेक्षण करण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत. सदर सर्वेक्षण दरवर्षी सर्वसाधारणपणे ऑक्टोबर महिन्यात करावयाचे असून सदर सर्वेक्षणातील माहितीच्या आधारावर तसेच प्रपत्र (अ) व (ब) मधील माहितीचा विचार करता टंचाई कृती आराखड्यात समाविष्ट कोणकोणत्या गावांत/वाड्यांत अस्तित्वात असलेल्या नळ योजनांची दुरुस्ती करुन पाणी पुरवठा चालू करुन संभाव्य टंचाईस तोंड देता येईल हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याशी विचारविनिमय करुन ठरवावे.

(iii) त्यानंतर ज्या गावांत/वाड्यांत नळ योजनांची विशेष दुरुस्ती करुन संभाव्य टंचाईस तोंड देण्याचे प्रस्तावित असेल अशा गावांत/वाड्यांत सदरील विशेष दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून घेता येईल किंवा कसे हे प्रथम पडताळून पहाण्यात यावे. जी कामे हाती घेण्यासाठी जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीस रक्कम उपलब्ध असेल ती कामे शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक:ग्रापापु-१०९३/सीआर-६११/३९-अ, दिनांक १८ ऑक्टोबर १९९३ च्या परिशिष्ट (६) मधील सूचनांनुसार जिल्हा परिषदे अंतर्गत सक्षम प्राधिका-यांच्या मंजूरीने जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून घ्यावीत. जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून जेवढ्या नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे शक्य आहे, याचे नियोजन वरीलप्रमाणे केल्यानंतर टंचाई कृती आराखड्यातील इतर नळ योजनांची विशेष दुरुस्ती याबाबतचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे सोबतच्या प्रपत्र (क) मध्ये वाढविलेल्या प्रमाणपत्रासह प्रशासकिय मंजूरीसाठी पाठवावेत. जिल्हाधिका-यांनी सदर कामे जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून घेणे शक्य नाही याची खात्री पटवून घेतल्यानंतर अशा दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांन्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करावी. अथवा प्रस्ताव मान्यतेसाठी विभागीय आयुक्तांना सादर करावेत.:-

(अ) रु. ५ लाख खर्चापर्यंतच्या विशेष दुरुस्त्या- जिल्हाधिकारी.

(ब) रु. ५ लाखापेक्षा अधिक किमतीच्या विशेष दुरुस्त्या (अमर्यादित)- विभागीय आयुक्त.

(iv) नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीचे प्रस्ताव मंजुर करतांना प्रस्तावासोबत खालील मुद्यांची पूर्तता झालेली आहे किंवा कसे याकडे संबंधितांनी कटाक्षाने लक्ष द्यावे :-

(अ) संबंधित उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उप विभाग यांनी स्वतः निरिक्षण करुन द्यावयाचा साईट निरिक्षण अहवाल.

(ब) विशेष दुरुस्तीची सविस्तर अंदाजपत्रके (विशेष दुरुस्तीवरील प्रस्तावित खर्च वाजवी आहे किंवा कसे याबाबतची खात्री अंदाजपत्रकाची पडताळणी करुन करणे आवश्यक आहे.)

(क) विशेष दुरुस्ती कोणत्या परिस्थितीमुळे उद्भवली त्याची कारणमिमांसा उदा. योजनेच्या कामांच्या अंमलबजावणीमध्ये उणीवा होत्या किंवा कसे, योजनेच्या व्यवस्थापनेत हलगर्जीपणा इत्यादी.

(ड) जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून सदर विशेष दुरुस्तीचा खर्च करता येईल किंवा कसे याबाबत सदर निधीतील शिल्लक रकमेच्या तपशिलासह सुस्पष्ट अभिप्राय ( जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून विशेष दुरुस्तीचे काम हाती घेणे शक्य नसल्यास याबाबतची कारणमिमांसा व प्रपत्र (क) मध्ये दर्शविल्यानुसार प्रमाणपत्र).

(v). नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीची कामे हाताळण्याची कार्यपध्दती सोबतच्या प्रपत्र (ड) मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

(vi) ज्या नळ योजनांच्या विशेष दुरुस्त्या जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून करणे शक्य नाही अशा विशेष दुरुस्तीच्या कामावरील संभाव्य खर्चाचा संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेऊन आवश्यक निधीबाबतची यंत्रणानिहाय मागणी सोबतच्या निधी मागणी प्रपत्र-I मध्ये शासनाकडे सत्वर पाठवावी. विशेष दुरुस्ती अभावी पाणी टंचाईस तोंड देण्यासाठी इतर महाग उपाययोजना घ्याव्या लागणार नाहीत हे कटाक्षाने पहाण्यात यावे.

(३) विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती :-

(i) विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती या संज्ञेमध्ये ज्या बाबींचा समावेश होतो, त्यात पाईप लाईन बदलणे, पाईप वाढविणे, गाळ काढणे (फ्लशिंग), तुटलेले प्लॅटफॉर्म दुरुस्त करणे, विद्युत पंपबदलणे/दुरुस्ती करणे या सर्व बाबींचा समावेश होतो.

(ii) ज्या गावात/वाडयांत विंधण विहिरी अशा मोठया दुरुस्तीअभावी बंद पडल्यामुळे टंचाई भासत असेल आणि त्यांची विशेष दुरुस्ती केल्यास, संबंधित गावांत/वाडयांत सुरक्षितपणे पाणी पुरवठा करणे शक्य असेल अशा विंधण विहिरींची विशेष दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदेच्या देखभाल व दुरुस्ती पथकाकडून उप अभियंता (यांत्रिकी), भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जिल्हा परिषद यांच्या मार्गदर्शनाखाली विनाविलंब करुन घेण्यात यावी.

(iii) विंधण विहिरींची विशेष दुरुस्तीवरील खर्च प्रथम जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नाच्या अंदाजपत्रकातील त्रिस्तरिय योजनेअंतर्गत विंधण विहिरींच्या विशेष दुरुस्तीसाठी नियमितपणे केलेल्या तरतुदीतून करावा. सदर निधी अपुरा पडल्यास, मुख्य

कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी विंधण विहिरींच्या विशेष दुरुस्तीसाठी जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून खर्च करावा. त्या उपरही निधी आवश्यक असल्यास, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून जिल्हाधिका-यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या योजनेतर तरतुदीतून आवश्यकतेनुसार निधी अशा विंधण विहिरींची विशेष दुरुस्तीसाठी उपलब्ध करून देण्याकरीता जिल्हाधिका-यांकडे प्रस्ताव प्रपत्र (ई) मधील प्रमाणपत्रासह पाठवावा. जिल्हाधिका-यांनी असा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावात अंतर्भूत विशेष दुरुस्तीची कामे टंचाई आराखड्यात समाविष्ट असल्याची खात्री करून त्या कामांसाठी जिल्हा परिषदेच्या स्तरावर निधी उपलब्ध करून देणे शक्य नाही, याची आधी पडताळणी करावी व त्यानंतर आवश्यकतेनुसार योजनेतर निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना वितरीत करावा. टंचाई कृती आराखड्यात समाविष्ट गावांत/वाड्यांत विंधण विहिरींच्या विशेष दुरुस्तीसाठी जिल्हाधिका-यांनी या विभागाकडून योजनेतर निधी मिळविण्यासाठी <u>निधी मागणी प्रपत्र - II</u> मध्ये माहिती शासनास सादर करावी.

## (४) <u>विंधण विहिरी</u> :-

(i) टंचाई कृती आराखड्यात समाविष्ट ज्या गावांत/वाड्यांत पाणीपुरवठा करण्याकरीता उपयुक्त योजना म्हणून प्रपत्र (अ) व (ब) मध्ये विंधण विहिरी घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल, अशा गावांत/वाड्यांत टंचाई कालावधीत विंधण विहिरींचा कार्यक्रम खालील निकषांप्रमाणे राबविण्यात यावा :-

अ) गावांत शेवटच्या जनगणनेनुसार २०० लोकसंख्येमागे १ विंधण विहिर अनुज्ञेय राहील. या तत्वास अनुसरून गावाच्या लोकसंख्येचा आणि पूर्वी घेतलेल्या आणि सद्यस्थितीत जिवंत विंधण विहिरींच्या संख्येचा विचार करून नवीन विंधण विहिरी मंजूर करण्याबाबत विचार करण्यात यावा.

ब) वाड्यांची लोकसंख्या शेवटच्या जनगणनेनुसार किमान ५० असल्यास, १ विंधण विहिरी अनुज्ञेय राहील मात्र - -

- - सदर वाडीच्या ०.५ कि.मी. अंतराच्या परिसरात कोणताही पिण्याच्या पाण्याचा सार्वजनिक उद्‌भव असू नये.
- - सदर वाडी कायम स्वरूपाची असून तिचा समावेश शेवटच्या जनगणने मध्ये वाडी म्हणून असावा. (जनगणनेच्या पुस्तिकेत वाडीचा निर्देश नसल्यास, जिल्हाधिका-यांनी सदर वाडी कायम स्वरुपी आहे किंवा ती शेवटच्या जनगणनेनंतर कायम स्वरुपी अस्तित्वात आली आहे असे प्रमाणित करणे आवश्यक राहील.)
- - मोठ्या खातेदारांच्या खाजगी वस्त्यांसाठी विंधण विहिरी घेण्यात येऊ नयेत.

(ii) टंचाई कृती आराखड्यात समाविष्ट गावांत/वाड्यांत या विभागाकडून उपलब्ध होणा-या योजनेतर अनुदानातून विंधण विहीर मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना राहतील. टंचाई कृती आराखड्यात समाविष्ट गावांत/वाड्यांत टंचाई निवारणार्थ विंधण विहिरी मंजूर करण्यापूर्वी सोबत जोडलेल्या प्रपत्र (ब) मध्ये सहाय्यक भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी क्षेत्रिय तपासणीअंती संबंधित गावे/वाड्यांसाठी किमान खर्चाची व तांत्रिक

दृष्ट्या शक्य उपाययोजना म्हणून विंधण विहिरींची शिफारस योग्य रित्या केली आहे याची खात्री जिल्हाधिका-यांनी संबंधित उप विभागीय अधिकारी (किंवा तत्सम महसूल खात्याचा जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी) यांच्या मार्फत न चुकता करावयाचे आहे. तद्नंतरच जिल्हाधिकारी यांना संबंधित गावांत/वाड्यांत वर नमूद केलेल्या निकषांचा विचार करून विंधण विहिरी घेण्याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे.

(iii) टंचाई कृती आराखड्यातील ज्या गावांत/वाड्यांत वरील प्रमाणे विंधण विहिरी घेण्यास जिल्हाधिका-यांनी मान्यता दिलेली असेल अशा गावांपैकी/वाड्यांपैकी जी गावे/वाड्या "राजीव गांधी पेयजल अभियानांतर्गत" सर्वेक्षणानुसार व शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांकःग्रापापु-१०९३/सीआर-६८७/३९-अ, दिनांक ३० जून १९९३ अन्वये समस्याग्रस्त गावांच्या/वाड्यांच्या ठरविलेल्या अग्रक्रमाप्रमाणे, उच्च प्राथम्यक्रम असलेल्या वर्गीकरणात मोडतात अशा किती गावांत/वाड्यांत, नियमित ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या योजनांतर्गत तरतुदीतून किंवा संबंधित मतदार संघातील आमदारांच्या सहमतीने स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत तरतुदीतून, विंधण विहिरी घेता येतील हे जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याशी सल्लामसलत करून ठरवावे व फक्त उरलेल्या विंधण विहिरीसाठी सोबतच्या <u>निधी मागणी प्रपत्र - III</u> मध्ये शासनाकडून योजनेतर तरतुदीची मागणी करावी.

(iv) प्रत्येक जिल्ह्यांना आवश्यकतेनुसार विंधण यंत्रे पुरविण्याची व्यवस्था. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांच्या कडून करण्यात येईल.

## (५) तात्पुरत्या पूरक नळ योजना :-

(i) टंचाई कृती आराखड्यात समाविष्ट असलेल्या गावांत/वाड्यांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न खाजगी विहीर अधिग्रहीत करून/विहिरींचा गाळ काढून/विहिर खोल करून/बुडक्या घेऊन/विंधण विहिरी घेऊन/नळ योजनेची विशेष दुरुस्ती करून किंवा विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करून सुटत नसेल आणि गावांतील/वाड्यांतील अस्तित्वात असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेचे उद्भव कमी झालेले/आटले असल्यामुळे तेथे पाणी टंचाई भासत असेल तर तेथे तात्पुरत्या पूरक नळ योजना घेण्याबाबत विचार करण्यात यावा. मात्र असे करताना प्रस्तावित तात्पूरत्या पूरक नळ योजनांवरील संभाव्य खर्च सदर गावांत/वाड्यांत टँकरने पाणीपुरवठा करावयाचा झाल्यास, त्यावरील होणा-या संबंधित संभाव्य खर्चापेक्षा कमी असेल तरच तेथे तात्पुरत्या पूरक नळ योजना घेण्यात याव्यात.

(iii) तात्पुरत्या पूरक नळ योजनांना मंजूरी देण्याकरिता अधिकार खालीलप्रमाणे राहतील :-

अ) अंदाजित किंमत रुपये ५ लाखांपर्यंत — जिल्हाधिकारी.
ब) अंदाजित किंमत रुपये ५ लाखांपेक्षा जास्त — विभागीय आयुक्त.

(iii) तात्पुरत्या पुरक योजना मंजूर करतांना खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे हे पाहणे मंजूरी अधिका-यांवर बंधनकारक राहील.:-

अ) कार्यान्वित असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेचा उद्भव कमी पडत असेल अथवा पूर्ण आटला असेल तरच तात्पुरती पूरक पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात यावी. मात्र तात्पुरत्या पूरक पाणी पुरवठा योजनेसाठी प्रस्तावित नवीन उद्भव कार्यान्वित असलेल्या पाणी पुरवठा योजनेपासून २ कि.मी. च्या आत असावा.

ब) पुरक उद्भव शक्यतो शासकिय घेण्यात यावा. शासकिय उद्भव नसल्यासच याकरिता खाजगी विहिरी अधिग्रहीत करण्यात याव्यात.

क) टँकर/बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा करण्यापेक्षा तात्पुरती पूरक योजना कमी खर्चाची असेल तरच ती घेण्यात यावी.

ड) मूळ क्रियान्वित नळ पाणीपुरवठा योजना स्थानिकस्तर असल्यास, अथवा राज्यस्तर असून हस्तांतरीत असल्यास त्यासाठी तात्पुरत्या पूरक नळ योजना घेण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत करण्यात यावी. अहस्तांतरीत राज्यस्तर नळ पाणीपुरवठा योजनांच्या संदर्भातील तात्पुरत्या पूरक नळ योजना घेण्याची कार्यवाही संबंधित परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभागाने करावी.

इ) अंदाजपत्रकीय किंमत कमी करण्याच्या दृष्टीने तात्पुरत्या नळ योजना जी यंत्रणा राबविणार असेल त्या यंत्रणेकडे उपलब्ध असलेल्या जुन्या वा वापरण्यास योग्य असलेली पाईप व पंपिंग मशिनरी उपयोगात आणावी. तसेच नवीन उद्भव शक्यतो जेथे इलेक्ट्रिक लाईट उपलब्ध आहेत तेथे घ्यावा. जेणेकरुन, विजेच्या खर्चात बचत होऊ शकेल.

ई) पावसाळा सुरु झाल्यानंतर पाईप/पंपिंग मशिनरी काढून घ्यावी, तसेच संबंधित कार्यालयात तशी नोंद घेण्यात यावी.

(iv) सर्वसाधारणपणे रुपये ५ लाखपेक्षा जास्त खर्चाच्या तात्पुरत्या पूरक नळ योजना हाती घेण्याची गरज पडू नये असे शासनास वाटते. कारण की, त्यापेक्षा अधिक किंमतीची तात्पुरती पूरक नळ योजना घ्यावयाची असल्यास, जवळ जवळ प्रत्येक प्रकरणी अशा योजनेपेक्षा संबंधित भागात टँकर/बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा करणे कमी खर्चाचे राहील. अर्थात रुपये ५ लाखांपेक्षा जास्त खर्चाची पूरक योजना मंजूर करतांना विभागीय आयुक्तांनी विशेष काळजी घ्यावी.

(v) येथे असे स्पष्ट करण्यात येते की, तातडीच्या/तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजना घेण्यावर बंदी असून फक्त वरीलप्रमाणे तात्पुरत्या पूरक नळ योजना टंचाई कालावधी पुरत्या अनुज्ञेय आहेत. अर्थात, तात्पुरत्या नळ योजना फक्त जेथे पूर्वी कार्यान्वित नळ पाणीपुरवठा योजना आहे व ज्याचा मूळ उद्भव आटला आहे किंवा कमी पडत आहे, फक्त त्याच ठिकाणी घेता येईल.

(vi) टंचाई कृती आराखड्यात समाविष्ट तात्पुरत्या पूरक नळ योजनांसाठी आवश्यक निधीची मागणी जिल्हाधिका-यांनी सोबतच्या <u>निधी मागणी प्रपत्र -(iv)</u> मध्ये या विभागाकडे करावी.

(IV) (अ) टंचाई कार्यक्रमांतर्गत खालील उपाययोजनांसाठी निधी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत, "२२४५-नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी सहाय्य" या लेखाशिर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात येईल.

१) बुडक्या घेणे.
२) विहिरी खोल करणे इ.
३) खाजगी विहिरींचे अधिग्रहण करणे.
४) टँकर/बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा करणे.

यासाठी लागणा-या निधीची मागणी, हाती घ्यावयाच्या कामांचा सविस्तर तपशिल देऊन जिल्हाधिका-यांनी विभागीय आयुक्तांमार्फत करावी.

(ब) खालील उपाययोजनांसाठी शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून स्वतंत्र योजनेतर तरतूद लेखाशीर्ष "२२१५-पाणी पुरवठा व स्वच्छता" खाली जिल्हाधिका-यांना विभागीय आयुक्तां मार्फत स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देण्यात येईलः-

(१) विंधण विहिरी घेणे.
(२) नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे.
(३) विंधन विहिरींची विशेष दुरुस्ती करणे.
(४) तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे.

सवरील योजनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया खालील प्रमाणे राहीलः-

कालावधी निहाय टंचाई कृती आराखडा तयार झाल्यानंतर जिल्हाधिका-यांनी सोबतच्या निधी मागणी प्रपत्र क्रमांक I ते IV मध्ये तपशिलवार माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडे विभागीय आयुक्तांमार्फत पाठवून निधीची मागणी करावी. त्या मागणीचा विचार करुन शासनाकडून विभागीय आयुक्तांमार्फत आवश्यक तो योजनेतर निधी जिल्हाधिका-यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. मात्र विंधण विहिरींसाठी आवश्यक अनुदान परस्पर संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात येईल.

(V) टंचाई कृती आराखड्यात समाविष्ट गावांत/वाड्यांत सार्वजनिक उद्भव असल्यास पाणीपुरवठा योजनांच्या उद्भवात पाणी टिकवून धरण्याच्या दृष्टीने शक्य असेल तेथे जाकेट- वेल्स, ट्रेंच-कम-बोअरवेल यासारख्या जलसंवर्धनाच्या अपारंपारिक योजना भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने तातडीने हाती घ्याव्यात. यासाठी लागणारा अतिरिक्त निधी संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांना मागणीनूसार शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांना एकेका गावांसाठी रुपये २ लाख खर्चाच्या मर्यादेपर्यंत अशा अपारंपारिक उपाययोजना मंजूर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

(VI) ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांचा उद्देश उन्हाळ्यातील टंचाईच्या कालावधीत जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध करुन द्यावयाचे असल्याने टंचाई कृती आराखड्यातील उपाययोजना, जनतेस लाभदायक ठरण्याच्या दृष्टीने वेळीच पुर्ण होणे आवश्यक आहे. त्यामुळे मंजूरी दिलेल्या तथापि दरवर्षी ३० जून पूर्वी पूर्ण न झालेल्या उपाययोजनांची मंजूरी शासनाने विशिष्ट मुदतीचे आदेश दिले नसल्यास व्यपगत होईल.

वरीलप्रमाणे टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेतांना त्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे होत असल्याची व या उपाययोजनांमुळे संबंधित गावांत/वाड्यांत खरोखर पाणी मिळत असल्याची दक्षता जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. या करिता जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एक किंवा आवश्यकतेनुसार अधिक तपासणी पथके गठीत करुन या पथकांकरवी वेळोवेळी क्षेत्रीय तपासण्या करुन घ्याव्यात. याशिवाय विभागीय आयुक्तांनी देखील विभागीय स्तरावरुन टंचाई कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर कडक पर्यवेक्षण करण्याच्या दृष्टीने विभागीय स्तरावर स्वतंत्र तपासणी पथक स्थापन करावे व त्यांच्या माध्यमातून टंचाई कार्यक्रम व्यवस्थितपणे राबविण्यात येत आहे किंवा कसे याची खात्री करावी व निधीचा दुरुपयोग होत असल्याचे आढळून आल्यास, संबंधितांवर कारवाई करावी/प्रस्तावित करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रु.न.देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
५) प्रधानसचिव, वित्त विभाग
६) सचिव, नियोजन विभाग
७) सचिव, महसूल व वन विभाग, (मदत कार्य व पुनर्वसन)
८) सचिव, आदिवासी विकास विभाग
९) सचिव, (जलसंधारण), ग्राम विकास व जलसंधारण विभाग
१०) सचिव, (ग्रामविकास) ग्रामविकास व जलसंधारण विभाग
११) सर्व विभागीय आयुक्त
१२) सर्व जिल्हाधिकारी
१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१४) सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधीकरण , मुंबई.

(१५)सर्व विभागीय मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण
(१६)संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा , पुणे- ३७
१७)सर्व अधिक्षक अभियंता तथा जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी
१८)सर्व कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधीकरण
१९)सर्व कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) जिल्हा परिषद .
२०)भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे सर्व विभागीय उप संचालक/वरिष्ठ भूवैज्ञानिक.
२१)भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक.
२२)सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी
२३)सर्व तहसीलदार
२४)महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा)
२५)महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा)
२६)सर्व कार्यासने- पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
२७)महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
२८)निवड नस्ती, कार्यासन क्रमांक- पापु -१४ संग्रहासाठी.

प्रपत्र-अ

| तालुका | गाव/वाडीचे नाव | गावाच्या/वाडीच्या १.५ कि.मी.च्या परिसरातील अस्तित्वात असलेली पाणी पुरवठ्याची साधने | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रकार | संख्या | उद्भवातून सद्यःस्थितीत दरडोई/प्रतिदिनी पाण्याची उपलब्धता | सर्व सार्वजनिक उद्भवातून दरडोई दरदिवशी पाण्याची प्रत्यक्ष उपलब्धता | योजना बंद असल्यास वा अपुरे पाणी पुरवठा करीत असल्यास विशेष दुरुस्ती करून पुरेसा पाणी पुरवठा करता येईल का (असल्यास त्याचा तपशील द्यावा) |
| | | न.पा.पु.यो.(स्था.स्तर)<br>न.पा.पु.यो.(रा.स्तर)<br>विंधण विहिरी<br>साधी विहीर | | | | |



| खाजगी उद्भव | | | गाव/वाडीच्या १.५ कि.मी.परिसरात खाजगी पाणी पुरवठ्याची साधने नसल्यास सर्वात जवळ असलेल्या खाजगी उद्भवाचा तपशील | | | | संबंधित गांवांत/वाड्यांत पाणी टंचाई भासण्याची शक्यता असल्यास केव्हा पासून व किती कालावधीसाठी पाणी टंचाई भासेल याचा अंदाज. | टंचाई निवारणार्थ प्रस्तावित उपाययोजना. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रकार | संख्या | पाण्याच्या उपलब्धते-बाबत अभिप्राय | प्रकार | संख्या | पाण्याच्या उपलब्धते-विषयी अभिप्राय | संबंधित गाव/वाडीपासून उद्भवाचे अंतर | | |
| साध्या विहीरी<br>इतर | | | | | | | | |

टिप :- प्रत्येक गावं/वाडीची माहिती स्वतंत्र देण्यात यावी.

## प्रपत्र - ब

(१) गावाचे/वाडीचे नांव :-

तालुका :- जिल्हा :- लोकसंख्या :-

(२) अस्तित्वात असलेले पाण्याचे साधे उद्भव (साध्या विहिरी) ____________

अ) सार्वजनिक विहिरी (सर्व)

१. जागेचे वर्णन ____________

२. खोली ____________

३. पाण्याची स्थिर पातळी ____________

४. विहिरीच्या तळाशी असलेल्या खडकाचा प्रकार ____________

५. ब्लास्टींग करुन विहीर खोल करण्यात आली आहे किंवा करता येईल का, ब्लास्टींगने विहिरीत पाण्याचे प्रमाण वाढेल काय ? तसे असल्यास शिफारस घ्यावी.

६. गाळ काढून विहिरीतून पुरेसे पाणी उपलब्ध होऊ शकेल काय ?

ब) हरिजन वस्तीत आणि आदिवासी वस्तीत असलेल्या विहिरींची स्थिती.

(३) अस्तित्वात असलेली नळ पाणी पुरवठा योजना :-

अ) नळ योजना सध्या चालू स्थितीत आहे काय ? ____________

ब) नळ पाणी पुरवठा योजनेसाठी पाण्याचा उगम काय ? ____________

क) उद्भयाचे स्थळाजवळ नाला/पाझर तलाव इत्यादिचा फायदा आहे का ? ____________

ड) पाणी पुरवठा योजनेच्या विहिरीचे पाणी टंचाई कालावधीत पुरेसे पडेल काय ____________

(i) विहिरीचे तळातील खडकाचा प्रकार ____________

(ii) उद्भव विहिरींची खोली वाढवून/गाळ काढून पुरेसे पाणी प्राप्त होऊ शकेल काय ? ____________

(iii) पर्यायी उद्भव (खाजगी/शासकीय) उपलब्ध आहे काय ? असल्यास त्यावरुन तात्पुरती पूरक नळयोजना घेऊन अस्तित्वात असलेल्या मूळ नळ योजनेवरुन पुरेसा पाणी पुरवठा करता येईल काय ? ____________

इ) सद्यस्थितीत ग्रामस्थ कोठून पाणी घेतात, ____________

फ) नळ पाणी पुरवठा योजनेचा विद्युतपंप चालू आहे काय ? असल्यास, किती तास चालतो.

ग) नळ योजना सध्या नादुरुस्त असल्यास त्य्रस सत्वर दुरुस्त करुन पुरेसे पाणी उपलब्ध होऊ शकेल काय ? ____________

(४) खाजगी विहीर :-

(अ) गावास बारमाही पाणी टिकणारी व टंचाई कालावधीत सुध्दा

पुरेसे पाणी देणारी खाजगी विहिर अस्तित्वात आहे काय ?

(ब) असल्यास, त्यास अधिग्रहीत करुन पुरेसे पाणी मिळू शकेल काय ?

(५) अस्तित्वात असलेल्या सर्व विंधण विहिरी वरील हातपंप किंवा विद्युतपंप यांची स्वतः पाहिल्यानुसार परिस्थिती.

(अ) सध्या अस्तित्वात असलेल्या विंधण विहिरींची संख्या ----------

(ब) त्यापैकी चालू विंधण विहिरींची संख्या व प्रत्येकाची ताशी क्षमता ----------

(क) नादुरुस्त विंधण विहिरी सत्वर दुरुस्त करता येईल काय ? ----------

(ड) पंप चालू असताना कनेक्टींग रॉडचा आवाज होतो का ? ----------

(इ) विंधण विहिरींची पाहणी केली त्यावेळी पाण्याची पातळी ----------

(फ) पाण्याची स्थिर पातळी. ----------

(म) हातपंपासाठी किंवा विद्युतपंपासाठी दुरुस्ती आवश्यक ----------

(न) नादुरुस्त विंधण विहिरींची दुरुस्ती करुन संभाव्य टंचाईस तोंड देता येईल काय ? ----------

(६) खाजगी विहिर :-

(अ) गावास बारमाही पाणी टिकवणारी व टंचाई कालावधीत सुध्दा पुरेसे पाणी देणारी खाजगी विहिर अस्तित्वात आहे काय ?

(ब) असल्यास, त्यास अधिग्रहीत करुन पुरेसे पाणी मिळू शकेल काय ?

(७) अस्तित्वात असलेल्या सर्व विंधण विहिरी वरील हातपंप किंवा विद्युतपंप यांची स्वतः पाहिल्यानुसार परिस्थिती.

(अ) सध्या अस्तित्वात असलेल्या विंधण विहिरींची संख्या ----------

(ब) त्यापैकी चालू विंधण विहिरींची संख्या व प्रत्येकाची ताशी क्षमता ----------

(क) नादुरुस्त विंधण विहिरी सत्वर दुरुस्त करता येईल काय ? ----------

(ड) पंप चालू असताना कनेक्टींग रॉडचा आवाज होतो का ? ----------

(इ) विंधण विहिरींची पाहणी केली त्यावेळी पाण्याची पातळी ----------

(फ) पाण्याची स्थिर पातळी. ----------

(ग) हातपंपासाठी किंवा विद्युतपंपासाठी दुरुस्ती आवश्यक असल्यास त्याचा तपशील ----------

(उदा.वाशर जाम झाले आहे काय ?जी.आय.पाईप/रॉडलाईन व्यवस्थित आहे का/ पंप चालू असताना कनेक्टींग रॉडचा आवाज होतो का,इत्यादी)

(न) नादुरुस्त विंधण विहिरींची दुरुस्ती करुन संभाव्य टंचाईस तोंड देता येईल काय ? ----------

(८) (अ) संबंधित गावात/वाडयात सध्या प्रगतीपथावरील नळ पाणी पुरवठा योजना/साध्या विहिरी आहेत काय ?(असल्यास त्याचा तपशील व योजना पूर्ण होण्याचा संभाव्य कालावधी) ----------

(ब) गावात/वाडयात पाणी टंचाई भासण्यापुर्वी सदर प्रगतीपथावरील योजना पूर्ण करणे शक्य आहे काय ----------

## शिफारस

उपरोक्त अस्तित्वात असलेल्या व प्रगतीपथावरील पिण्याच्या पाण्याच्या योजनांची प्रत्यक्ष तपासणी केली असता उपलब्ध पाणी पुरवठा साधनातून (नळ पाणी पुरवठा योजनांव्दारे/विहिरींव्दारे/हात पंपाव्दारे)होत असलेल्या पाण्याचा पुरवठा गावाच्या/वाडीच्या लोकसंख्येला पुरेसा वाटतो/वाटत नाही,त्यामुळे त्या गावास/वस्तीस टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेण्याची गरज आहे/नाही. (*)

गावातील/वाडीतील पाणी पुरवठा साधनांच्या सद्यस्थितीचा व तोंड द्यावयाच्या टंचाई कालावधीचा विचार करता संभाव्य टंचाई निवारक उपाय योजनांपैकी येथे -------------------- ------------ घेणे ही किमान खर्चाची उपाययोजना राहील.

दिनांक :

सहाय्यक भूवैज्ञानिक,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
जिल्हा :-

सहाय्यक भूवैज्ञानिकांनी वरील प्रकारे केलेल्या शिफारशींशी मी सहमत आहे.

दिनांक :-

(१) तहसीलदार,तालुका

(२) गट विकास अधिकारी,
पंचायत समिती-------------

(टिप :-(*) टंचाई निवारणार्थ उपाययोजनांची गरज नसल्यास पुढचा मजकूर खोडावा)

प्रपत्र - क

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, मौजे ------- ------------- ता.------------जिल्हा----------- येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्तीचे काम टंचाई कृती आराखड्यात समाविष्ट,असून सदर काम "जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी " तून घेणे जिल्हा परिषदेला निधी अभावी शक्य नाही. म्हणूनच सदर काम टंचाई कार्यक्रमासाठी जिल्हाधिका-यांकडे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने उपलब्ध केलेल्या स्वतंत्र योजनेतर तरतूदीतून मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

दिनांक

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद.

प्रपत्र- ड

टंचाई कृती आराखड्यात समाविष्ट गावात/वाड्यात नळ पाणी पुरवठा योजनांच्या विशेष दुरुस्तीची प्रक्रिया.

| अ.क्र. | नळ योजनेचा प्रकार | हस्तांतरित/ अहस्तांतरित | ज्या निधीतून विशेष दुरुस्तीची कामे करावयाची आहेत त्याचा तपशील | विशेष दुरुस्ती कामास प्रशासकीय मंजुरी देणारे प्राधिकारी | विशेष दुरुस्तीची कार्यवाही ज्या यंत्रणेव्दारे करावयाची आहे तिचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १) | स्थानिक स्तर | हस्तांतरित वा अहस्तांतरित | प्रथमतः<br>जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून | जिल्हा परिषदेअंतर्गत सक्षम अधिकारी | जिल्हा परिषद |
| | | | नंतर :-<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपलब्ध होणा-या योजनेतर अनुदानातून | -जिल्हाधिकारी (रु.५ लाखापर्यंत)<br>-विभागीय आयुक्त (रु. ५ लाखाचे वर) | जिल्हा परिषद |
| २) | राज्य स्तर | हस्तांतरित | प्रथमतः<br>जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून | जिल्हा परिषदेअंतर्गत सक्षम अधिकारी | जिल्हा परिषद |
| | | | नंतर :-<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपलब्ध होणा-या योजनेतर अनुदानातून | -जिल्हाधिकारी (रु.५ लाखापर्यंत)<br>-विभागीय आयुक्त (रु. ५ लाखाचे वर) | जिल्हा परिषद |

| १. | २ | ३. | ४. | ५. | ६. |
|---|---|---|---|---|---|
| | | अहस्तांतरित (मात्र पूर्ण योजना) | प्रथमतः<br>जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून | जिल्हा परिषदेअंतर्गत सक्षम अधिकारी | संबंधित महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग |
| | | | नंतर :-<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपलब्ध होणा-या योजनेतर अनुदानातून | -जिल्हाधिकारी (रु.५ लाखापर्यंत)<br>-विभागीय आयुक्त (रु. ५ लाखाचे वर) | संबंधित महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग |
| | | अहस्तांतरित (मात्र अपूर्ण योजना) | पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपलब्ध होणा-या योजनेतर अनुदानातून | -जिल्हाधिकारी (रु.५ लाखापर्यंत)<br>-विभागीय आयुक्त (रु. ५ लाखाचे वर) | संबंधित महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग |

प्रपत्र -ई

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, मौजे------------------------,ता.------------जिल्हा----------- येथील विंधण विहिरींच्या विशेष दुरुस्तीचे काम टंचाई कृती आराखड्यात समाविष्ट असून सदर काम "जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी/ जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या निधी" तून घेणे जिल्हा परिषदेला निधी अभावी शक्य नाही. म्हणूनच सदर काम टंचाई कार्यक्रमासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने उपलब्ध केलेल्या स्वतंत्र योजनेतर तरतूदीतून मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

दिनांक :-

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद.

टंचाई कृती आराखडा (कालावधी
(आर्थिक वर्ष निहाय)

निधी मागणी प्रपत्र- I (नळ योजनांची विशेष दुरुस्ती)

जिल्हा :-

| टंचाई कृती आराखडयांमधील संभाव्य पाणी टंचाईची एकूण गांवे/वाडया | | कृती आराखडयात समाविष्ट संभाव्य टंचाईच्या गावांपैकी/वाडयांपैकी ज्या ठिकाणी नळ योजनांची विशेष दुरुस्ती प्रस्तावित आहे अशा गावांची/वाडयांची संख्या | | एकूण विशेष दुरुस्ती करावयाच्या नळ योजनांची संख्या | | | अंदाजपत्रकीय किंमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गावे | वाडया | गावे | वाडया | राज्यस्तर | स्थानिकस्तर | एकूण | राज्यस्तर | स्थानिकस्तर | एकूण |
| | | | | | | | | | |

| जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून घेता येतील अशी नळ योजनांची विशेष दुरुस्तीची कामे | | | | | | पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीसाठी आवश्यक योजनेतर तरतूद | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | | | अंदाजित किंमत | | | राज्यस्तर योजनांसाठी | स्थानिकस्तर योजनांसाठी | एकूण |
| राज्यस्तर | स्थानिकस्तर | एकूण | राज्यस्तर | स्थानिकस्तर | एकूण | | | |
| | | | | | | | | |

एम-1243(ब)(1200-2-99)13-अ. 

टंचाई कृती आराखडा (कालावधी :———————)

(आर्थिक वर्ष निहाय)

निधी मागणी प्रपत्र-II (विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती)

जिल्हा :-

| टंचाई कृती आराखडयांमधील संभाव्य पाणी टंचाईची एकूण गांवे/वाडया | | कृती आराखडयात समाविष्ट संभाव्य टंचाईच्या गावांपकी/वाडयापैकी ज्या ठिकाणी विंधण विहीरींची विशेष दुरुस्ती प्रस्तावित आहे अशा गावांची/वाडयांची संख्या | | एकूण विशेष दुरुस्ती करावयाच्या विंधण विहीरींची संख्या | अदाजपत्रकीय किंमत |
|---|---|---|---|---|---|
| गावे | वाडया | गावे | वाडया | | |
| | | | | | |

| जिल्हा परिषदेस त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नातून / जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून हाती घेता येतील अशी विंधण विहिरींची विशेष दुरुस्तींची कामे | | पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून विंधण विहीरींच्या विशेष दुरुस्तीसाठी आवश्यक योजनेतर तरतूद |
|---|---|---|
| संख्या | अंदाजित किंमत | |
| | | |

टंचाई कृती आराखडा (कालावधी ---------)

(आर्थिक वर्ष निहाय)

निधी मागणी प्रपत्र-III (विंधण विहिरी कार्यक्रम)

जिल्हा :-

| टंचाई कृती आराखडयात समाविष्ट संभाव्य टंचाईग्रस्त असलेल्या गावांची/वाडयांची एकूण संख्या | | टंचाई कृती आराखडयात समाविष्ट संभाव्य टंचाईच्या गावांपैकी/वाडयांपैकी नवीन विंधण विहिरींव्दारा टंचाई निवारण होणा-या गावांची/वाडयांची संख्या | | टंचाई कृती आराखडयात प्रस्तावित नवीन विंधण विहिरी. | |
|---|---|---|---|---|---|
| गावे | वाडया | गावे | वाडया | संख्या | किंमत |
| | | | | | |

सदर प्रस्तावित विंधण विहिरींपैकी जिल्हयास ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी उपलब्ध योजनांतर्गत तरतुदींतुन/स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत तरतुदींतुन घेता येणे शक्य असलेल्या विंधण विहिरींचा तपशील.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपलब्ध होणा-या तरतुदींतुन घ्यावयाच्या विंधण विहिरी.

| किमान गरजा कार्यक्रम | | वर्धितवेग पाणी पुरवठा कार्यक्रम | | स्थानिक विकास कार्यक्रम | | संख्या | आवश्यक अनुदान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | किंमत | संख्या | किंमत | संख्या | किंमत | | |
| | | | | | | | |

टंचाई कृती आराखडा (कालावधी ------ ---)

(आर्थिक वर्ष निहाय)

निधी मागणी प्रपत्र-IV (तात्पुरत्या पूरक नळ योजना)

जिल्हा -

| टंचाई कृती आराखडयांत समाविष्ट संभाव्य टंचाईग्रस्त असलेल्या गावांची/वाडयांची एकूण संख्या | | टंचाई कृती आराखडयात समाविष्ट संभाव्य टंचाईच्या गावांपेकी/वाडयापेकी तात्पुरत्या पूरक नळ योजनांव्दारा टंचाई निवारण होणा-या गावांची/वाडयांची संख्या | | टंचाई कृती आराखडयात प्रस्तावित तात्पुरत्या पूरक नळ योजना व त्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून आवश्यक योजनेतर अनुदान. | |
|---|---|---|---|---|---|
| गांवे | वाडया | गावे | वाडया | संख्या | किंमत |
| | | | | | |

**पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रात विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणाऱ्या तातडीच्या योजना/ उपाययोजना मंजूर करण्यासाठी स्थायी समिती स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

पाणी पुरवठा वस्वच्छता विभाग,

शासन निर्णय क्रमांक टंचाई-२००२/प्र.क्र.३४५/पापु-१४,

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

दिनांक : २७ नोव्हेंबर,२००२

संदर्भ : १) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाई-१०९९/प्र.क्र.१३/पापु-१४ दिनांक ०१ फेब्रुवारी,१९९९.

२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाई-२०९९/प्र.क्र.१४/पापु-१४ दिनांक ०२ फेब्रुवारी,१९९९.

३) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाइ-१०९९/प्र.क्र.१२/पापु-१४ दिनांक ०३ फेब्रुवारी,१९९९.

४) महसूल व वन विभागाचे दि.२८ आगस्ट,२००२ चे पत्र क्र.साएलएस-५११०/ प्र.क्र.७१२ / म-३

**प्रस्तावना :-**

१. राज्यातील नागरी क्षेत्रात निर्माण होणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ तातडीच्या पाणी पुरवठा योजना घेण्यासंदर्भात संदर्भ क्र.०२ येथील शासन निर्णयान्वये एकत्रात आदश निर्गमीत करण्यात आले आहेत. त्यात नागरी भागात पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या उपाययोजना अटी / शर्ती व निकष तसेच वित्तीय मर्यादा, इत्यादी बाबी विहित करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे "क" वर्गीय नगरपालिकांसाठी रु.सहा लक्ष, "ब" वर्गीय नगरपालिकांसाठी रु.दहा लक्ष, "अ" वर्गीय नगरपालिकांसाठी रु.वीस लक्ष व महानगरपालिकांसाठी (मुंबई व बृहन्मुंबई वगळून) रु.पंचवीस लक्ष ही वित्तीय मर्यादा विहित करण्यात आलेली आहे. तसेच, रु.पाच लक्ष पर्यंतच्या योजनांना मंजूरी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी व रु.दहा लक्ष पर्यंतच्या योजनांना मंजूरी देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच, ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ

ध्यावयाच्या विविध उपाययोजनांसाठी संदर्भ क्र.१ व ३ येथील स्थायी आदेशान्वये काही भौतिक निकष निश्चित करण्यात आले आहेत.

२. वर नमूद केलेल्या वित्तीय मर्यादेपेक्षा जास्त किमतीच्या योजना असल्यास किंवा त्या विहित भौतिक निकषात बसत नसल्यास, आवश्यकतेनुसार विशेष बाब म्हणून महसूल व वित्त विभागाच्या सहमतीने मंजूर केल्या जातात. यात बराच कालापव्यय होऊन योजना तातडीने मंजूर करून कार्यान्वीत होण्यास अडचणी निर्माण होतात. ही बाब लक्षात घेऊन विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील आवश्यक भासणा-या पिण्याच्या पाण्याच्या टंचाई उपाययोजनांना तातडीने प्रशासकीय मंजूरी प्रदान करता यावी म्हणून संदर्भ क्र.४ अन्वये मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य स्तरीय बैठकीमध्ये यासाठी सचिव स्तरीय स्थायी समिती स्थापन करण्याची शिफारस केली आहे.

**शासन निर्णय : -**

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती लक्षात घेता, नागरी व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास प्रदान करण्यात आलेल्या आर्थिक मर्यादेपेक्षा जास्त किमतीच्या असलेल्या तसेच विहित निकषात न बसणा-या तातडीच्या योजना/उपाययोजनांना तातडीने प्रशासकीय मंजूरी देता यावी म्हणून खालीलप्रमाणे स्थायी समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | अध्यक्ष |
| २. सचिव (म.व पू.) महसूल व वन विभाग | सदस्य |
| ३. सचिव (ग्रा.वि.) ग्रामविकास व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ४. सचिव (व्यय),वित्त विभाग | सदस्य |
| ५. सचिव (१), नगर विकास विभाग | सदस्य |
| ६. सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ७. उप सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य सचिव |

२. वर नमूद केलेल्या समितीस आवश्यकतेनुसार विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी किंवा अन्य संबधीत अधिकाऱ्यास बैठकीस बोलावण्याचे अधिकार असतील.

३. वरील समितीने प्राप्त झालेल्या योजनांच्या प्रस्तावावर, शक्य तितक्या लवकर निर्णय घ्यावा.

४. सदर शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग, नगर विकास विभाग, महसूल व वन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.प्र.क्र.१९४६/व्यय-३ दिनांक १५ नोव्हेंबर, २००२ अन्वये निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

(रु.न.देशमुख)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा.मंत्री (पा.पु.वस्व.वि.) यांचे खाजगी सचिव
मा.राज्य मंत्री (पा.पु.वस्व.वि.) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव (वित्त) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव(प्रावि), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
सदस्य सचिव(प्रशासन) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
सदस्य सचिव(तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण(सर्व)
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे
संचालक ,नगर पालिका प्रशासन,मुंबई
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
महानगरपालिका आयुक्त (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता (सर्व)
मुख्य अधिकारी नगरपरिषद (सर्व)
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व कार्यासने (पा.पु.वस्व.वि.)
पापु- १४ संग्रहासाठी

राज्यातील ग्रामीण/नागरी भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ टँकरद्वारे करावयाच्या पाणी पुरवठ्याबाबत मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन
पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन परिपत्रक क्र.टंचाई-२००५/प्र.क्र. ३०५/पापु.१४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २४ जानेवारी २००६

संदर्भ :

१. शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई ३०९९/प्र.क्र.१३/पापु.१४, दिनांक १ फेब्रुवारी, १९९९.

२. शासन परिपत्रक , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. टंचाई ३००१/प्र.क्र.१३३/पापु १४ दि.१० एप्रिल, २००१

३. शासन निर्णय , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई १००२/प्र.क्र.२९०/पापु १४ दिनांक १९ सप्टेंबर, २००२

४.शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई -१००२/प्र.क्र.३९१/पापु १४ दिनांक ४ जानेवारी २००३ व दि.५ फेब्रुवारी २००५

५.शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई -५००३/प्र.क्र.०१४/पापु१४, दिनांक २७ जानेवारी २००३

६.शासन पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई ३००३/ प्र.क्र.४९/पापु १४ दिनांक २८ एप्रिल २००३

७. शासन पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाई १००३/प्र.क्र.१८६/पापु १४, दि.१९ मे,२००३

**परिपत्रक :**

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये, राज्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या ग्रामीण भागात पाणी टंचाई निवारणार्थ टँकर/बैलगाडीने पाणीपुरवठा करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. टँकरने पाणी पुरवठा करणे ही एक खर्चिक बाब असल्याने, ही उपाययोजना अपरिहार्य परिस्थितीतच मंजूर व्हावी अशी अपेक्षा असते. तीव्र पाणी टंचाईच्या परिस्थितीत पाणी पुरवठा करण्यासाठी, शक्यतो शासकीय टँकर्सचा वापर करण्यात यावा, असे शासनाचे धोरण आहे. शासकीय टँकर्स उपलब्ध नसल्यास, खाजगी टँकर्स /ट्रक्स भाड्याने उपलब्ध करुन घेण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. यासाठी निविदा मागविण्यात याव्यात व कमीतकमी दराच्या निविदा स्वीकाराव्यात, असे शासनाचे आदेश आहेत. संदर्भाधीन क्र. ४ व ५ च्या परिपत्रकान्वये तसेच क्र.६ च्या पत्रान्वये टँकरच्या नियोजित खेपांवर देखरेख ठेवण्यासंदर्भात तसेच टँकरच्या निविदा मागविण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. परंतु शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, टँकरने पाणी पुरवठा करताना, टँकर निविदा प्रक्रिया , टँकरच्या खेपा याबाबत योग्य ते नियंत्रण क्षेत्रीय स्तरावरुन ठेवले जात नसल्याने, टँकरने पाणी पुरवठा करण्यासंदर्भात अनेक तक्रारी शासनास प्राप्त होत आहेत. पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईच्या काळात टँकरने पाणी पुरवठा करणे, ही योजना अधिक कार्यक्षमरित्या राबविली जावी व तक्रारीस वाव राहू नये या दृष्टीकोनातून शासनाच्या मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी होणे क्रमप्राप्त आहे. सबब टँकरने पाणी पुरवठा करण्यासंदर्भात संदर्भाधीन क्र.२,४ व ५ येथील परिपत्रकान्वये व संदर्भाधीन क्र.६ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचना अधिक्रमीत करुन आता पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**अ) टँकर निविदा प्रक्रिया -**

१) ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ खाजगी टँकर/ ट्रकद्वारे करावयाच्या पाणी पुरवठ्यासाठी, टंचाईच्या तीव्रतेनुसार किती खाजगी टँकर्सची आवश्यकता निर्माण होईल याबाबतचा अंदाज घेऊन, टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी ठेकेदाराकडून निविदा मागवाव्यात.त्यासाठी निविदासूचना राज्य व जिल्हा पातळीवरील अधिक खपाच्या वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध करावी, जेणेकरुन त्यास व्यापक प्रसिद्धी मिळेल.

प्राप्त निविदातून कमीतकमी दराची निविदा स्विकारावी. मात्र, हे दर शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या दरापैकी जास्त नसावेत. शासकीय दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास, सर्व निविदादारांना समक्ष बोलावून तडजोडीद्वारे दर ठरविण्यात यावेत.

२) अनेक जिल्ह्यांमध्ये निविदा अंतिम करताना, स्विकारलेल्या किमान दराच्या निविदा धारकांकडे किती टँकर पुरविण्याची क्षमता आहे. ही बाब तपासून पाहिली जात नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात टँकर्सची आवश्यकता निर्माण झाल्यास निविदा धारक एकाच वेळी पुरेसे टँकर उपलब्ध करुन देऊ शकत नाही अथवा नादुरुस्त /जीर्ण टँकर पुरवितो पर्यायाने, लोकांना पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही व शासनाच्या निधीचा पूर्ण मोबदला जनतेला मिळत नाही. ही बाब टाळण्यासाठी जिल्हाधिका-यांनी टँकर्सच्या निविदा मागविल्यानंतर किमान दराची जी निविदा स्विकृत झाली असेल त्या निविदाधारकाकडे किती टँकर आहेत, त्याचप्रमाणे मागील ३ वर्षांमध्ये सरासरी किती टँकर्स लागले आहेत व त्यानुसार चालू वर्षी अंदाजे किती टँकर्स पुरवावे लागतील, या अनुमानानुसार स्विकृत निविदाधारक पाणी पुरवठा करण्यास समर्थ नसल्यास, इतर निविदादारांशी वाटाघाटी करुन ते जर किमान स्विकृत दराने टँकर्स पुरविण्यास तयार असतील तर आवश्यकतेप्रमाणे संबंधितांस टँकर्स पुरविण्याबाबत आदेश द्यावेत. सुयोग्य संनियंत्रणासाठी त्यांना तालुके वाटून देण्यात यावेत.

३) राज्यातील प्रत्येक जिल्ह्याची पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची तीव्रता कमी/जास्त असू शकते, त्यामुळे निविदा मागविण्यासाठी सर्व राज्यासाठी एकाच प्रकारच्या अटी व शर्ती बंधनकारक करता येणार नसल्या तरीही, आपापल्या जिल्ह्यातील परिस्थिती व पुर्वानुभव लक्षात घेता, टँकर मालकांची आर्थिक स्थिती व योग्य प्रमाणात टँकर पुरविण्याची क्षमता लक्षात घेऊन, जिल्ह्यात कोठेही कोणत्याही वेळी पाणी पुरवठा करण्यासाठी निविदाधारक सक्षम असणे, निविदाधारकांना कामाचा पूर्व अनुभव असणे, निविदाधारकाच्या मालकीचे टँकर असणे, यापुर्वी समाधानकारक काम केले असल्याचा लौकीक असणे, राष्ट्रीयकृत बँकेची गॅरंटी असणे, आयकर थकीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र असणे,अनामत रक्कम/ सुरक्षा ठेव घेणे इत्यादीबाबत सोईच्या होतील अशा, सुयोग्य अटी निर्धारित करण्याबाबत जिल्हाधिका-यांनी दक्षता घ्यावी. एखाद्या जिल्ह्यामध्ये पुरेसा अनुभव असलेले पुरवठादार उपलब्ध नसल्यास, आवश्यकतेनुसार विभागून ही जबाबदारी दोन किंवा तीन पुरवठादारांवर देखील सोपविता येईल. परंतु, संपुर्ण जिल्ह्यासाठी एकच दर विहित केलेला असेल याची जिल्हाधिका-यांनी जाणीपूर्वक खातरजमा करुन घ्यावी.

४) ज्या जिल्ह्यात खाजगी टँकर्स धारकांबरोबर केलेल्या करारनाम्याची मुदत संपलेली आहे किंवा ज्या ठिकाणी निविदा मागविण्यात येवून दर निश्चित करण्यात आले नाहीत, तेथे संबंधित जिल्हाधिका-यांनी तात्काळ ७ दिवसाचा कालावधी देऊन, नव्याने निविदा मागवून खाजगी टँकरचे दर ठरवावेत व त्याप्रमाणे पाणी पुरवठा सुरु करावा.

५) जिल्ह्याच्या ज्या भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करताना पथकर (Toll) भरावा लागतो, अशा भागात प्राधान्याने शासकीय टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात यावा. जेथे शासकीय टँकर उपलब्ध होणे शक्य नसेल अशा ठिकाणी खाजगी टँकर धारकांशी पाणी पुरवठा करण्याबाबत करारनामा करताना पथकराची बाब अंतर्भूत करावी.

ब) टँकरने पाणी पुरवठा करताना प्रशासकीय यंत्रणेने घ्यावयाची दक्षता -

१) टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या गावांना, प्रत्यक्षात पाणी पुरवठा होतो किंवा कसे, हे पाहणे आवश्यक असल्याने त्यासाठी संबधीत गावाला टँकर उपलब्ध करुन दिल्यानंतर, वेळच्या वेळी टँकर पोहचला असल्याबाबत, टँकरच्या क्षमतेबाबत आणि नियोजित खेपा होत असल्याबाबत, प्रत्येक खेपेच्या वेळी त्या गावातील पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने नाम निर्देशित केलेल्या समितीवरील दोन महिला सदस्यांची टँकर चालक वेळच्या वेळी सही घेतील, याची दक्षता घ्यावी. टँकर गावात पोहोचल्याची तारीख व वेळ याची त्यात न चुकता नोंद घ्यावी.

७) उपलब्ध टँकरचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेण्याच्या दृष्टीने टँकरच्या जास्त खेपा होणे आवश्यक आहे. पाण्याच्या स्त्रोतापासून पाणी पुरवठयाच्या ठिकाणापर्यंतचे अंतर विचारात घेऊन, त्याप्रमाणे योग्य त्या खेपा ठरवून देण्यात याव्यात व त्याची पुरेपूर अंमलबजावणी होत आहे, याबद्दल दक्षता घ्यावी.

८) टँकरद्वारे होणा-या पाणी पुरवठयावर जिल्हाधिकारी यांनी काटेकोर नियंत्रण ठेवावे. यासाठी योग्य व्यवस्था निर्माण करुन टँकरची क्षमता, प्रत्यक्षात टँकरच्या झालेल्या खेपा, त्याचे वहन अंतर याबाबत तपशीलवार नोंदी ठेवण्यात येवून शासनाकडे अनुदानाची मागणी करताना, जिल्हाधिकारी यांनी या सर्व बाबी तपासल्या असल्याचे स्वतःच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र सादर करावे.

९) भाड्याने लावलेल्या टँकरची देयके त्वरेने अदा केली जात नसल्याने ठेकेदाराकडून पुर्ण क्षमतेने पाणी पुरवठा होऊ शकत नाही, अशा तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. सबब, टँकर पुरवठादारांची देयके त्वरेने अदा होतील, तसेच संपूर्ण देयके अदा करणे शक्य नसल्यास किमान डिझेल, चालकाचे वेतन यासारख्या आवर्ती खर्चासाठी तातडीने रक्कम उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून लोकप्रतिनिधी,कंत्राटदार व जनता यांचे कडून तक्रारीला वाव राहणार नाही. विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांनी यासंदर्भात विशेष काळजी घ्यावी. ब-याच जिल्हाधिकारी कार्यालयांकडे जुनी टँकरची देयके प्रलंबित असल्याचे दिसते. याबाबत दाद मिळण्याच्या दृष्टीकोनातून टँकरधारकांकडून शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात येतो. यामुळे अनावश्यक पत्रव्यवहार वाढून प्रशासकीय यंत्रणेचा कालापव्यय होत असतो. सबब, अशा सर्व प्रकरणांचा तातडीने निपटारा करुन देयके अदायगीची प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात यावीत.

१०) जिल्हाधिका-यांकडून मुक्त केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र आणि अधिक निधीची मागणी वेळेवर केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे.परिणामी, टँकर्सची देयके तसेच, इतर साहित्य / सुटे भाग पुरविण्या-या पुरवठादारांची देयके वेळेवर अदा करता येत नाहीत अशा तक्रारी येतात.अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी जिल्हाधिका-यांनी योग्य ती काळजी घ्यावी व त्यावर विभागीय आयुक्तांनी नजर ठेवावी.

११) टँकरची उपाययोजना ही अतिशय खाचक असून त्यामुळे कोणत्याही प्रकारची मत्ता निर्माण होत नाही. सबब ही उपाययोजना अपरिहार्य परिस्थितीतच मंजूर व्हावी अशी अपेक्षा असते. मागील काही वर्षात या उपाययोजनेवरील खर्च मोठया प्रमाणात वाढला आहे. टंचाईग्रस्त भागास पाणी पुरवठा करतेवेळी वाहतूकदारांचा निव्वळ व्यापारी दृष्टीकोनातून नफा करुन घेण्याचा हेतू नसावा. सामाजिक बांधिलकीच्या नात्याने टंचाईच्या बिकट परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रत्येक वाहतूकदारांचे सक्रिय सहकार्य असावे, या बाबी जिल्हाधिका-यांनी पुरवठादारांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

१२) जिल्हयात ज्या ठिकाणी टँकर्स /बैलगाडी/होडी इ. साधनांद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात असेल, त्या ठिकाणी होणा-या पिण्याच्या पाण्याच्या पुरवठयाची तपासणी करुन टी.सी.एल. पावडर, पोटॅशिअम परमँगनेट इ. औषधे टाकून ते शुध्द करुन घेण्याची दक्षता घ्यावी. त्याच प्रमाणे पाणी पुरवठा करण्यासाठी वापरण्यात येणारे टँकर्स हे स्वच्छ आहेत याची खात्री ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने करुन घ्यावी

१३) वित्त विभाग शासन शुध्दीपत्रक क्र मकोनि १०९७/प्र.क्र.१६०/९७/कोशा-४, दि.६ ऑक्टोबर २००० नुसार लेखाशीर्ष २२४५ - नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य या लेखाशीर्षाखालील देयकांची प्रदाने, तरतूद उपलब्ध नसल्याच्या परिस्थितीत कार्यालय प्रमुखांनी अनुदान प्राप्त करुन घेण्याबाबत लेखी हमी दिल्यास व मागणी अन्यथा योग्य असल्यास, कोषागार अधिका-याने प्रदाने नाकारु नयेत, अशी तरतूद आहे. लेखाशीर्ष "२२४५-नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य" या लेखाशीर्षाखाली ज्या ज्या वेळी अनुदान उपलब्ध नसेल परंतु पाणी टंचाई निवारणार्थ टँकर/बैलगाडी चालू ठेवणे अपरिहार्य असेल अशावेळी विभागीय आयुक्तांकडे अनुदानाची मागणी करावी व तरतूद उपलब्ध होईपर्यंत, वित्त विभागाच्या उपरोक्त शुध्दीपत्रकानुसार कोषागारातून अनुदान

मंजूर करून घ्यावे आणि टँकरच्या डिझेल /वंगणाची देयके मागविण्यात यावीत. सदर तरतूद लक्षात घेऊन पाणी टंचाई कालावधीत कोठेही अनुदानाअभावी टँकर बंद पडणार नाही याची दक्षता घ्यावी.

२ एकंदरीत, टँकरद्वारे होणारा पाणी पुरवठा सुरळीत व्हावा व त्यावरील शासकीय खर्च मर्यादित रहावा, यासाठी उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि.शं.धुमाळ)
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

प्रत,

*मा.राज्यपालांचे सचिव,*
*मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव*
*मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,*
*सर्व विभागीय आयुक्त,*
*सर्व जिल्हाधिकारी,*
*सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,*
*सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद,*
*सर्व वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,*
*सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद,*
*सर्व विभागीय उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,*
*सर्व विभागीय मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,*
*संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,*
*सर्व मंत्रालयीन विभाग,*
*विभागातील सर्व कार्यासने,*
*महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,*
*महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,*
*महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,*
*महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.*
*निवड नस्ती, पापु.१४.*

राज्यात पाणी टंचाई निर्माण होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना ग्रामस्तरावर राबविण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.टंचाई-१००७/प्र.क्र.१९७ /पापु-१४**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- २७ फेब्रुवारी,२००८**

पहा :- १. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई- ३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४ दि.१ फेब्रुवारी, १९९९.
२. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई-२०९९/प्र.क्र.१४/पापु-१४ दि.२ फेब्रुवारी, १९९९.
३. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई-१०९९/प्र.क्र.१२/पापु-१४ दि.३ फेब्रुवारी, १९९९.
४.शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई-३०००/प्र.क्र.१५९/पापु-१४ दि.२८ सप्टेंबर,२०००

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्याच्या निमिर्तीपासून ग्रामीण् व नागरी भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांबरोबरच जलस्वराज्य, स्वजलधारा, महाजल, शिवकालीन पाणी साठवण योजना यासारख्या महत्वांकाक्षी योजना राबविण्यात येत आहेत. याप्रमाणे कार्यवाही करुन देखील राज्याच्या काही भागांमध्ये प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती, अनियमित व अपुरे पर्जन्यमान व इतर अनुषंगिक बाबीमुळे दरवर्षी पिण्याच्या पाण्याची टंचाई उद्‌भवते व तेथे पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत संदर्भ क्र.१, २ व ३ येथील स्थायी आदेशानुसार ग्रामीण भागात विंधण विहिर घेणे, नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे, विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे, तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे, बुडक्या घेणे, विहिरीची खोली वाढविणे/गाळ काढणे, खाजगी विहिरी अधिग्रहीत करणे, टँकरने पाणी पुरवठा करणे या उपाययोजना तर नागरी भागात तातडीच्या उपाययोजना मोठया प्रमाणावर घ्याव्या लागतात.

यासाठी, राज्यातील ज्या गावात सातत्याने पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासते व त्यामुळे टँकर लावावे लागतात अशा गावांसाठी उपलब्ध पाणी साठयात वाढ करणे, भूजल अधिनियम, १९९३ व त्याखालील नियम, १९९५ मधील तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे व पाण्याचे मागणी व्यवस्थापन स्थानिक स्तरावर करणे अशी त्रिसूत्री योजना राबविण्याच्या सूचना संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापि, त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही.

पाणी पुरवठयाच्या सुधारित धोरणानुसार, राज्यात लोकसहभाग व मागणी आधारित पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तथापि. पाणी टंचाई निवारण कार्यक्रम हा पूर्णत: शासकीय यंत्रणेमार्फत लोकसहभागाशिवाय राबविला जातो. असे निदर्शनास आले आहे की, पाण्याची टंचाई उद्‌भवल्यावर

करावयाच्या उपाय योजनांवर भर दिला जातो, मात्र पाणी टंचाई उद्भवू नये म्हणून ज्या विविध उपाययोजना करणे अपेक्षित आहे त्यावर पाहिजे तेवढा भर दिला जात नाही. त्यामुळे ज्या गावांमध्ये पाणी टंचाई निवारणाच्या उपाययोजना राबविल्या जातात, त्याच गावांमध्ये पुन्हा पुन्हा पाणी टंचाई निर्माण होत असते. वस्तुत: पाणी टंचाई उद्भवू नये म्हणून करावयाच्या उपाययोजना प्रभावीपणे अंमलात आणल्या तर राज्यातील पाणी टंचाईच्या परिस्थितीवर मात करता येईल. यासाठी शासकीय यंत्रणे बरोबरच ग्रामस्थांच्या सक्रीय सहभागाची व सहकार्याची आवश्यकता आहे.

राज्यात दरवर्षी निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी, गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यानंतर, पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत कोणतीही उपाययोजना घेतल्यास त्याबरोबरच, पुढील वर्षी त्या गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून ग्रामस्तरावरुन जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांबरोबरच शिवकालीन पाणी साठवण योजना, जलपुर्नभरण कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीवर टाकून ग्रामस्थांच्या सहकार्याने पाणी टंचाई निवारक मोहिम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार, ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी उपाययोजना राबविण्यासाठी खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयात, नमूद केल्यानुसार, प्रत्येक जिल्हयात पावसाळा संपल्यानंतर जिल्हयाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्यामार्फत संबंधित भागातील सरासरी वार्षिक पर्जन्यमान, चालू पावसाळयात पर्जन्यमानातील फरक, संबंधित भागातील निरिक्षण विहिरींच्या माहितीवरुन भूजलाच्या पातळीमध्ये झालेली घट / वाढ इत्यादी बाबींचा अभ्यास करुन पुढील उन्हाळयात जिल्हयातील पाणी टंचाई भासण्याची शक्यता असणाऱ्या गावांची/वाडयांची यादी तयार करण्यात येते. **भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने अशी यादी तयार करतांना, ती पाणलोट क्षेत्र निहाय व गाव निहाय तयार करावी.**

२) अशी यादी, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने जिल्हाधिकारी यांना सादर करावी. जिल्हाधिकारी हे महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम, १९९३ च्या कलम ४ अन्वये, पिण्याच्या पाण्याची टंचाई जाहीर करतात. जिल्हाधिकारी यांनी पाणी टंचाई जाहिर करण्यापूर्वी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून प्राप्त अहवालानुसार **जिल्हयातील १) ज्या तालुक्यात कमी पर्जन्यमान झाले आहे, २) जेथे सातत्याने टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो, ३) जेथे पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोत परिसरातील भूपृष्ठीय व भूशास्त्रीय स्थिती अनुकूल नाही, या पैकी कोणतीही बाब लागू होत असेल, त्या ग्रामपंचायतींना संबंधित तालुक्याच्या तहसिलदारांमार्फत संबंधित गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई का घोषित करण्यात येऊ नये या संदर्भात पत्राव्दये विचारणा करण्यात यावी.** सदर पत्रामध्ये पाणी टंचाई जाहिर केल्यानंतर, भूजल अधिनियमातील कलम ३ नुसार घोषित केलेल्या सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताच्या ठिकाणापासून ५०० मीटरच्या अंतरात, पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजना व्यतिरिक्त, इतर प्रयोजनासाठी, जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय विहिर खोदता येणार नाही, तसेच कलम ५ नुसार पिण्याच्या पाण्याच्या उद्भवापासून १ कि.मी.च्या परिसरात असणाऱ्या

स्त्रोताच्या उपशावर निर्बंध आणण्यात येतील, कलम ७ नुसार जे अति उपशाचे पाणलोट क्षेत्र असेल त्या क्षेत्रात पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजना व्यतिरिक्त, इतर प्रयोजनासाठी, जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय विहिर खोदता येणार नाही . कलम, ८ नुसार अति उपशाच्या पाणलोट क्षेत्रातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या उद्भवावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या विहिरीमधील पाण्याचा उपसा दि. १ फेब्रुवारी ते ३१ जुलै पर्यंत बंद करण्यात येईल, तसेच कलम ९,१६ चे काटेकोरपणे अंमलबजावणीबाबत व त्यामुळे होणाऱ्या परिणामांची स्पष्ट कल्पना देण्यात यावी. तसेच, सदर पत्रामध्ये पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत कोणतीही उपाययोजना घेतल्यास त्याबरोबरच, पुढील वर्षी त्या गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून ग्रामस्तरावरुन जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांबरोबरच "शिवकालीन पाणी साठवण योजना", जलपुर्नभरण कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची व विशेषतः ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची राहील, अशी स्पष्ट कल्पना देण्यात यावी. **ही कार्यवाही १५ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण करण्यात यावी.**

३) ऑक्टोबर महिन्याच्या तिसऱ्या आठवडयात, जिल्हा परिषदेकडील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील संबंधित शाखा अभियंता यांनी गावातील पिण्याच्या पाण्याचे सर्व हातपंप चालू आहेत अथवा कसे, त्यात, १२० फूट खोलीपर्यंत पाईप आहेत कां याची खात्री करुन घ्यावी. संबंधित गावात महसूल विभागाचे व पंचायत समितीचे अधिकारी , जिल्हा परिषदेकडील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील सहाय्यक/कनिष्ठ भूवैज्ञानिक, शाखा अभियंता आणि ग्रामस्तरावरील तलाठी, ग्रामसेवक यांनी ग्रामसभा आयोजित करुन, **ग्रामपंचायतीच्या पत्रानुसार गावांमध्ये पाणी टंचाई घोषित केल्यास, भूजल अधिनियमातील लागू होणाऱ्या तरतूदी व ग्रामस्तरीय पाणलोटातील पाण्याचा ताळेबंद, जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांबरोबरच स्त्रोत बळकटीकरणासाठी शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत उपाययोजना, जलपुर्नभरण कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी ग्रामस्थांवर येणार असल्याची कल्पना ग्रामस्थांना दयावी व याबाबत ग्रामसभेचा ठराव मंजूर करुन घेण्यात यावा. जलसंधारण व जलपुर्नभरण कामाकरिता लागणारे मनुष्यबळ उपलब्ध करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत व पाणी पुरवठा समितीची राहील. या कार्यक्रमाकरिता कामाचे महिने व आवश्यक मनुष्यबळाबद्दल ग्रामसभेमध्ये चर्चा करुन निर्णय घ्यावा.**

४) त्यानंतर, सदर गावामध्ये भविष्यात पाणी टंचाई निर्माण होऊ नये म्हणून शासनाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार उपलब्ध असलेल्या निधीतून जलसंधारणाचे तसेच जलपुनर्भरणाचे कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने योग्य नियोजन करणेसाठी जिल्हा परिषदेकडील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील कार्यकारी अभियंता व सहायक भूवैज्ञानिक यांचे मार्गदर्शनाखाली **गावाने सविस्तर जलसंधारण व जलपुर्नभरण योजनांचा समावेश असलेला टंचाई प्रतिबंधक आराखडा तयार करावा.**

५) **ग्रामपंचायतीकडून सदर गावात पाणी टंचाई घोषित करण्याबाबतचा ग्रामसभेचा ठराव प्राप्त करुन घ्यावा.** सदर ठराव प्राप्त झाल्यानंतरच **जिल्हाधिकारी यांनी त्या गावामध्ये ३१ ऑक्टोबर पर्यंत भूजल अधिनियमाच्या कलम ४ मधील तरतूदीनुसार पाणी टंचाई घोषित करण्याची कार्यवाही करावी** व तेथे पाणी टंचाई निवारणासाठी संदर्भ क्र.१ व ३ येथील स्थायी आदेशानुसार, विंधण विहिर घेणे, नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे, विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे, तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे,

बुडक्या घेणे, विहिरीची खोली वाढविणे/गाळ काढणे, खाजगी विहिरी अधिग्रहीत करणे, टँकरने पाणी पुरवठा करणे या पैकी आवश्यक त्या उपाययोजना पूर्वीप्रमाणे घ्याव्यात.

६) **गावामध्ये पाणी टंचाई निवारक उपाययोजना सुरु केल्यानंतर, त्या बरोबरीनेच ग्रामपंचायतीने वर नमूद केल्यानुसार टंचाई प्रतिबंधक आराखडयातील जलसंधारण व जलपुनर्भरणाच्या उपाययोजना, रोजगार हमी योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अथवा इतर अनुषंगिक योजनांच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची मान्यता घेऊन राबविण्याची कार्यवाही सुरु करावी.** या कामांच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीने आवश्यक संख्येत मजूर उपलब्ध करावे.

७) **भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेल्या यादीतील गावांव्यतिरिक्त अन्य गावांकडूनही पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेण्याची मागणी आल्यास, सदर गावांमध्ये पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत उपाययोजना मंजूर करताना, गावांना वरीलप्रमाणे पाणी टंचाई प्रतिबंधात्मक आराखडा तयार करुन सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता घेऊन, जलसंधारण व जलपुनर्भरणाच्या योजना उपनिर्देशित १ ते ६ परिच्छेदामधील सूचनांनुसार राबविणे बंधनकारक असेल.**

वरील कार्यक्रम राबविण्यासाठी कालबध्द कार्यक्रम व जबाबदारी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या सहपत्राप्रमाणे राहील.

तत्पूर्वी जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, सहायक भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा आणि ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी जिल्हयातील अवर्षण प्रवणग्रस्त भागातील अतिविकसित पाणलोटातील गावे व जेथे सातत्याने टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो, जेथे पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोत परिसरातील भूपृष्ठीय व भूशास्त्रीय स्थिती अनुकूल नाही, अशा सर्वेक्षण करुन तेथे जलसंधारण व जलपुनर्भरणाच्या योजना घेण्याबाबतचा संभाव्य टंचाई प्रतिबंधक कृती आराखडा तयार करुन ठेवावा. यासाठी संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे मार्गदर्शन घ्यावे.

सदर शासन निर्णय नियोजन विभाग (रो.ह.यो.), ग्राम विकास व जलसंधारण विभाग (जलसंधारण ) व महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन ) यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय शासनाच्या w.w.w.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०२२७१७४०२२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजितकुमार जैन)
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव

ISSUED
Date 28/2/2008

D:\WS१४B\GR २००७\CR११७ -२००७ water scarcity preventive measure- Revised.doc

३. मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.प्रधान सचिव जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. मा.प्रधान सचिव नियोजन विभाग (रोहयो ),मंत्रालय, मुंबई
६. मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन ), मंत्रालय, मुंबई
७. सर्व विभागीय आयुक्त
८. सदस्य सचिव,(तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
९. कृषि आयुक्त, पुणे
१०. संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
११. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
१२. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१३. जिल्हाधिकारी, (सर्व)
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व )
१५. कृषि सहसंचालक (सर्व)
१६. अधिक्षक, कृषि अधिकारी (सर्व)
१७. उपविभागीय कृषि अधिकारी (सर्व)
१८. पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१९. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा ( सर्व )
२०. सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
२१. सर्व जिल्हयांचे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हापरिषद,
२२. सर्व कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हापरिषद
२३. प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामविकास यंत्रणा
२४. सर्व गट विकास अधिकारी
२५. मंत्रालयातील सर्व विभाग
२६. विभागातील सर्व कार्यासने
२७. निवडनस्ती पापु-१४

## सहपत्र

**शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई १००७/प्र.क्र.१९७/पापु१४, दिनांक २७ फेब्रुवारी २००८ चे सहपत्र**

**टंचाई प्रतिबंधक उपाययोजना राबविण्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम**

| बाब | अंमलबजावणी करणारी यंत्रणा | कालमर्यादा |
|---|---|---|
| १) पुढील उन्हाळयात टंचाई भासण्याची शक्यता असणाऱ्या गावांची/वाडयांची यादी तयार करणे व जिल्हाधिकाऱ्यास /जिल्हा परिषदेस सादर करणे. | संबंधित जिल्हयांचे वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा. | १ आक्टोबर पर्यंत |
| २) जिल्हाधिकारी यांनी जिल्हयातील ग्रामपंचायतींना संबंधित तालुक्याच्या तहसिलदारामार्फत गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई का जाहीर करु नये याबाबत पत्र पाठविणे | जिल्हाधिकारी, संबंधित तालुक्याचे तहसिलदार | १५ ऑक्टोबर पर्यंत |
| ३. गावांमध्ये पाणी टंचाई घोषित केल्यास, भूजल अधिनियमातील लागू होणाऱ्या तरतूदी व ग्रामस्तरीय पाणलोटातील पाण्याचा ताळेबंद, जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांबरोबरच स्त्रोत बळकटीकरणासाठी शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत उपाययोजना, जलपुर्नभरण कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी ग्रामस्थांवर येणार असल्याची कल्पना ग्रामस्थांना देणे तसेच याबाबत ग्रामसभेचा ठराव मंजूर करुन घेणे, जलसंधारण व जलपुर्नभरण कामाकरिता लागणारे मनुष्यबळ उपलब्ध करणे व कामाचे महिने व आवश्यक मनुष्यबळा बद्दल चर्चा करुन कार्य आराखड्याबद्दल निर्णय घेणे यासाठी **ग्रामसभा आयोजित करणे** | जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अधिकारी, महसूल विभागाचे अधिकारी , सहायक/कनिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, शाखा अभियंता, तलाठी, ग्रामसेवक | ऑक्टोबरचा तिसरा आठवडा |
| ४. गावनिहाय सविस्तर जलसंधारण व जलपुर्नभरण योजनांचा समावेश असलेला टंचाई प्रतिबंधक आराखडा तयार करणे | ग्रामपंचायत, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व सहायक भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा. | ऑक्टोबरचा तिसरा आठवडा |
| ५. संबंधित गावात पाणी टंचाई घोषित करणे व टंचाई कृती आराखड्यास मान्यता देणे. | जिल्हाधिकारी | ३१ ऑक्टोबर पर्यंत |
| ६. गावात टंचाई निवारणार्थ उपाययोजना आवश्यकतेनुसार राबविणे व जलसंधारण, जलपुर्नभरण योजनासमाविष्ट असलेल्या टंचाई प्रतिबंधात्मक आराखडा राबविणे. | जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद व ग्रामपंचायत . | नोव्हेंबर ते जून |

पाणी टंचाई निवारणार्थ टंचाई कृती आराखडे तयार करणे व अंमलबजावणी करण्यासंदर्भात सूचना.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन परिपत्रक क्र. टंचाई १००८/प्र.क्र.१६८ /पापु १४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २४ ऑक्टोबर,२००८.

वाचा :- १) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाई ३०९९/प्र.क्र.१३/पापु१४ दि.१ फेब्रुवारी १९९९
२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाई १०९९/प्र.क्र.१२/पापु१४ दि.३फेब्रुवारी १९९९
३) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाई १००७/प्र.क्र.१९७/पापु१४ दि.२७ फेब्रुवारी,२००८
४) महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियम) अधिनियम,१९९३ व नियम १९९५

परिपत्रक :-

राज्यामध्ये येत्या उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन, जिल्हयात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता असलेल्या गावे/वाडयांसाठी पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत उपाययोजना घेण्यासाठी टंचाई निवारण कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना संदर्भ क्र.२ स्थायी आदेशान्वये देण्यात आलेल्या आहेत. टंचाई कृती आराखडे तयार करण्याचा उद्देश हा टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत किमान खर्चाच्या उपाययोजना घेऊन प्रत्यक्षात उन्हाळयात लोकांना किमान पिण्याचे पाणी तातडीने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने नियोजन करणे हा आहे. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, तयार करण्यात येणारे आराखडे अवास्तव असतात. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणासाठी करावयाच्या तातडीच्या उपाययोजना ठरविताना त्यासाठी होणारा खर्च, त्याचा भविष्यात होणारा फायदा तसेच त्या उपाययोजना कार्यान्वित करण्यासाठी लागणारा वेळ या बाबींचा विचार करण्यात येत नाही. टंचाई कृती आराखडे मूळात कालबध्द कार्यक्रमानुसार वेळेत केले जात नाही अथवा टंचाई कृती आराखडयात प्रस्तावित उपाययोजनांना मंजूरी उशीराने मिळाल्याने व त्यामुळे प्रत्यक्षात अंमलबजावणी उशीराने होत असल्यामुळे ऐन उन्हाळयात लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही. आराखडयानुसार पत्यक्षात सुमारे ५० टक्क्यापेक्षा कमी पाणी टंचाई उपाययोजनांची अंमलबजावणी होते.

सर्वसमावेशक पॅकेजच्या माध्यमातून पाणी टंचाईवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी भूजल कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, तद्नंतर पाणी टंचाई निवारण उपाययोजना व प्रतिबंधात्मक उपाययोजना यांचा अंतर्भाव असलेला शासन निर्णय संदर्भ क्र.३ येथील निर्गमित करुन त्याअन्वये सदर उपाययोजना

ग्रामस्तरावर राबविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत सदर सूचना व उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन कायमस्वरुपी टंचाईवर मात करण्यासाठी व वस्तुनिष्ठ टंचाई कृती आराखडे तयार करण्यासंदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम,१९९३ व नियम १९९५ नियम ३ नुसार सर्वप्रथम जिल्हयातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत घोषित करावेत. यासाठी सर्वप्रथम संबंधित गावाच्या ग्रामसेवकाने गावातील अस्तित्वातील सार्वजनिक स्त्रोतांची यादी तयार करावी व ती गावातील तलाठ्याकडून गांव नमुना १४ मधील नोंदीचा आधार घेऊन अद्ययावत करुन ती जिल्हा परिषदेला सादर करावी. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांनी वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या तालुकानिहाय व गांवनिहाय याद्या जिल्हाधिकारी यांचेकडे सादर कराव्यात. जिल्हाधिकारी यांनी भूजल अधिनियमांतील तरतुदीनुसार तात्काळ स्त्रोत घोषित करण्याबाबतची कार्यवाही करावी.

२) संबंधीत गावाच्या तलाठयांनी गावातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या साधनांच्या नोंदी गाव नमुना १४ मध्ये अद्ययावत ठेवण्याबरोबरच खाजगी विहिरी व बोअरवेल च्या नोंदी सात बारावर घ्याव्यात.

३) संदर्भ क्र.२ येथील शासन स्थायी आदेशान्वये दिलेल्या सूचनेनुसार वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, यांनी येत्या उन्हाळयात जिल्हयातील पाणी टंचाई भासण्याची शक्यता असणाऱ्या गांवे/वाडयांची पाणलोट क्षेत्र निहाय व गावनिहाय यादी जिल्हाधिकारी यांना सादर करावी.

४) जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम, १९९३ च्या कलम ४ अन्वये, पिण्याच्या पाण्याची टंचाई जाहिर करण्यापूर्वी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून प्राप्त अहवालानुसार जिल्हयातील १) ज्या तालुक्यात कमी पर्जन्यमान झाले आहे किंवा भूजल पातळीत लक्षणीय घट झाली आहे २) जेथे सातत्याने टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो, ३) जेथे पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोत परिसरातील भूपृष्ठीय व भूशास्त्रीय स्थिती अनुकूल नाही, ४) तद्वतच अहवालाबाहेरील गावांमध्ये देखील काही स्थानिक परिस्थितीमुळे टंचाई भासू शकते. या पैकी कोणतीही बाब लागू होईल या कारणास्तव तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना संबंधित तालुक्याच्या तहसिलदारांमार्फत संबंधित गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई का घोषित करण्यात येऊ नये या संदर्भात पत्रान्वये विचारणा करण्यात यावी . संबंधित गावात टंचाई जाहिर केल्यानंतर टंचाई निवारणार्थ उपाययोजना घ्यावयाची झाल्यास,त्यांना दि.२७ फेब्रुवारी,२००८ च्या शासन निर्णयानुसार भूजल कायदयाची अंमलबजावणी व प्रतिबंधात्मक उपाययोजना घेणे बंधनकारक असल्याची स्पष्ट कल्पना उक्त पत्रामध्ये देण्यात यावी. (पत्राचा नमुना

**व ग्रामसभेच्या ठरावाचा नमुना सोबत जोडला आहे. ) तसेच ग्रामपंचायतींना टंचाई प्रतिबंधात्मक आराखडे दोन भागात तयार करण्यास सांगण्यात यावे. भाग१ मध्ये पेयजल स्त्रोत बळकटीकरणाच्या उपाययोजना (शिवकालीन पाणी साठवण योजनेच्या कार्यपध्दतीनुसार ) व भाग २ मध्ये भूजल संपत्तीच्या उपलब्धतेत सातत्य राहण्यासाठी राबवावयाच्या जलसंधारण व जलपुनर्भरण योजनांचा समावेश असावा. सदर आराखडे तयार करताना गावाने जिल्हा परिषदेतील पाणी पुरवठा विभागातील अधिकारी तसेच तसहिलदार व गटविकास अधिकारी, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे अधिकारी तसेच कृषि अधिकारी यांची मदत घ्यावी.**

५) तहसीलदारांनी तालुका स्तरावर टंचाई कृती आराखडयाचे प्रारुप तयार करण्यासाठी प्रचलित पध्दतीनुसार तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवक, तलाठी व लोकप्रतिनिधींची बैठक घ्यावी. सदर बैठकीस आवश्यक असणा-या सर्व अधिका-यांना आमंत्रित करावे. या बैठकीस येताना ग्रामपंचायतींना अनुक्रमांक ४ मध्ये नमूद केल्यानुसार भाग- १ व २ मधील टंचाई प्रतिबंधात्मक आराखडयांचे प्रारुप तसेच दि.३ फेब्रुवारी १९९९ च्या स्थायी आदेशातील प्रपत्र अ व ब मधील परिपूर्ण माहिती व पिण्याच्या पाण्याची टंचाई घोषित करण्याबाबतचा ग्रामसभेचा ठराव घेऊन येण्यास सांगावे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतरच **जिल्हाधिकारी यांनी त्या गावामध्ये ३१ ऑक्टोबर पर्यंत भूजल अधिनियमाच्या कलम ४ मधील तरतूदीनुसार पाणी टंचाई घोषित करण्याची कार्यवाही करावी,** व तेथे पाणी टंचाई निवारणासाठी स्थायी आदेशानुसार, नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे, विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे, तात्पुरत्या पूरक नळ योजमा घेणे, बुडक्या घेणे, विहिरीची खोली वाढविणे/गाळ काढणे, खाजगी विहिरी अधिग्रहीत करणे, नवीन विंधण विहिर घेणे, टँकरने पाणी पुरवठा करणे या पैकी आवश्यक उपाययोजना टंचाई कृती आराखडयात प्रस्तावित करावी. टंचाई निवारण उपाययोजनेची निवड करताना ती उपलब्ध माहिती, संभाव्य टंचाई कालावधी व स्थानिक परिस्थितीचा विचार करता किमान खर्चाचा असेल याची दक्षता घेण्यात यावी.

६) महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम,१९९३ ची अंमलबजावणी अंतर्गत कलम ३ नुसार ५०० मीटर अंतराची तसेच कलम ४ नुसार १ कि.मी. पर्यंतच्या क्षेत्रातील विहिरींच्या उपशावर निर्बंध आणणेकरीता आवश्यक असणारे अंतर महसूल अधिका-यांमार्फत निश्चित करुन घेण्यात यावे. कायदयांतर्गत तरतुदींचे उल्लंघन होत असल्यास रिपोर्ट करण्याची जबाबदारी ग्रामपंचायती समवेत ग्रामसेवक / तलाठी यांचीही असेल.

७) टंचाई कृती आराखडे तयार करण्याचा उद्देश हा टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत किमान खर्चाच्या उपाययोजना घेऊन प्रत्यक्षात उन्हाळयात लोकांना किमान पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने नियोजन करणे हा आहे. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणासाठी करावयाच्या तातडीच्या उपाययोजना ठरविताना त्यासाठी होणारा खर्च, त्याचा भविष्यात होणारा फायदा तसेच त्या उपाययोजना कार्यान्वित करण्यासाठी लागणारा वेळ इ.बाबींचा विचार करण्यात यावा.

८) ऑक्टोबर ते जून या संपूर्ण टंचाई कालावधीकरीता ऑक्टोबर ते डिसेंबर, जानेवारी ते मार्च व एप्रिल ते जून असे वस्तुनिष्ठ त्रैमासिक आराखडे तयार करावेत. हे आराखडे संपूर्ण टंचाई कालावधीकरीता Realistic Rolling Plan स्वरुपाचे असावेत. त्यासाठी ते भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या जानेवारी व मार्च महिन्यातील भूजल पातळीच्या अहवालानुसार जानेवारी ते मार्च व एप्रिल ते जून या त्रैमासिकासाठी तालुका स्तरावरील बैठकांमध्ये सुधारीत करण्यात यावेत. पहिल्या टप्प्यात ऑक्टोबर ते डिसेंबर या महिन्यात पाणी टंचाई भासणाऱ्या गावांचे आराखडे तयार करुन त्यात प्रस्तावित उपाययोजनांना तात्काळ मंजूरी देऊन, आराखडयातील प्रस्तावित उपाययोजना डिसेंबर अखेर पर्यंत पूर्ण कराव्यात. सर्व टप्प्यातील नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे, तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे या उपाययोजना पूर्ण करण्यासाठी लागणारा कालावधी, निविदा प्रक्रिया इ.चा आढावा घेऊन या उपाययोजना पहिल्या तिमाहीत प्रस्तावित करण्यात याव्यात. योजनेसाठी निविदा प्रक्रिया, साहित्याची उपलब्धता इ.सर्व बाबी लक्षात घेऊन, योजना प्रत्यक्षात कार्यान्वित होण्यासाठी लागणारा कालावधी स्पष्टपणे नमूद करण्यात यावा. योजना कार्यान्वित होण्यास लागणारा कालावधी मोठा असल्यास व प्रत्यक्षात उन्हाळयात योजनेचा फायदा होणार नसेल तर अशा योजनांना पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत मंजूरी देण्यात येऊ नये. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हापरिषद यांनी योग्य नियोजन करुन व त्या त्या त्रैमासिक कालावधीचे टंचाई कृती आराखडे योग्य वेळी जिल्हाधिकारी यांचेकडे सादर होतील याची दक्षता घ्यावी.

९) जिल्हाधिकारी यांनी टंचाई कृती आराखडयांना प्रपत्र "ब" चे अधिन राहून तात्काळ मंजूरी दयावी. आराखडयात प्रस्तावित उपाययोजनांचे मंजूरी आदेश तात्काळ निर्गमित करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी, या संदर्भात प्रस्तावित टंचाई उपाययोजनांची प्राकलने व आराखडे संबंधित विभागांकडून प्राप्त करुन घेऊन त्यास मंजूरी देण्यात यावी, जेणेकरुन कोणत्याही परिस्थितीत एक महिन्याच्या आत कामे पूर्ण होऊन प्रत्यक्ष उन्हाळयात जनतेला पाणी मिळेल.

मंजूरी देण्यात यावी. जेणेकरून कोणत्याही परिस्थितीत एक महिन्याच्या आत कामे पूर्ण होऊन प्रत्यक्ष उन्हाळयात जनतेला पाणी मिळेल.

१०) कोणत्याही परिस्थितीत त्या त्या त्रैमासिक कालावधीच्या आराखडयांना पहिल्या आठवडयात मंजूरी देण्याची व दुसऱ्या आठवडयात उपाययोजनांचे मंजूरी आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी.

**११) टंचाई प्रतिबंधात्मक आराखडयाची अंमलबजावणीची कार्यपध्दती -**

**प्रतिबंधात्मक आराखडा भाग-१** - ग्रामपंचायतींनी सादर केलेले पेयजल स्त्रोत बळकटीकरण आराखडा हा वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचेकडे सादर करण्यात यावा. वरिष्ठ भूवैज्ञानिक यांनी शिवकालीन पाणी साठवण योजनेच्या कार्यप्रणालीच्या आधारे कामाची प्राकलने संबंधित गावाकडून तयार करवून घेऊन त्यास मंजूरी देण्याची व अंमलबजावणीची कार्यवाही पावसाळयापूर्वी करावी. या कामांचा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी शिवकालीन पाणी साठवण योजनेच्या मासिक सभेत आढावा घ्यावा.

**प्रतिबंधात्मक आराखडा भाग-२** - ग्रामपंचायतींनी सादर केलेला भूजल संपत्तीच्या उपलब्धतेतील सातत्यतेचा (Sustainability) आराखडा हा गट विकास अधिकारी यांना सादर करावा. हा आराखडा पाणलोटाधारीत माथा ते पायथा या तत्वाशी सुसंगत असावा. गट विकास अधिकारी व तहसिलदार यांनी सदर आराखडयातील कामांचा समावेश महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मग्रारोहयो) आराखडयात झाला आहे याची खात्री करावी व मग्रारोहयोतील कामांच्या कार्यप्रणालीनुसार अंदाजपत्रकांची मंजूरी व अंमलबजावणी पुढील पावसाळयापूर्वी करवून घ्यावी. याबाबतचा मासिक आढावा जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी घ्यावा. ग्रामपंचायतींनी या कामांसाठी आवश्यक असणारे मजूर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.

**वरील प्रतिबंधात्मक आराखडयासाठी वेगळयाने निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.** त्या त्या योजनांसाठी नियमित कार्यक्रमांतर्गत उपलब्ध निधीतून वरील कामे करण्यात यावीत. ज्या ग्रामपंचायती टंचाई प्रतिबंधात्मक आराखडयाची अंमलबजावणी करणार नाहीत, अशा ग्रामपंचायती टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत उपाययोजना घेण्यास आगामी काळात अपात्र ठरतील.

विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या नियमित होणाऱ्या बैठकीत टंचाई संदर्भात वरील प्रतिबंधात्मक आराखडयाच्या अंमलबजावणीचा देखील आढावा घ्यावा.

१२) पाणी टंचाई निवारण कृती आराखडा व टंचाई प्रतिबंधात्मक आराखडा व त्याच्या अंमलबजावणी संदर्भात MIS ची प्रपत्रे (अ ते ड) सोबत जोडली आहेत. जिल्हाधिकारी यांनी प्रपत्र अ(१),ब(१),क(१), ड(१) व इ(१) मधील माहिती क्षेत्रीय स्तरावरुन संकलित करुन प्रपत्र अ(२),ब(२),क(२),ड(२) व इ(२) मध्ये शासनास प्रपत्र प्रकाराच्या नियत कालावधीत (मासिक/ त्रैमासिक) सादर करावी .

वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन पाणी टंचाई निवारण कृती आराखडयातील उपाययोजना कार्यन्वित होऊन प्रत्यक्षात उन्हाळयात जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध होऊन पाणी टंचाईचे निवारण होईल व शासकीय निधींचा सुयोग्य उपयोग होईल, याबाबत क्षेत्रीय अधिका-यांनी योग्य ती दक्षता घ्यावी. तसेच टंचाई प्रतिबंधात्मक आराखडयांची अंमलबजावणी करुन भविष्यात पाणी टंचाई निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक शासनाच्या w.w.w.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्या **संगणक संकेतांक २००८१०२४१७५८५६००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(अजितकुमार जैन)
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,
१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव
३. मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.प्रधान सचिव जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. मा.प्रधान सचिव नियोजन विभाग (रोहयो ),मंत्रालय, मुंबई
६. मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन ), मंत्रालय, मुंबई
७. सर्व विभागीय आयुक्त
८. सदस्य सचिव,(तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
९. कृषि आयुक्त, पुणे
१०. संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
११. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
१२. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१३. जिल्हाधिकारी. (सर्व)

१४.मुख्य कार्यकारी अधिकारी. जिल्हापरिषद (सर्व )

१५. कृषि सहसंचालक (सर्व)

१६. अधिक्षक, कृषि अधिकारी (सर्व)

१७. उपविभागीय कृषि अधिकारी (सर्व)

१८. पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)

१९. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा ( सर्व )

२०. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,( सर्व)

२१. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हापरिषद, (सर्व)

२२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)

२३. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हापरिषद ,(सर्व)

२४. प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामविकास यंत्रणा, (सर्व)

२५. उप विभागीय अधिकारी, महसूल (सर्व)

२६. तहसिलदार, (सर्व)

२७. गट विकास अधिकारी,( सर्व)

२८. मंत्रालयातील सर्व विभाग

२९. विभागातील सर्व कार्यासने

३०. निवडनस्ती पापु-१४

## ग्रामपंचायतीला द्यावयाच्या पत्राचा नमुना

## तहसिल कार्यालय, -------

## जिल्हा ------------

जा. क्र.                                                                 दिनांक

प्रति,

मा. सरपंच,

ग्रामपंचायत ------------- ता. -----------------

जिल्हा ------------

विषय -पिण्याच्या पाण्याची टंचाई स्थिती घोषित करणेबाबत विचारणा करणारे व बठकीचे पत्र.

संदर्भ: पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र टंचाई -१००७/प्र.क्र.१९७/पापु-१४ दिनांक २७ फेब्रुवारी २००८

महोदय,

सन ------ साठी पिण्याच्या पाण्यासाठी टंचाई आराखडा तयार करणेसंबंधात दिंनाक --------रोजी ------- वाजता ---------------------------------------- ठिकाणी तालुकास्तरीय बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. कृपया या बैठकीस सरपंच, अध्यक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व ग्रामसेवक यांनी या पत्रात नमुद केलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडून प्राप्त तांत्रिक अहवाल तसेच तालुक्यातील कमी पर्जन्यमान/ आपल्या गावांत टँकरने करावा लागणारा पाणी पुरवठा/ पिण्याच्या पाण्याच्या स्रोत परिसरातील प्रतिकूल भूपृष्ठीय व भूशास्त्रीय स्थिती या कारणास्तव या पत्रासोबत जोडलेल्या संभाव्य पाणी टंचाईच्या यादीतील गावांमध्ये येत्या ऑक्टोबर ते डिसेंबर / जानेवारी ते मार्च / एप्रिल ते जून पर्यंत पिण्याच्या पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता आहे. तदत्त्वतच या यादीच्या बाहेरील गावांमध्ये देखील काही स्थानिक परिस्थितीमुळे अशी टंचाई भासू शकते. तेव्हा आपल्या ग्रामपंचायतीअंतर्गत गावांत पाणी टंचाई भासणार आहे काय व असल्यास अशा गावांत पिण्याच्या पाण्याची टंचाई का घोषित करण्यात येवू नये या संदर्भात या पत्राद्वारे विचारणा करण्यात येत आहे.

ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई भासते तेथे शासनातर्फे टंचाई अंतर्गत ९ उपाययोजनांपैकी आवश्यक व स्थानिक परिस्थिती नुसार अनुकुल अशी उपाययोजना घेतली जाते. या पुढे उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार अशा उपाययोजना घेण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही होणे बंधनकारक आहे.

१. अशा गावांमध्ये महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम १९९३ नसार पाणी टंचाई घोषित होणे आवश्यक आहे.

२. या अधिनियमानुसार

- नियम ३ नुसार सार्वजनीक पिण्याच्या पाण्याचे स्रोत घोषित करणे.
- कलम ३ नुसार अशा घोषित स्रोताच्या ठिकाणांपासून ५०० मीटर अंतरात पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या पुर्व परवानगीशिवाय विहीर खोदता येणार नाही.

- कलम ५ नुसार सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या उदभवापासून १ किमी परिसरात असणाऱ्या स्त्रोताच्या उपशावर निर्बंध आणण्यात येतील.
- कलम ७ नुसार अति उपशाची पाणलोट क्षेत्रे असेल त्या क्षेत्रात पिण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त, इतर प्रयोजनासाठी, जिल्हाधिकाऱ्यांच्या पुर्व परवानगीशिवाय विहीर खोदता येणार नाही.
- कलम ८ नुसार अतिउपशाच्या पाणलोट क्षेत्रातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या उदभवावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या विहिरीमधील पाण्याचा उपसा दिनांक १ फेब्रुवारी ते ३१ जुलै पर्यंत बंद करण्यात येईल.
- कलम १६ नुसार कायद्यातील विविध तरतूदींचा भंग केल्यास दंड व शिक्षेची अंमलबजावणी केली जाईल.

३. पुढील वर्षी आपल्या गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून टंचाई प्रतिबंधक आराखडा तयार करावा लागेल व त्याची अंमलबजावणी त्वरीत सुरु करुन पुढील पावसाळयापूर्वी शक्यतो ती पूर्ण करावी लागेल. टंचाई प्रतिबंधक आराखडयांतर्गत पेयजल स्त्रोत बळकटीकरण आराखडा (भाग १ ) शिवकालीन पाणी साठवण योजनेंतर्गत व भूजल संपत्तीच्या उपलब्धतेत सातत्यतेचा आराखडा (भाग २) हा जलसंधारणाच्या योजना व मग्रारोहयो अंतर्गत राबविण्याचा आहे.

बैठकीस येताना, सोबत जोडलेल्या यादीतील ग्रामपंचायतीनी तसेच या यादीच्या बाहेरील ज्या ठिकाणी इतर स्थानिक कारणामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता आहे अशा ग्रामपंचायतींनी देखील, वरील तीन मुद्दे मान्य असल्याबाबतचा ग्रामसभेचा ठराव, गांव नकाशासहीत भाग १ व भाग २ मध्ये टंचाई प्रतिबंधक प्रारुप आराखडा व गावात उपलब्ध असणाऱ्या सर्व स्त्रोतांबाबतची अद्यावत माहिती आणावयाची आहे .

ज्या ग्रामपंचायती वरील सर्व बाबींची पूर्तता करतील अशाच ग्रामपंचायतांना टंचाइ अंतर्गत उपाय योजनांचा फायदा मिळेल. ज्या ग्रामपंचायतीअंतर्गत प्रशासनाच्या मते टंचाई घोषित करणे आवश्यक आहे परंतु अशी संबधित ग्रामपंचायत जर उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे ग्रामसभेचा ठराव व टंचाई प्रतिबंधक आराखडा सादर करणार नाहीत अशा ग्रामपंचायतीअंतर्गत महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम १९९३ नुसार कलम ४ अंतर्गत पिण्याच्या पाण्याची टंचाई घोषित करण्यात येईल व त्यातील सर्व तरतूदींची प्रशासनातर्फे कडक अंमलबजावणी करण्यात येईल. अशा ग्रामपंचायतींना टंचाई अंतर्गत ९ उपाय योजनांपैकी कोणतीही उपाययोजना मंजूर केली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सहपत्र - १) संभाव्य पाणी टंचाई
भासणाऱ्या गावांची यादी
२) ग्रामसभेच्या ठरावाचा नमुना

(स्वाक्षरी)
तहसिलदार,
----------------

टीप: या पत्राची प्रत मा. आमदार, मा सदस्य, जिल्हा परिषद /पंचायंत समिती तसेच वरिष्ठ भूवैज्ञानिक, पाणी पुरवठा अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, जलसंपदा अधिकारी, तलाठी आदि संलग्न अधिकाऱ्यांना देवून बैठकीस उपस्थित रहाण्याची विनंती करावी.

# पिण्याच्या पाण्याची टंचाई घोषित करण्याबाबतचा ग्रामसभेच्या ठरावाचा नमुना

## ग्रामपंचायत कार्यालय --------

## तालुका -------------, जिल्हा ----------------

दिनांक

ठराव क्र.

आज दिनांक --------------- रोजी झालेल्या ग्रामसभेत सन २० - २० मध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई घोषित करणे व टंचाई निवारणार्थ उपाययोजना राबविणे व टंचाई प्रतिबंधात्मक आराखडा तयार करणे यासर्व प्रक्रियेस सहमती देणेसाठी बहुमताने ठराव करण्यात आला असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचा तांत्रिक अहवाल / तालुक्यातील कमी पर्जन्यमान/ आपल्या गावांत टँकरने करावा लागणारा पाणी पुरवठा/ पिण्याच्या पाण्याच्या स्रोत परिसरातील प्रतिकूल भूपृष्ठीय व भूशास्त्रीय स्थिती / इतर प्रतिकूल स्थानिक परिस्थिती या कारणास्तव या ग्रामपंचायतीअंतर्गत ------- गावांमध्ये येत्या ऑक्टोबर ते डिसेंबर / जानेवारी ते मार्च / एप्रिल ते जून पर्यंत पिण्याच्या पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता आहे. सबब या ठिकाणी महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन)अधिनियम १९९३ अंतर्गत कलम ४ अन्वये पिण्याच्या पाण्याची टंचाई घोषित करण्यात यावी असे जिल्हाधिकारी यांना विनंती करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम १९९३ नुसार खालील बाबींचे पालन ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येईल.

- कलम ३ नुसार अशा घोषित स्रोताच्या ठिकाणांपासून ५०० मीटर अंतरात पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या पुर्व परवानगीशिवाय विहीर खोदली जाणार नाही.
- कलम ५ नुसार सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या उदभवापासून १ किमी परिसरात असणाऱ्या स्रोताच्या उपशावर निर्बंध आणण्यास सहमती आहे.
- कलम ७ नुसार अति उपशाची पाणलोट क्षेत्रे असेल त्या क्षेत्रात पिण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त, इतर प्रयोजनासाठी, जिल्हाधिकाऱ्यांच्या पुर्व परवानगीशिवाय विहीर खोदली जाणार नाही.
- कलम ८ नुसार अतिउपशाच्या पाणलोट क्षेत्रातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या उदभवावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या विहिरीमधील पाण्याचा उपसा दिनांक १ फेब्रुवारी ते ३१ जुलै पर्यंत बंद करण्यात येईल.
- कलम १६ नुसार कायद्यातील विविध तरतूदींचा भंग झाल्यास, दंड व शिक्षेकरिता तहसिलदारांना अशा प्रकरणाबाबत अहवाल / रिपोर्ट त्वरीत करण्यात येईल.

३. या वर्षीच्या पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्मूलनासाठी खालील उपाय योजना प्रशासनामार्फत मंजूर करण्यात याव्यात ही विनंती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | योजनेचे नांव | स्थळ व इतर तपशील |
|---|---|---|
| | | |

४. पुढील वर्षी आपल्या गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून टंचाई प्रतिबंधक आराखडा तयार करण्यास आमची सहमती असून या ठरावासोबत तो तहसिलदारांना सादर करण्यात येत आहे. त्याची अंमलबजावणी त्वरीत सुरु करुन पुढील पावसाळ्यापूर्वी शक्यतो ती पूर्ण करण्यात येईल. टंचाई प्रतिबंधक आराखड्यांतर्गत पेयजल स्रोत बळकटीकरण आराखडा (भाग १ ) शिवकालीन पाणी साठवण योजनेंतर्गत व भूजल संपत्तीच्या उपलब्धतेत सातत्यतेचा आराखडा (भाग २) हा जलसंधारणाच्या योजना व मग्रारोहयो अंतर्गत राबविण्यात येईल.

मग्रारोहयो अंतर्गत करण्यात यावयाच्या कामासाठी मजूर उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची राहिल.

५. टंचाई प्रतिबंधक प्रारुप आराखडयात खालील बाबी अंतर्भूत करण्यासाठी ठराव घेण्यात येत आहे.

शिवकालीन पाणी साठवण योजनेंतर्गत पेयजल स्रोत बळकटीकरण आराखडा (भाग १)

| अ.क्र. | कामाचा प्रकार व संख्या | स्थळ |
|---|---|---|
| | | |

भूजल संपत्तीच्या उपलब्धतेत सातत्यतेचा आराखडा (भाग २)

| अ.क्र. | कामाचा प्रकार व संख्या | स्थळ |
|---|---|---|
| | | |

भाग २ मधील कामांचा समावेश ग्रामपंचायतींच्या मग्रारोहयोच्या आराखडयात करण्यात येत / आलेला आहे.

६. टंचाई प्रतिबंधक आराखडयातील पेयजल स्रोत बळकटीकरण आराखडा भाग १ मधील कामे शिवकालीन पाणी साठवण योजनेमध्ये उपलब्ध होणाऱ्या निधीतून व भूजल संपत्तीच्या उपलब्धतेत सातत्येसाठीच्या आराखडा भाग २ मधील कामे मग्रारोहयो अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून करावयाची आहेत याची आम्हाला जाणीव आहे.

ठराव सूचक -------------------- अनुमोदक --------------------------

(स्वाक्षरी) (स्वाक्षरी)
सरपंच ग्रामसेवक

प्रपत्र अ (१) संभाव्य टंचाई भासणाऱ्या गावे/वाडयातील पाणी टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांचा समावेश असलेला टंचाई कृती आराखडा वर्ष —— ते ——

## गाव निहाय टंचाई कृती आराखडा

१.जिल्हयाचे नावः-

### त्रैमासिक अहवाल

(खर्च लाख रुपये)

| तालुका | (१ ऑक्टोबर ——— ते ३१ डिसेंबर ———) | | | | (१ जानेवारी ——— ते ३१ मार्च ———) | | | | (१ एप्रिल ——— ते ३० जून ———) | | | | एकूण आराखडा १ ऑक्टोबर ——— ते ३०जून ——— | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गावाचे /वाडीचे नाव | सेन्सस कोड नंबर | टंचाई कृती आराखडयात प्रस्तावित केलेली उपाययोजना | प्रस्तावित अंदाजित खर्च | गावाचे/वाडी चे नाव | सेन्सेस कोड नंबर | टंचाई कृती आराखडयात प्रस्तावित केलेली उपाययोजना | प्रस्तावित अंदाजित खर्च | गावाचे नाव | सेन्सेस कोड नंबर | टंचाई कृती आराखडयात प्रस्तावित केलेली उपाययोजना | प्रस्तावित अंदाजित खर्च | गावाचे नाव | सेन्सेस कोड नंबर | टंचाई कृती आराखडयात प्रस्तावित केलेल्या एकूण उपाययोजना | प्रस्तावित अंदाजित एकूण खर्च |
| १ | 1 | | | | | | | | | | | | | | | |
| | 2 | | | | | | | | | | | | | | | |
| २ | 1 | | | | | | | | | | | | | | | |
| | 2 | | | | | | | | | | | | | | | |

१.जिल्हयाचे नावः-

## प्रपत्र अ (२) जिल्हयाचा संकलित आराखडा

### त्रैमासिक अहवाल

(खर्च लाख रुपये)

| उपाययोजना | (१ ऑक्टोबर ——— ते ३१ डिसेंबर ———) | | | | (१ जानेवारी ——— ते ३१ मार्च ———) | | | | (१ एप्रिल ——— ते ३० जून ———) | | | | (एकूण आराखडा १ ऑक्टोबर ——— ते ३०जून ———) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रस्तावित योजनांची संख्या | प्रस्तावित गावे | प्रस्तावित वाडया | आवश्यक खर्च | प्रस्तावित योजनांची संख्या | प्रस्तावित गावे | प्रस्तावित वाडया | आवश्यक खर्च | प्रस्तावित योजनांची संख्या | प्रस्तावित गावे | प्रस्तावित वाडया | आवश्यक खर्च | प्रस्तावित योजनांची संख्या | प्रस्तावित गावे | प्रस्तावित वाडया | आवश्यक खर्च |
| १. विंधण विहीरी/ कूपनलिका घेणे | | | | | | | | | | | | | | | | |
| २. नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे | | | | | | | | | | | | | | | | |
| ३. विंधण विहीरींची विशेष दुरुस्ती करणे | | | | | | | | | | | | | | | | |
| ४. तात्पुरती पुरक नळ योजना घेणे | | | | | | | | | | | | | | | | |
| ५. खाजगी विहीर अधिग्रहीत करणे | | | | | | | | | | | | | | | | |
| ६. विहीरी खोल करणे /गाळ काढणे | | | | | | | | | | | | | | | | |
| ७. बुडक्या घेणे | | | | | | | | | | | | | | | | |
| ८. टँकरने /बैलगाडीने पाणी पुरवठा करणे | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | | | | |

टीप :१) प्रपत्र अ(२) मध्ये प्रत्येक वर्षी ऑक्टोबर अखेर तिन्ही त्रैमासिकाकरीता जिल्ह्यांचा एकत्रित संकलीत आराखडा सादर करावा.

२) जानेवारी ते एप्रिल चा आराखडा निरिक्षण विहिरींच्या आधारे सुधारीत करुन सुधारीत आराखडा सादर करावा.

### प्रपत्र ब (१) टंचाई कृती आराखड्यात प्रस्तावित उपाययोजनांपैकी प्रत्यक्षात घेतलेल्या उपाययोजनांचा तालुका निहाय मासिक प्रगती अहवाल

१.जिल्हयाचे नाव:-

२. महिना :-

| तालुका | गावाचे / वाडीचे नाव | सेन्सस कोड नंबर | टंचाई कृती आराखड्यात प्रस्तावित केलेली उपाययोजना | प्रस्तावित अंदाजित खर्च (रु.लाख) | टंचाई कृती आराखड्यात प्रस्तावित केलेल्या उपाययोजनास मंजूरी दिल्याचा दिनांक | योजना प्रत्यक्ष पूर्ण केल्याचा दिनांक | योजनेवर प्रत्यक्ष झालेला खर्च (रु.लाख) | [illegible] | [illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | | | | | | | | |
| | 2 | | | | | | | | |
| | 1 | | | | | | | | |
| | 2 | | | | | | | | |

### प्रपत्र ब (२) टंचाई कृती आराखड्यात प्रत्यक्षात पूर्ण केलेल्या उपाययोजनांचा जिल्हानिहाय मासिक प्रगती अहवाल

१.जिल्हयाचे नाव -

२. महिना -

(खर्च रु.लाख)

| उपाययोजना | ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीतील कृती आराखड्यात प्रस्तावित उपाययोजनांपैकी मंजूरी दिलेल्या व प्रत्यक्षात पूर्ण केलेल्या उपाययोजना (Progressive) | | | | जानेवारी ते मार्च या कालावधीतील कृती आराखड्यात प्रस्तावित उपाययोजनांपैकी मंजूरी दिलेल्या व प्रत्यक्षात पूर्ण केलेल्या उपाययोजना (Progressive) | | | | एप्रिल ते जून या कालावधीतील कृती आराखड्यात प्रस्तावित उपाययोजनांपैकी मंजूरी दिलेल्या व प्रत्यक्षात पूर्ण केलेल्या उपाययोजना (Progressive) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | | | | २ | | | | ३ | | | |
| | संख्या | गावे | वाड्या | प्रत्यक्ष झालेला खर्च | संख्या | गावे | वाड्या | प्रत्यक्ष झालेला खर्च | संख्या | गावे | वाड्या | प्रत्यक्ष झालेला खर्च |
| १. नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे | | | | | | | | | | | | |
| २. विहिरी खोल करणे /गाळ काढणे | | | | | | | | | | | | |
| ३. विंधन विहिरींची विशेष दुरुस्ती करणे | | | | | | | | | | | | |
| ४. तात्पुरती पुरक नळ योजना घेणे | | | | | | | | | | | | |
| ५. बुडक्या घेणे | | | | | | | | | | | | |
| ६. खाजगी विहीर अधिग्रहीत करणे | | | | | | | | | | | | |
| ७. विंधन विहिरी/ कुपनलिका घेणे | | | | | | | | | | | | |
| ८. टँकरने /बैलगाडीने पाणी पुरवठा करणे | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | |

प्रपत्र क (१) गाव निहाय टंचाई प्रतिबंधात्मक आराखडा

त्रैमासिक अहवाल ऑक्टोबर ते डिसेंबर/जानेवारी ते मार्च/एप्रिल ते जून

(खर्च रु.लाख)

| जिल्हा | तालुका | टंचाई जाहिर केलेल्या गावाचे नाव | सेन्सस कोड नंबर | प्रतिबंधक आराखडा राबविण्यास गाव तयार असल्याबाबतचा ठराव आहे किंवा नाही | भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून जलपुनर्भरणाच्या जलसंधारणाच्या प्रस्तावित केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भाग-१ - शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत पेयजल स्त्रोत बळकटीकरणाची उपाययोजना (पारंपारिक /अपारंपारिक उपाययोजना) | | भाग-२ -भूजल संपत्तीच्या उपलब्धतेत सातत्य राहण्यासाठी राबवावयाच्या जलसंधारणाच्या योजना(नालाबंडीग, सिमेंट बंधारा, गावतळे,शेततळे,साठवण बंधारा,पाझर तलाव,वळण बंधारा, समपातळीचर व इतर ) | |
| | | | | | उपाययोजनेचे नाव | अपेक्षित खर्च | उपाययोजनेचे नाव | अपेक्षित खर्च |
| | | | | | | | | |
| १ | १ | १ | | | | | | |
| २ | २ | २ | | | | | | |
| | | | | | | | | |

प्रपत्र क (२) जिल्ह्याचा संकलित टंचाई प्रतिबंधात्मक कृती आराखडा त्रैमासिक अहवाल- ऑक्टोबर ते डिसेंबर/ जानेवारी ते मार्च/ एप्रिल ते जून

| कालावधी | ऑक्टोबर ते जून | | |
|---|---|---|---|
| टंचाई प्रतिबंधात्मक कृती आराखड्या अंतर्गत जलसंधारण/जलपुनर्भरणाची कामे घेणे | प्रस्तावित उपाययोजनांची संख्या | प्रस्तावित गावे/वाड्या | अंदाजित खर्च |
| भाग-१ -शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत पेयजल स्त्रोत बळकटीकरण | | | |
| १) पारंपारिक उपाययोजना | | | |
| २) अपारंपारिक उपाययोजना | | | |
| भाग-२ -भूजल संपत्तीच्या उपलब्धतेत सातत्य राहण्यासाठी राबवावयाच्या जलसंधारणाच्या योजना | | | |
| १) नालाबंडींग | | | |
| २) सिमेंट बंधारा | | | |
| ३) गावतळे | | | |
| ४) शेततळे | | | |
| ५) साठवण बंधारा | | | |
| ६) पाझरतलाव | | | |
| ७) वळण बंधारा | | | |
| ८) समपातळीचर | | | |
| ९) इतर | | | |
| एकूण भाग-१ व २ | | | |
| एकूण सर्व | | | |

वरील उपाययोजनांसाठी पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत कोणताही निधी प्राप्त होणार नाही. सदर कामे योजनांतर्गत तरतूदीमधून करणे आवश्यक आहे.

(रुपये लक्ष)

| जिल्हा | तालुका | टंचाई जाहिर केलेल्या गावाचे नाव | सेन्सस कोडनंबर | प्रत्यक्षात पूर्ण केलेल्या कामांचा प्रगती अहवाल (Progressive report) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भाग-१ - शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत पेयजल स्त्रोत बळकटीकरणाची उपाययोजना (पारंपारिक /अपारंपारिक उपाययोजना) | | भाग-२ -भूजल संपत्तीच्या उपलब्धतेत शाश्वतता राहण्यासाठी राबवावयाच्या अनुषंगिक उपाययोजना (नालाबंडींग, सिमेंट बंधारा, गावतळे, शेततळे, साठवण बंधारा, पाझर तलाव, वळण बंधारा, समपातळीचर व इतर ) | |
| | | | | प्रत्यक्षात पूर्ण केलेली उपाययोजना उपाययोजनेचे नाव | झालेला खर्च | प्रत्यक्षात पूर्ण केलेली उपाययोजना उपाययोजनेचे नाव | झालेला खर्च |
| | | | | | | | |
| १ | १ | १ | | | | | |
| | | २ | | | | | |

प्रपत्र ड (२) जिल्ह्याच्या टंचाई प्रतिबंधात्मक कृती आराखड्यानुसार प्रत्यक्षात पूर्ण केलेल्या कामांचा प्रगती अहवाल - गोषवारा

महिना-

| | प्रत्यक्षात पूर्ण केलेल्या कामांचा प्रगती अहवाल (Progressive Report) | | |
|---|---|---|---|
| टंचाई प्रतिबंधात्मक कृती आराखड्या अंतर्गत जलसंधारण/जलपुनर्भरणाची कामे येथे | उपाययोजनांची संख्या | गावे/वाड्यांची संख्या | झालेला खर्च |
| भाग-१ -शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत पेयजल | | | |
| १) पारंपारिक उपाययोजना | | | |
| २) अपारंपारिक उपाययोजना | | | |
| भाग-२ -भूजल संपत्तीच्या उपलब्धतेत शाश्वतता राहण्यासाठी | | | |
| १) नालाबंडींग | | | |
| २) सिमेंट बंधारा | | | |
| ३) गावतळे | | | |
| ४) शेततळे | | | |
| ५) साठवण बंधारा | | | |
| ६) पाझरतलाव | | | |
| ७) वळण बंधारा | | | |
| ८) समपातळीचर | | | |
| ९) इतर | | | |
| एकूण भाग-१ व २ | | | |
| एकूण सर्व | | | |

वरील उपाययोजनांसाठी पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत कोणताही निधी प्राप्त होणार नाही. सदर कामे योजनांतर्गत तरतूदीमधून करणे आवश्यक आहे.

भूजल अधिनियम १९९३/नियम १९९५ ची अंमलबजावणी

१) नियम-३(१) - पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत घोषित करणे

| अ.क्र. | तालुका | अहवालाच्या महिन्यात | | | | सुरुवातीपासून अहवालाच्या महिनाअखेर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | गावाचे नांव | सेन्सस कोड नंबर | घोषित केलेले स्त्रोत | | गावाचे नांव | सेन्सस कोड नंबर | घोषित केलेले स्त्रोत | |
| | | | | स्त्रोताचा प्रकार | स्थळ | | | स्त्रोताचा प्रकार | स्थळ |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

२) कलम ३- घोषित केलेल्या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून ५०० मी. अंतरात नवीन विहीर खोदाईसाठी प्रतिबंध

| अ.क्र. | अहवालाच्या महिन्यात | | | सुरुवातीपासून अहवालाच्या महिना अखेर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तालुका | गावाचे नांव | सेन्सस कोड नंबर | तालुका | गावाचे नांव | सेन्सस कोड नंबर |
| | | | | | | |
| | | | | | | |

३) कलम - ७ - अधिसूचित केलेल्या अतिविकसित पाणलोट क्षेत्रामध्ये नवीन विहीर घेण्यास प्रतिबंध

| अ.क्र. | अहवालाच्या महिन्यात | | | सुरुवातीपासून अहवालाच्या महिना अखेर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तालुका | गावाचे नांव | सेन्सस कोड नंबर | तालुका | गावाचे नांव | सेन्सस कोड नंबर |
| | | | | | | |
| | | | | | | |

४) कलम- ८- अतिविकसित पाणलोट क्षेत्रामध्ये पिण्याच्या पाण्याच्या स्रोतावर विपरीत परिणाम करणाऱ्या अस्तित्वातील विहिरीद्वारे होणाऱ्या उपशावर १ फेब्रुवारी ते ३१ जुलै या कालावधीमध्ये बंदी घालणे.

| अ.क्र. | अहवालाच्या महिन्यात | | | सुरुवातीपासून अहवालाच्या महिना अखेर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तालुका | गावाचे नांव | सेन्सस कोड नंबर | तालुका | गावाचे नांव | सेन्सस कोड नंबर |
| | | | | | | |
| | | | | | | |

५) कलम- ९ - अतिविकसित पाणलोटामध्ये पिण्याच्या पाण्याच्या स्रोतावर विपरीत परिणाम करणाऱ्या विहिरीवर कायमस्वरुपी किंवा तात्पुरती बंदी आणणे.

| | अहवालाच्या महिन्यात | | | सुरुवातीपासून अहवालाच्या महिना अखेर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तालुका | गावाचे नांव | सेन्सस कोड नंबर | तालुका | गावाचे नांव | सेन्सस कोड नंबर |
| | | | | | | |
| | | | | | | |

६) कलम ४ - टंचाई घोषित करणे

| अ.क्र. | अहवालाच्या महिन्यात | | | चालू वर्षाचे ऑक्टोबर पासून अहवालाच्या महिना अखेर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तालुका | गावाचे नांव | सेन्सस कोड नंबर | तालुका | गावाचे नांव | सेन्सस कोड नंबर |
| | | | | | | |
| | | | | | | |

७) कलम ५- टंचाई घोषित केलेल्या गावामध्ये पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून १ कि.मी. पर्यंत पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त भूजल उपशावर नियंत्रण

| अ.क्र. | अहवालाच्या महिन्यात | | | चालू वर्षाचे ऑक्टोबर पासून अहवालाच्या महिना अखेर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तालुका | [illegible]चे नांव | सेन्सस कोड नंबर | तालुका | गावाचे नांव | सेन्सस कोड नंबर |
| | | | | | | |
| | | | | | | |

## भूजल अधिनियम १९९३/नियम १९९५ ची अमलबजावणी

**१) नियम-३(१) - पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत घोषित करणे**

| | अहवालाच्या महिन्यात | | | सुरुवातीपासून अहवालाच्या महिनाअखेर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गावांची संख्या | घोषित केलेले स्त्रोत | | गावांची संख्या | घोषित केलेले स्त्रोत | |
| | | स्त्रोताचा प्रकार | संख्या | | स्त्रोताचा प्रकार | संख्या |
| | | | | | | |
| | | | | | | |

**२) कलम ३- घोषित केलेल्या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून ५०० मी. अंतरात नवीन विहीर खोदाईसाठी प्रतिबंध**

अहवालाच्या महिन्यातील गावांची संख्या :-

सुरुवातीपासून अहवालाच्या महिनाअखेर गावांची संख्या :-

**३) कलम - ७ - अधिसूचित केलेल्या अतिविकसित पाणलोट क्षेत्रामध्ये नवीन विहीर घेण्यास प्रतिबंध**

अहवालाच्या महिन्यातील गावांची संख्या :-

सुरुवातीपासून अहवालाच्या महिनाअखेर गावांची संख्या :-

**४) कलम- ८- अतिविकसित पाणलोट क्षेत्रामध्ये पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतावर विपरीत परिणाम करणाऱ्या अस्तित्वातील विहिरीद्वारे होणाऱ्या उपशावर १ फेब्रुवारी ते ३१ जुलै या कालावधीमध्ये बंदी घालणे.**

अहवालाच्या महिन्यातील गावांची संख्या :-

सुरुवातीपासून अहवालाच्या महिनाअखेर गावांची संख्या :-

**५) कलम- ९ - अतिविकसित पाणलोटामध्ये पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतावर विपरीत परिणाम करणाऱ्या विहिरीवर कायमस्वरुपी किंवा तात्पुरती बंदी आणणे.**

अहवालाच्या महिन्यातील गावांची संख्या :-

सुरुवातीपासून अहवालाच्या महिनाअखेर गावांची संख्या :-

**६) कलम ४ - टंचाई घोषित्त करणे**

अहवालाच्या महिन्यातील गावांची संख्या :-

चालू वर्षाचे ऑक्टोबरपासून अहवालाच्या महिनाअखेर गावांची संख्या :-

**७) कलम ५- टंचाई घोषित केलेल्या गावामध्ये पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून १ कि.मी. पर्यंत पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त भूजल उपशावर नियंत्रण**

अहवालाच्या महिन्यातील गावांची संख्या :-

चालू वर्षाचे ऑक्टोबरपासून अहवालाच्या महिनाअखेर गावांची संख्या :-

• • • • • • • • • • • • • •

नागरी क्षेत्रातील पिण्याच्या
पाण्याच्या टंचाई निवारणार्थ पाणी
टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत
घ्यावयाच्या तातडीच्या पाणी पुरवठा

**महाराष्ट्र शासन योजना...**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :टंचाई-२००८/प्र.क्र.१४९ /पापु-१४**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक :- **२१ ऑगस्ट, २००९.**

संदर्भ :-

१. शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्र:टंचाई-३०९९/प्र.क्र.१३/ पापु-१४ दि.१ फेब्रुवारी १९९९
२. शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्र:टंचाई-२०९९/प्र.क्र.१४/ पापु-१४ दि.२ फेब्रुवारी १९९९
३. शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्र:टंचाई -२००२/प्र.क्र.१७९/पापु-१४ दि.७ मे,२००२
४. शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्र.टंचाई -१००१/ प्र.क्र.१६५/पापु -१४ दि.४ सप्टेंबर,२००२
५. शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्र.टंचाई -२००२/ प्र.क्र.३४५/पापु -१४ दि.२७ नोव्हेंबर,२००२
६. शासन निर्णय पा.पु. व स्व.वि.क्र.टंचाई -१००६/प्र.क्र.३४/पापु -१४ दि.१३ सप्टेंबर,२००६
७. शासन परिपत्रक पा.पु.व स्व.वि.क्र. टंचाई २००६/प्र.क्र.२२१/पापु-१४ दि.०४ नोव्हेंबर,२००६

**प्रस्तावना :-**

राज्यातील नागरी क्षेत्रात उन्हाळ्यात निर्माण होणा-या पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ तातडीच्या पाणी पुरवठा योजना घेण्यासंदर्भात संदर्भ क्रमांक १ ते ५ येथील शासन निर्णय / परिपत्रक वेळोवेळी निर्गमित करण्यात आले होते. वरील सर्व आदेशांचा एकत्रित विचार करून सर्वसमावेशक सुधारित आदेश निर्गमित करण्याची तसेच तातडीच्या पाणी पुरवठा उपाययोजनांच्या आर्थिक मर्यादेत तसेच प्रशासकीय मान्यता देण्याच्या वित्तीय अधिकारात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

वर प्रस्तावनेत स्पष्ट केल्यानुसार संदर्भात नमूद केलेले विविध आदेश अधिक्रमित करून शासन आता खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

२. **ज्या नागरी क्षेत्रामध्ये दरडोई दरदिवशी नियमित मिळणा-या पाणी पुरवठ्यापेक्षा ५० टक्के किंवा त्यापेक्षा कमी अथवा दरडोई दरदिवशी ५० लिटर एवढाच पाणी पुरवठा प्रत्यक्षामध्ये होत आहे, यापैकी जे कमी असेल तेथे** पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारणार्थ उपलब्ध पाण्यामध्ये वाढ करण्याचे दृष्टीने **तातडीच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत खालील उपाययोजना घेता येतील.**

अ) विंधण विहिरी / नलिकाकूप घेणे.
ब) उच्च क्षमतेच्या विंधण विहिर / नलिकाकूप वर विद्युतपंप बसविणे.
क) ज्या ठिकाणी अन्य कोणताही पर्यायी उद्भव उपलब्ध नाही अशा ठिकाणी नदीचे काठावर, नदीचे पात्रात, तलावाचे खालील बाजूस किंवा तलावात खुली विहिर घेणे. - परंतु या खुल्या विहिरीचे ठिकाण नदी नाला किंवा तलावापासून लांब असता कामा नये. हे ठिकाण नदी, नाला किंवा तलावापासून २०० ते २५० मीटरच्या आत असले

नये. हे ठिकाण नदी, नाला किंवा तलावापासून २०० ते २५० मीटरच्या आत असले पाहिजे. याबाबत भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र प्राप्त करावे. तसेच विहिरीचे बांधकाम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करून त्यात गाळ जाणार नाही अशी व्यवस्था करण्यात यावी. अशा विहिरींच्या कामांना अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत संबंधित विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी मंजूरी द्यावी.

ड) शहराच्या पाणी पुरवठ्यात वाढ करण्यास उपयुक्त ठरणारी इतर कामे. **यामध्ये खालील कामांचा समावेश करण्यात येऊ नये.**

१. अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या दुरूस्तीची कामे.
२. उंचीवरील साठवण टाक्या.
३. वितरण व्यवस्था.
४. मुख्य योजनांशी संलग्न नसलेल्या योजना.
५. स्टॅन्ड बाय पंपिंग मशिनरी.
६. मोठ्या योजनेशी संलग्न पाईपलाईन्स.

ई) **आकस्मिक उपाययोजना - ज्या "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रात जेथे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई (दरडोई दरदिवशी २० लीटर्स पेक्षा कमी पाणी पुरवठा होत असेल)** निर्माण होईल व जेथे दीड किलोमीटर परिसरात पिण्याच्या पाण्याचा उद्भव नसेल तेथे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी खालील आकस्मिक उपाययोजना जिल्हाधिकारी यांना प्राथम्यानुसार मंजूर करता येतील.

**(१) अस्तित्वात असलेल्या विहिरी खोल करणे, खोदणे आणि पुनर्जिवित करणे, जुन्या विहिरींची दुरूस्ती करणे, अस्तित्वात असलेल्या सामुदायिक विहिरी खोल करणे व दुरूस्त करणे-**

**(२) अत्यावश्यक असेल त्या ठिकाणी खाजगी विहिरी अधिग्रहीत करणे -**

**(३) उपरोक्त उपाययोजनांद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे शक्य नसल्यास, टँकर/बैलगाडीद्वारे पाणी पुरवठा करणे -** यासाठी फक्त "क" वर्गीय नागरीक्षेत्रास पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत तरतूदीतून निधी अनुज्ञेय राहील.

**महानगरपालिका, "अ" वर्ग व "ब" वर्ग नगरपरिषदेस टँकरवरील खर्चासाठी पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत तरतूदीतून निधी अनुज्ञेय होणार नाही.** तथापि, ज्या "ब" वर्ग नगर परिषदांना स्वखर्चाने टँकर / बैलगाडीद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करता येत नसेल अशा "ब" वर्ग नगरपरिषदांच्या क्षेत्रात जिल्हाधिकारी यांना शासकीय खर्चाने टँकर / बैलगाडीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करता येईल. या नगरपरिषदा निश्चित करतांना, संबंधीत नगरपरिषदांनी त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकात त्यांच्या नगरपालिका क्षेत्रात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद केली असल्याची व तो पूर्ण पणे त्याच कारणासाठी खर्ची पडल्याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी व खालील अटींच्या अधीन राहून सदर "ब" वर्ग नगरपरिषदेस टँकरने / बैलगाडीने पाणी पुरवठा करण्यात यावा.

अ) संबंधित "ब" वर्ग नगर परिषदेचे क्षेत्र हे संबंधित जिल्हाधिका-यांनी **टंचाईग्रस्त म्हणून घोषित केले आहे.**

ब) संबंधित "ब" वर्ग नगरपरिषदेने "नगरपालिका क्षेत्रात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद नगरपालिकेने वार्षिक अंदाजपत्रकात केली असून तो पूर्णपणे खर्ची पडला असून यापेक्षा जास्त निधी सदरहू नगरपरिषद पिण्याचा पुरवठा करण्यास उपलब्ध करून देण्यास आर्थिकदृष्टया सक्षम नाही." असा दाखला देणे आवश्यक राहील.

क) एका वित्तीय वर्षात एका **"ब" वर्ग नगरपरिषदेला जास्तीत जास्त रू.१२.०० लक्ष इतका खर्च,** टँकर/बैलगाडीद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी आवश्यक तिथे मंजूर करता येईल."

६. **तातडीच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत उपाययोजना पुढील अटी /शर्ती व निकषाच्या अधिन राहून मंजूर करण्यात याव्यात.**

अ) **पाणी पुरवठयाचे निकष** - ज्या नागरी क्षेत्रामध्ये दरदिवशी दरडोई नियमित मिळणा-या पाणी पुरवठ्यापेक्षा ५० टक्के किंवा त्यापेक्षा कमी पाणी पुरवठा होत आहे अथवा ज्या ठिकाणी दरडोई दरदिवशी ५० लिटर एवढाच पाणी पुरवठा प्रत्यक्षामध्ये होत आहे, यापैकी जे कमी असेल अशा क्षेत्रामध्ये तातडीच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत उपाययोजना मंजूर करण्याचा विचार व्हावा.

ब) **आर्थिक मर्यादा** - तातडीच्या पाणी पुरवठाच्या योजनांसाठी पुढीलप्रमाणे सुधारित आर्थिक मर्यादा विहित करण्यात येत आहे.

(रू.लाखात)

| नागरी क्षेत्राचा वर्ग | आर्थिक मर्यादा |
|---|---|
| क वर्ग नगरपरिषद | १०.०० |
| ब वर्ग नगरपरिषद | १५.०० |
| अ वर्ग नगरपरिषद | २५.०० |
| महानगरपालिका | ३०.०० |

वरीलप्रमाणे आर्थिक मर्यादा विचारात घेऊन करावयाची उपाययोजना निश्चित करण्यात यावी. **नगरपालिकेला एका टंचाई कालावधीत तातडीच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत एकापेक्षा अधिक उपाययोजना मंजूर करता येणार नाहीत.** अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत अधिक उपाययोजना घेण्याची आवश्यकता भासल्यास, प्रस्ताव विहित मार्गाने जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करावा.

क) **प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार** - तातडीची पाणी पुरवठा योजनांतर्गत उपाययोजनांना प्रशासकीय मान्यता, तातडीने देण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांना **रू.१५ लक्ष (रू.पंधरा लक्ष)पर्यंतचे व विभागीय आयुक्त यांना रू.३०.०० लक्ष (रू. तीस लक्ष ) पर्यंतचे प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार दि. ३० एप्रिल पर्यंत देण्यात येत आहेत. रु.३०.०० लक्षपेक्षा जास्त किंमतीच्या तातडीच्या पाणी पुरवठा योजनांना मंजूरी देण्याचे अधिकार शासनास राहतील.**

ड) नागरी तातडीच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत उपाययोजनांना मंजूरीचा उद्देश शहरातील संबंधीत लोकसंख्येस ऐन उन्हाळयात किमान पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, असा आहे. टंचाई निवारण उपाययोजनेची निवड करतांना उपलब्ध पाणी पुरवठयाची माहिती,

उपाययोजना कार्यान्वित करण्यासाठी लागणारा वेळ, टंचाईचा एकूण कालावधी व स्थानिक परिस्थितीचा विचार करता, किमान उपाययोजना खर्चाची असेल व त्याद्वारे उन्हाळयात स्थानिक जनतेस पाणी उपलब्ध होईल याची दक्षता घेण्यात यावी. **दि.३० एप्रिल पर्यंत योजना मंजुरीचे अधिकार क्षेत्रीय कार्यालयांना असले तरी, त्यापूर्वीच मंजूरीचे आदेश निर्गमित करुन तातडीच्या उपाययोजना कार्यान्वित करण्यात याव्यात.**

ङ) **लोकवर्गणी - तातडीच्या पाणी पुरवठा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी महानगरपालिका, "अ" व "ब" वर्ग नगरपालिका यांना १० टक्के लोकवर्गणी तसेच "क" वर्ग नगरपालिकां यांना ५ टक्के लोकवर्गणीची अट लागू राहील.** संबंधित महानगरपालिका / नगरपालिकांनी लोकवर्गणी देण्याबाबतचा ठराव करणे आवश्यक आहे.

च) तातडीच्या पाणी पुरवठा योजनांचे नकाशे व अंदाजपत्रके योग्य त्या यंत्रणेकडून तयार करून घेण्यात यावेत. मात्र योजनेची अंमलबजावणी संबंधित नगरपालिका/महानगरपालिकेनी करावी.

छ) तातडीच्या पाणी पुरवठा अंतर्गत घेण्यात आलेली उपाययोजना पूर्ण झाल्यावर, त्याद्वारे प्रत्यक्ष उन्हाळयात पाणी पुरवठा सुरु झाला असल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच **अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र** नगरपालिका / महानगरपालिका यांनी जिल्हाधिकारी यांचे मार्फत **तात्काळ शासनास** सादर करावे.

ज) **तातडीच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत नगरपालिका क्षेत्रात कूपनलिका/विंधण विहिरींची कामे मंजूरी केल्यास, नगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वातील सर्व विंधण विहिरींच्या पुनर्भरणाची कामे नगरपरिषदेने त्यांच्या स्वतःच्या निधीतून घेणे बंधनकारक राहील.** एकदा तातडीच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत विंधण विहिरी घेतल्यास, पुढील वर्षी ही उपाययोजना मंजूर करताना, नगरपालिकेने त्यांच्या खर्चाने शहरातील विंधण विहिरींच्या पुर्नभरणाची कामे पूर्ण केल्याचे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

झ) नगरपालिका / महानगरपालिका यांनी तातडीच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत कूपनलिका/ विंधण विहिरींची कामे पुढील अटींच्या अधिन राहून करुन घ्यावीत.

१. विंधण विहिरींची स्थलनिश्चिती भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडूनच करण्यात यावी.

२. नगरपालिका / महानगरपालिका यांनी तातडीच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत कूपनलिका/ विंधण विहिरींची कामे खाजगी कंत्राटदारांकडून निविदा पध्दतीने अथवा जिल्हा परिषदांकडून अथवा भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेकडून करुन घ्यावीत.

३. खाजगी विंधण यंत्रे ही त्या जिल्हयात संबंधित जिल्हा परिषदेने ज्या दराने भाडयाने घेतली आहेत त्याच दराने अथवा त्यापेक्षा कमी दराने भाडयाने लावावीत. परंतु, नागरी संस्थेचे मर्यादित क्षेत्र लक्षात घेऊन जर जिल्हा परिषदेने निश्चित केलेल्या दराने खाजगी विंधण यंत्रे उपलब्ध होत नसतील तर शासनाने विहित केलेल्या दराचे अधीन राहून नगरपालिंका/महानगरपालिकेने निविदा मागवून विंधण यंत्रे भाडयाने घ्यावीत.

४. खाजगी विंधण यंत्रांना द्यावयाचे दर भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत निश्चित करण्यात आलेल्या दरापेक्षा जास्त असू नयेत.

५. खाजगी विंधण यंत्रामार्फत घेण्यात आलेल्या विंधण विहिरींची भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत तपासणी करण्यात यावी व कामे योग्य दर्जाची असल्याचे प्रमाणपत्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून घेणे बंधनकारक राहील.

**४. विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणाऱ्या प्रस्तावांसंदर्भात करावयाची कार्यवाही**

नागरी व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास प्रदान करण्यात आलेल्या आर्थिक मर्यादेपेक्षा जास्त किंमतीच्या असलेल्या तसेच विहित निकषात न बसणाऱ्या तातडीच्या योजना/उपाययोजनांना तातडीने प्रशासकीय मंजूरी देता यावी म्हणून खालीलप्रमाणे सचिव स्तरीय स्थायी समिती संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| १.सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | अध्यक्ष |
| २.सचिव (म.व पू.)महसूल व वन विभाग | सदस्य |
| ३.सचिव (ग्रा.वि.)ग्रामविकास व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ४.सचिव (व्यय) वित्त विभाग | सदस्य |
| ५.सचिव(१),नगर विकास विभाग | सदस्य |
| ६.सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ७.उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य सचिव |

वर नमूद केलेल्या समितीस आवश्यकतेनुसार विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी किंवा अन्य संबंधित अधिकाऱ्यास बैठकीस बोलावण्याचे अधिकार असतील.

विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणारे प्रस्ताव जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांमार्फत विहित मार्गाने त्यांच्या अभिप्रायासह व योग्य त्या शिफारशींसह शासनाकडे मंजूरीसाठी प्राप्त झाल्यास त्या प्रस्तावावर निर्णय घेण्याचा अधिकार उपरोक्त सचिव स्तरीय स्थायी समितीस राहील.

नगरपरिषदांकडून प्राप्त विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणाऱ्या तातडीच्या उपाययोजनांच्या प्रस्तावांची जिल्हाधिकारी यांनी छाननी करुन सदर उपाययोजनेच्या आवश्यकते संदर्भातील सुस्पष्ट अभिप्रायासह त्यांच्याकडे प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसात विभागीय आयुक्तांकडे सादर करावेत. विभागीय आयुक्त, यांनी सदर प्रस्ताव त्यांच्या सुस्पष्ट अभिप्रायासह प्राप्त दिनांकापासून एका आठवड्यात शासनास सादर करावेत.

**५.नागरी क्षेत्रातील तातडीच्या पाणी पुरवठा योजना मंजूरी संदर्भात मार्गदर्शक सूचना -**

नागरी क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ तातडीच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत उपाययोजना मंजूर करताना तसेच राबविताना **सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.**

**६. अनुदान वितरण -** शासन स्तरावर तसेच क्षेत्रीय स्तरावर मंजूर केलेल्या नागरी तातडीच्या पाणी पुरवठा योजनांसाठी **शासनाकडून प्रथम अनुज्ञेय अनुदानाच्या ५० टक्के अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.** योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर, त्याद्वारे **प्रत्यक्ष उन्हाळयात पाणी पुरवठा सुरु झाला**

असल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर उर्वरित अनुदान मंजूर करण्यात येईल. उर्वरित अनुदानाची मागणी करताना ती सोबत जोडलेल्या परिशिष्टातील क्र.१० मध्ये नमूद विवरण पत्रात करावी.

७. नागरी क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ मंजूर करण्यांत येणाऱ्या तातडीच्या पाणी पुरवठा योजनांसाठी "लेखाशीर्ष २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य-०१, अवर्षण १०२, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा (एक) निकडीच्या पाणी पुरवठा योजना (२२४५००९३)( योजनेतर)" अंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत जिल्हाधिकारी यांना अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

८. या प्रयोजनासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आहरण, संवितरण व नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांनी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाचे वितरण संबंधित नगरपालिका / महानगरपालिकांना पुढील अटीस अधिन राहून तात्काळ करावे.

अ) मागील वर्षाच्या तातडीच्या पाणी पुरवठा उपाययोजनांसाठी जो निधी वितरित केला होता त्याचा पूर्णतः वापर झाला आहे असे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित नगरपालिका / महानगरपालिकांकडून घेण्यात यावे.

ब) यापूर्वीचा निधी पूर्णपणे खर्च झाला नसेल तर नवीन उपाययोजनेसाठी निधी मंजूर करण्यात येऊ नये.

९. हा शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६७/०९ /व्यय-३ दि.२०/२/२००९ व अनौ.सं.क्र.१७८/०९/ विनियम, दि.१६.०३.२००९ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. **हे आदेश दिनांक १ ऑक्टोबर, २००९ पासून लागू होतील.**

११ सदर शासन निर्णय शासनाच्या w.w.w.maharashtra.gov.in. या वेबसाईटवर उपलब्ध करणा आला असून त्याचा संगणक संकेतांक **२००९०८२११८३४१६००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजितकुमार जैन)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
२. खाजगी सचिव, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. खाजगी सचिव, राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव,(मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव ,ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सर्व विभागीय आयुक्त.
१०. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई वगळून)



D:\WS\a B\Backup Asst-Rural\GR २००९\GR १६९-२००८ Nagri Standing Order GR.doc

११. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (मुंबई लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (नागपूर लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
१३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१४. निवासी लेखाधिकारी, मुंबई.
१५. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१६. सर्व विभागीय मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१७. सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१८. वित्तीय सल्लागार व मुख्यलेखाधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
१९. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
२०. सर्व विभागीय उप संचालक, भूजस सर्वेक्षण व विकास यंत्रणा.
२१. सर्व वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेत्रण व विकास यंत्रणा.
२२. सर्व नगरपालिका / महानगरपालिका (मुंबई वगळून)
२३. सर्व कार्यासने, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
२४. पापु-१४ संग्रहासाठी.

## परिशिष्ट

**नागरी क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ तातडीच्या पाणी पुरवठा योजना मंजूर करताना तसेच राबविताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.**

१) पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणासाठी करावयाच्या तातडीच्या उपाययोजना ठरवितांना त्यासाठी होणारा खर्च, त्याचा भविष्यात होणारा फायदा, तसेच त्या उपाययोजना कार्यान्वित करण्यासाठी लागणारा वेळ या बाबींचा प्रामुख्याने विचार करण्यात यावा. टंचाई निवारण उपाययोजनेची निवड करतांनी उपलब्ध माहिती, टंचाईचा एकूण कालावधी व स्थानिक परिस्थितीचा विचार करता, किमान खर्चाची असेल याची दक्षता घेण्यात यावी.

२) नगर पालिकांच्या तातडीच्या पाणी पुरवठा योजनेस मंजूरी देताना, त्या नगर पालिका क्षेत्रात नियमित स्थितीत व टंचाईच्या स्थितीत दर माणशी, दर दिवशी होणारा पाणी पुरवठा नमूद करुन योजना मंजूर करण्याचे समर्थनही करण्यांत यावे. योजना मंजूरीचे आदेश विहित प्रारुपात व जिल्हाधिका-यांचे स्वाक्षरीनेच काढावेत.

३) काही नगरपरिषदांकडून विहित निकषाबाहेरील सादर झालेल्या प्रस्तावांना जसे की, नदीच्या पात्रात वाळूंचे बंधारे घेणे, शहरात उंच टाक्या बांधणे, वितरण व्यवस्था करणे, विहिरीला प्लास्टर करणे, विंधण विहिरीवरील/ विहिरीवरील विद्युत पंप दुरुस्ती करणे व बदलणे, नियमीत योजनेमध्ये समांतर पाईपलाईन टाकणे, व्हॉल्व बदलणे, पाईपपाईन दुरुस्त करणे, स्टँडबाय पंपींग मशिनरी घेणे इत्यादी कामांना (अशा बाबी नेहमीच्या देखभाल/दुरुस्तीचा भाग म्हणून नगर पालिका/ महानगर पालिका यांनी स्वतःच्या निधीतून / पाणीपट्टीच्या उत्पन्नातून करणे क्रमप्राप्त आहे.) जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त कार्यालयाकडून प्रशासकीय मंजूरी देऊन शासनाकडे अनुदानाची मागणी करण्यात येते. अशा प्रस्तावांना मंजूरी देणे अपरिहार्य असल्यास असे प्रस्ताव शासनाकडे विशेष बाब म्हणून मान्यतेसाठी सबळ कारणासहित सादर करावेत. विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तातडीच्या पाणी पुरवठयाच्या प्रस्तावांना क्षेत्रीय स्तरावर मंजूरी देण्यात आल्यास त्यासाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

४) तातडीच्या योजना प्रस्तावित करणेपूर्वी शहरातील विंधणविहिरी, विद्युतपंप, साध्या विहिरी इत्यादी सर्व पाणी पुरवठयाची साधने नगर पालिकेने सुस्थितीत ठेवली आहेत की नाही, विंधण विहिर पुर्नभरणाची किती कामे पूर्ण केली आहेत याबाबत पाहणी करावी. ब-याच नगर परिषदा विशेष बाब म्हणून शासनाकडे प्रस्ताव सादर करतानाच क्षेत्रीय स्तरावर स्वतंत्रपणे वेगळ्याने तातडीच्या योजना मंजूर करुन घेत असतात. ज्या नगर परिषदा/नगरपालिका/महानगरपालिकांचे विशेष बाब म्हणून प्रस्ताव शासनाकडे पाठविणे प्रस्तावित असेल वा सादर झालेले असतील अशा नागरी भागासाठी क्षेत्रीय स्तरावर पुन्हा वेगळयाने विहित आर्थिक व भौतिक निकषातील प्रस्तावांना मंजूरी देण्यात येउ नये. शहरातील पिण्याच्या पाण्याची एकंदर परिस्थिती विचारात घेऊन प्रस्ताव एकत्रितच सादर करावेत. एखाद्या प्रकरणी, निकषात बसणा-या प्रस्तावांना क्षेत्रीय स्तरावर मान्यता दिल्यावरही कालांतराने काही अपरिहार्य कारणांमुळे त्या शहरासाठी विशेष बाब म्हणून पुन्हा प्रस्ताव सादर करणे आवश्यक असल्यास त्यामध्ये पुर्वी मंजूर केलेल्या योजनेचा तपशील नव्या योजनेला शिफारस करण्यामागील स्पष्टीकरण सादर करावे.

५) विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी त्यांचेकडून शासनास विशेष बाब म्हणून मंजूरीसाठी सादर होणा-या प्रस्तावांची आवश्यक छाननी क्षेत्रीय स्तरावर करावी. विशेष बाब म्हणून मंजूरीसाठी शासन स्तरावर प्रस्ताव सादर करताना, नागरी संस्थेच्या क्षेत्रातील सध्याची पाणी उपलब्धतेची साधने, लोकवर्गणी भरणे, योजनेची पुढील देखभाल दुरुस्ती करण्यास संबंधीत संस्था तयार असल्याबाबतचा ठराव, पाण्याचे आरक्षण केलेले असल्यास तसा ठराव इत्यादी बाबी तपासून पाहणे आवश्यक आहे. विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी असे प्रस्ताव त्यांच्या **"सुस्पष्ट शिफारशींसह"** शासनास सादर करावेत.

६) क्षेत्रीय स्तरावरील योजनेस प्रशासकीय मान्यता घेताना, संबंधीत नगर परिषदेने / नगर पालिकेने मागील टंचाई कालावधीत घेतलेल्या तातडीच्या योजनेचे उपयोगिता प्रमाणपत्र तपासून ते मंजूरी आदेशासह शासनास सादर करणे आवश्यक आहे. विशेष बाब म्हणून शासनास प्रस्ताव सादर करताना, मागील वर्षी घेतलेल्या तातडीच्या पाणी पुरवठा योजनेचे उपयोगिता प्रमाणपत्र पुर्वी सादर केलेले नसल्यास सोबत जोडणे आवश्यक आहे.

७) मंजूर प्रस्तावाच्या तुलनेत खर्चात बचत झालेली असल्यास, अतिरिक्त अनुदान शासनास परत केले आहे की नाही याची खात्री करुन तसा उल्लेख उपयोगिता प्रमाणपत्रात असणे आवश्यक आहे. मागील उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी नवीन तातडीच्या पाणी पुरवठा योजना मंजूर करु नये.

८) नागरी तातडीच्या पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव विहित वेळेत मंजूरीसाठी सादर होतील याची दक्षता घेण्याच्या सूचना सर्व संबंधीतांना द्याव्यात. क्षेत्रीय कार्यालयाकडे प्राप्त होणा-या विहित निकषातील, तसेच विशेष बाब म्हणून मान्यता द्यावयाच्या नागरी तातडीच्या प्रस्तावांना, क्षेत्रीय स्तरावर मंजूरी मिळणे/ शासन स्तरावर शिफारशींसह मान्यतेसाठी सादर करणे ही कार्यवाही विहित कालावधीमध्ये पूर्ण करणे अनिवार्य आहे. या संदर्भात योग्य ती काळजी घेण्यात यावी.

९) योजनांसाठी मंजूर केलेले अनुदान कोषागारातून वेळीच काढण्यात यावे. ते व्यपगत होणार नाही याची योग्य दक्षता घेण्यात यावी. तसेच लोकवर्गणीचा हिस्सा संबंधीत संस्थेने भरलेला आहे किंवा कसे ही बाब तपासून पाहणे आवश्यक आहे.

१०) शासन स्तरावर तसेच क्षेत्रीय स्तरावर मंजूर केलेल्या नागरी तातडीच्या पाणी पुरवठा योजनांसाठी शासनाकडून अनुज्ञेय अनुदानाच्या ५० टक्के अनुदान उलपब्ध करुन देण्यात येईल. योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित अनुदानाची मागणी करताना ती पुढील विवरण पत्रात करावी.

| नगर परिषद / नगर पालिकेचे नाव | योजनेचा मंजूर खर्च (रु.लक्ष) मंजूरीचा दिनांक | स्विकारलेल्या निविदांची किंमत (रु.लक्ष) | स्तंभ ३ चे अनुषंगाने लोक वर्गणीचा हिस्सा (रु.लक्ष) | कामांची प्रगती | | योजना अपूर्ण असल्यास सद्यस्थिती | योजनेवर झालेला प्रत्यक्ष खर्च (रु.लक्ष) | प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या आधारे जमा झालेल्या लोक वर्गणीची रक्कम (रु.लक्ष) | आता पर्यंत उपलब्ध करुन दिलेले अनुदान (रु.लक्ष) | लोक वर्गणी वजा जाता प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या आधारे आवश्यक अनुदान (रु.लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | योजना पूर्ण करण्याचा नियोजन दिनांक | योजना प्रत्यक्षात कार्यान्वित झाल्याचा दिनांक | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५अ | ५ब | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | | |

*********

ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेताना पशुधनास लागणा-या पिण्याच्या पाण्याची गरज विचारात घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
क्रमांक: टंचाई-१००९/प्र.क्र. १३१/पापु-१४
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७ ऑगस्ट,२००९

संदर्भ:- १) शा. नि, पा.पु. व स्व.वि. क्र.टंचाई-३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४, दि. १/२/१९९९
२) शा. नि, पा.पु. व स्व.वि. क्र.टंचाई-१०९९/प्र.क्र.१२/पापु-१४, दि. ३/२/१९९९

प्रस्तावना:-

ग्रामीण भागात ज्या गावात / वाडयांत पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असेल म्हणजेच ज्या ठिकाणी दरदिवशी २० लि. प्रतिडोई या पेक्षा कमी पाणी पुरवठा होत असेल व जेथे १.५ कि.मी.च्या परिसरात पाण्याचा उद्भव नसेल तेथे पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत उपाययोजना राबविण्याबाबत वरील संदर्भाधीन दिनांक १/२/१९९९ व ३/२/१९९९ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या उपाययोजना ठरविताना त्या गावातील/वाडीतील लोकसंख्येला लागणा-या पाण्याच्या गरजेबाबत केवळ विचार करण्यात येतो. त्या गावातील/वाडीतील पशुधनास लागणा-या पिण्याच्या पाण्याची गरज टंचाई निवारण उपाययोजना ठरविताना विचारात घेण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

ग्रामीण भागात ज्या गावात / वाडयांत पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असेल तेथे पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारण उपाययोजना राबविताना त्या गावातील/ वाडीतील लोकसंख्येबरोबरच पशुधनास लागणा-या पिण्याच्या पाण्याची गरज विचारात घेऊन उपाययोजना राबविण्यात यावी.

D:\WS14DO\CR 2009\WATER SUPPLY ANIMALS.doc

२.	हा शासन निर्णय मदत व पुनर्वसन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३..	हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक २००९०८२७१२४५४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु. वि. कोळेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,.

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
३. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
४. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
५. जिल्हाधिकारी (सर्व)
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
७. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
८. विभागीय उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
९. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
१०. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
११. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता)
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता)
१३. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१४. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई
१५. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१७.सर्व कार्यासने, पाणी पुरवठा व स
१८. निवड नस्ती, पापु-१४

Water Supply+टंचाई-1009_प्र.क्र.-131+

D:\WS14DO\CR 2009\WATER SUPPLY ANIMALS.doc

ISSUED
Date ..... 29/8/09.....

राज्यातील ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत.

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## शासन परिपत्रक क्रमांकः टंचाई २०१३/प्र.क्र. ४१८/पापु-१४

तारीख: ४ जानेवारी, २०१४

<u>परिपत्रक :</u>

महाराष्ट्र विधान मंडळाच्या अंदाज समितीनेही सन २०१२-१३ या कालावधीतील टंचाई व दुष्काळ निवारणाच्या शासनाने केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेऊन पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनाबाबत समितीने विधान मंडळास सादर केलेल्या एकतिसाव्या अहवालामध्ये टँकरने पाणी पुरवठा करताना दक्षता घेणे व खोल विंधण विहीरीच्या ठिकाणी भूजल पातळी वाढविणे या विषयी अभिप्राय व शिफारशी केलेल्या आहेत. सदर शिफारशी विचारात घेऊन राज्यातील संभाव्य पिण्याच्या पाण्याच्या टंचाईस तोंड देण्यासाठी खालील प्रमाणे दक्षता / उपाययोजना घेण्यासंदर्भात सूचना देण्यात येत आहे :-

टँकरने पाणी पुरवठा करणे ही एक खर्चिक बाब असल्याने ती उपाययोजना अपरिहार्य परिस्थितीतच मंजूर करावी. पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईच्या काळात टँकरने पाणी पुरवठा करणे ही योजना अधिक कार्यक्षमरित्या राबविली जावी व तक्रारीस वाव राहू नये या दृष्टीकोनातून शासन परिपत्रक क्रमांक टंचाई १००५/प्र.क्र.३०५/पापु-१४, दिनांक २४ जानेवारी, २००६ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, टँकरच्या निविदा प्रक्रिया टँकरच्या खेपा याबाबतचे नियंत्रण क्षेत्रीय स्तरावरुन ठेवले जात नसल्याने, टँकरने पाणी पुरवठा करण्यासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त होत असतात. तसेच, टंचाई कालावधीत गावामध्ये टँकर आल्यास टँकरच्या दिशेने लोकांची झुंबड उडते व त्यातून तणाव निर्माण होतो. अशा परिस्थितीत अपघात होऊन लोक मृत्यू सारखी दुर्घटना देखील घडू शकते. त्यामुळे ज्या गावामध्ये टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येणार आहे, त्या ठिकाणी सर्व नागरिकांना टँकर पोहोचण्यापूर्वी सूचना देण्यात याव्यात. सूचना देण्यासाठी दूरध्वनी, एसएमएस अथवा अन्य सोईच्या पर्यायांचा विचार करण्यात यावा. संबंधित गावातील नागरिकांना पाणी उपलब्ध होण्यासाठी त्या गावामध्ये जेवढी पाण्याची आवश्यकता आहे, तेवढेच पाणी टँकरव्दारे पुरविण्याच्या दृष्टीने योग्य ते नियोजन करवे. जेणेकरुन, तेथील नागरिकांना योग्य पाणी पुरवठा होऊन अनुचित प्रकार घडणार नाही.

शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, टँकरच्या फेऱ्या नियोजित वेळापत्रकाप्रमाणे निर्धारीत वेळेत होत नाहीत व टँकरच्या बनावट फेऱ्या दर्शवून त्यासाठी रक्कमेची आकारणी केली जाते. असे गैरप्रकार टाळण्याच्या दृष्टीने पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर जी.पी.एस. प्रणालीचा वापर करण्यात यावा. सदरहू जी .पी.एस. प्रणाली राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये संबंधित यंत्रणांनी तात्काळ कार्यान्वित करावी व त्याच्या पर्यवेक्षणाकरीता जिल्ह्याच्या ठिकाणी एका नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी. सदर प्रणाली बसविणे, त्याची देखभाल दुरुस्ती इत्यादी बाबतचा खर्च संबंधित टँकर वाहतूक धारकाने करण्याची अट टँकर वाहतूकधारका सोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यात करण्यात यावी. जेणेकरुन, या प्रणालीचा वापर प्रभावीरित्या करणे शक्य होईल.

ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांचा उद्देश उन्हाळ्यातील टंचाईच्या कालावधीत जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध करुन द्यावयाचे असल्याने टंचाई कृती आराखड्यातील उपाययोजनेनुसार विंधण विहीरी घेण्याचे कार्यक्रम राबविण्यात येतात. या विंधण विहीरी शासनाच्या नियमाप्रमाणे २०० फुटाप्रमाणे विंधण विहीरी खोदण्यात येतात, त्यापेक्षा जास्त फुट खोल विंधण विहीरी घेण्याची आवश्यकता वाटल्यास संबंधित जिल्हा अधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक असते. कारण भुगर्भातील ५०० ते ७०० फुट पाणी हजारो वर्षापुर्वीचे असून ते उपसले तर त्या ठिकाणी पोकळी तयार होते, व भुविज्ञानानुसार अतिशय भयानक परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे ज्या गावात / वाड्यात भिषण पाणी टंचाई निवारणासाठी ज्या ठिकाणी २०० फुटांपेक्षा अधिक खोलीची विंधण विहीर खोदण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी परवानगी दिली आहे, अथवा विंधण विहीर खोदली आहे, अशा ठिकाणी भूजलाची पातळी वाढविण्याच्या दृष्टीने पुढील दोन वर्षाच्या कालावधीत भूजल पुर्नभरणाच्या आवश्यक त्या उपाययोजना संबंधित यंत्रणांनी जाणीवपूर्वक राबवाव्यात जेणेकरुन भू-जलाची पातळी वाढण्यास मदत होईल.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०१०३१७३८०५९३२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DURVE SHASHANK V

Digitally signed by DURVE SHASHANK V
DN: CN = DURVE SHASHANK V, C = IN, S = Maharashtra, O = Govt Of Maharashtra, OU = Water Supply and Sanitation
Date: 2014.01.04 03:14:14 -08'00'

श. वि. दुर्वे
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५. सचिव /प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
६. सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुर्नवसन),
७. सर्व विभागीय आयुक्त,
८. सर्व जिल्हाधिकारी,
९. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे,
१०.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
११.कार्यकारी अभियंता (सर्व), ग्रामीण विकास पुरवठा /जिल्हा परिषद
१२.निवड नस्ती.

नागरी तथा ग्रामीण भागातील पिण्याच्या
पाण्याची टंचाई परिस्थिती निवारणार्थ
घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत आर्थिक तथा
भौतिक मर्यादा वाढविणे बाबत.

महाराष्ट्र शासन
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः टंचाई-२०१६ /प्र.क्र. १४३ / पापु-१४**
**गो.ते. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला, लो.टि. मार्ग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**तारीख: ४ मे, २०१६**

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई-३०९९/प्र.क्र.१३/पापु १४ दि.१ फेब्रुवारी १९९९
२) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई-३०९९/प्र.क्र.१२/पापु १४ दि.३ फेब्रुवारी १९९९
३) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई-१००२/प्र.क्र.१६५/पापु १४ दि.२ मे,२००२
४) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई१००६/प्र.क्र.३४/पापु१४, दि.१३ सप्टेंबर, २००६
५) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई-१००७/प्र.क्र.२१२/पापु १४ दि. ११ मार्च, २००८
६) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई २००८/प्र.क्र.१४९/पापु१४, दि. २१ ऑगस्ट २००९
७) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई१००९/प्र.क्र.७०/ पापु१४, दि. ३१ ऑगस्ट २००९
८) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई१०१०/प्र.क्र.९२/ पापु१४, दि. २९ जून २०१०
९) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई१०११/प्र.क्र.११९/ पापु१४, दि. ३ डिसेंबर, २०११
१०) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई २०१२/प्र.क्र.६६/ पापु१४, दि. २९ मार्च, २०१२.
११) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई २०१२/प्र.क्र.६६/ पापु१४, दि ४ मे, २०१२.
१२) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई ३०९९/प्र.क्र.१२६/ पापु१४ दि. १६ जून, २०१२.

**१३) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई २०१३/प्र.क्र. ७६/पापु १४, दि. ११ फेब्रुवारी, २०१३.**

**१४) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः टंचाई २०१३/प्र.क्र.१८०/पापु १४, दि. ४ एप्रिल, २०१३.**

**१५) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि, क्रमांकः ग्रापाधो/१११४/प्र.क्र.२२/ पापु ७, दि. ९ जुलै, २०१४**

**प्रस्तावना -**

दरवर्षी अपु-या पर्जन्यमानामुळे किंवा अन्य कारणामुळे, राज्यात नागरी तथा ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास, संदर्भ क्र.१, २ व ६ येथील स्थायी आदेशानुसार पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेण्यात येतात. यामध्ये शासनाने संदर्भ क्र. ३ ते ५ व ७ ते १५ येथील शासन निर्णयांन्वये वेळोवेळी सुधारणा केली आहे.

मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांच्या अध्यक्षतेखालील स्थापन करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत नागरी तथा ग्रामीण पिण्याच्या पाणी टंचाई निवारण कार्यक्रमाच्या अंमलबजावणी संदर्भात काही तरतुदींमध्ये सुधारणा करुन भौतिक निकष शिथिल करणे तसेच आर्थिक मर्यादेत सुधारणा करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे नागरी तथा ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत शासन खालील प्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

१) ग्रामीण भागातील संबंधित गावांच्या/वाड्यांच्या १ कि.मी. परिसरातील सार्वजनिक उद्भवातून दरडोई दर दिवशी २० लिटर्स पेक्षा कमी पाणी उपलब्ध होण्याची शक्यता असेल त्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना असलेल्या अधिकारानुसार पाण्याची पाणी टंचाई जाहीर करता येऊ शकेल.

२) ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई परिस्थिती निवारणार्थ घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांमध्ये **धरणामध्ये अथवा तलावामध्ये चर खणणे या** उपाययोजनेचा समावेश करण्यात येत आहे. यासंबंधी कार्यवाही पुढीलप्रमाणे करण्यात यावी.

अ) या उपाययोजनेचा मुळ उद्देश नागरिकांना पेयजल पुरवठा करणे असा एकमेव असेल.

आ) या उपाययोजनेमधून नागरिकांना तात्काळ पाणी पुरवठा होऊ शकेल.

इ) या उपाययोजनेमध्ये धरणामध्ये अथवा तलावामध्ये चर खणणे यासाठी संबंधित वरीष्ठ भुवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी या उपाययोजनेमधून पाणी मिळण्याबाबत प्रमाणित केले असणे आवश्यक आहे.

ई) धरण अथवा तलावामध्ये चर खणण्याबाबत संबंधित विभागाची ना-हरकत प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

उ) उपरोक्त अनु.क्र. ३ व ४ येथील बाबींची पुर्तता झाल्याशिवाय प्रस्तुत उपाययोजनेबाबतची कामे सुरु करण्यात येऊ नयेत.

ऊ) चरामधून पाणी उपलब्धतेची खात्री झाल्यानंतरच अन्य अनुषंगिक बाबीवरील खर्च करण्यात यावा.

ऋ) या उपाययोजने अंतर्गत येणाऱ्या खर्चामध्ये सदर चर खणण्याबाबतचा खर्च तसेच अनुषंगिक बाबी (पंपींग मशिनरी, तात्पुरती पाईप लाईन तसेच टँकरमध्ये पाणी भरणे संबंधी व्यवस्था (हायड्रन्ट)) या बाबींचा समावेश असेल.

ऌ) या उपाययोजनेसाठी घेण्यात आलेली पंपींग मशिनरी, तात्पुरती पाईप लाईन तसेच हायड्रन्ट व्यवस्था या बाबतची यंत्रसामुग्री व इतर साहित्य याचा त्याच ठिकाणी पुढील वर्षी अथवा अन्य ठिकाणी पुन्हा वापर करण्यासाठी सदर साहित्याचा ताबा कोणाकडे असावा याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना जबाबदारी निश्चित करुन देणे आवश्यक आहे.

३) तात्पुरत्या पूरक नळ पाणी पुरवठा योजनांबाबतचे प्रस्ताव तयार करताना कार्यान्वित असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेचा उद्भव कमी पडत असेल अथवा पूर्ण आटला असेल तरच तात्पुरती पाणी पुरवठा योजना हाती घेण्यात यावी. मात्र तात्पुरत्या पूरक पाणी पुरवठा योजनेसाठी प्रस्तावित नवीन उद्भव कार्यान्वित असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेपासून ५ कि. मी. च्या आत असावा.

४) टँकरने पाणी पुरवठा करणे या उपाययोजनेमध्ये उद्भवावरुन टँकरमध्ये पाणी भरण्यासाठी करावयाच्या तात्पुरत्या व्यवस्थेचा (हायड्रन्ट) खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) शासन निर्णय, पा.पु. व स्व.वि, दिनांक ०९ जुलै, २०१४ अन्वये राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची लोकवर्गणी पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील पाणी टंचाई अंतर्गत घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांकरिता लोकवर्गणी जमा करण्याची आवश्यकता नाही. तथापि अशी लोकवर्गणी जमा केली असल्यास पर ा करण्यात येऊ नये.

६) शासन निर्णय, पा.पु. व स्व.वि, दिनांक २१ ऑगस्ट, २००९ नुसार नागरी भागातील पाणी टंचाई निवारणार्थ तातडीच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत महानगरपालिका, "अ"

व "ब" नगरपालिकांना १०% लोकवर्गणी तसेच "क" वर्ग नगरपालिकांना ५ % लोकवर्गणी भरणे आवश्यक आहे. तथापि सदर लोकवर्गणी भरण्याकरिता नगरपालिकांना ५ टप्प्यात सदर रक्कम भरण्याची सवलत देण्यात देत आहे. तसेच नगर पंचायतींना ५ % लोकवर्गणीची अट शिथिल करण्यात येत आहे.

(७) पाणी टंचाई निवारणार्थ घेण्यात येणाऱ्या खालील उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी वित्तीय मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| उपाययोजनेचे नाव | जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार | विभागीय आयुक्तांचे अधिकार |
|---|---|---|
| अ) तात्पुरती पूरक नळ पाणी पुरवठा योजना | रु. २०.०० लक्ष पर्यंत | रु. ५०.०० लक्ष पर्यंत |
| आ) नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती | रु. ३०.०० लक्ष पर्यंत | रु. ५०.०० लक्ष पर्यंत |
| इ) जुन्या विहीरीची दुरुस्ती / विहीरी खोल करणे / पुनर्जिवित करणे. | रु. २.०० लक्ष पर्यंत | रु. ३.०० लक्ष पर्यंत |
| ई) धरणामध्ये अथवा तलावामध्ये चर खणणे. | रु. ५.०० लक्ष पर्यंत | रु. १०.०० लक्ष पर्यंत |
| उ) पिण्याच्या पाण्याचे टँकर भरण्यासाठी आवश्यक ती तात्पुरती उपाययोजना (हायड्रन्ट) करणे. | रु. ०.५० लक्ष पर्यंत | रु. १.०० लक्ष पर्यंत |
| ऊ) बैलगाडीने पाणी पुरवठा करणे. | प्रती दिन प्रती बैलगाडी रु. ५००/- पर्यंत | |

उपरोक्त शासन निर्णय मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांच्या अध्यक्षतेखालील स्थापन करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०५०३१३५३१४८९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Kumar

(राजेश कुमार)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.विरोधी पक्ष नेता,विधानसभा/विधानपरिषद,

२. मा.विधानसभा/विधापरिषद,सदस्य.
३. मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई.
४. मा.मुख्यमंत्री,यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई.
५. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, ग्रामविकास आणि जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
९. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
१०.महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
११.सर्व विभागीय आयुक्त
१२.सर्व जिल्हाधिकारी
१३.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१४.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१५.संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई.
१६.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पूणे
१७.मा. मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
१८. मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,सर्व,मंत्रालय,मुंबई
१९. मुख्य सचिव यांचे उप सचिव,मंत्रालय मुंबई,
२०.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील नियंत्रक अधिकारी,सर्व,मंत्रालय मुंबई
२१.निवड नस्ती,पापु-१४

राज्यातील ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत.

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## शासन परिपत्रक क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. २०/पापु-१४

जी. टी. रुग्णालय संकुल, ७ वा मजला,
मंत्रालय मुंबई-०१
तारीख: १४ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई ३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४, दिनांक १ फेब्रुवारी, १९९९.
२) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २०९९/प्र.क्र.१४/पापु-१४, दिनांक २ फेब्रुवारी, १९९९.
३) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई १०९९/प्र.क्र.१२/पापु-१४, दिनांक ३ फेब्रुवारी, १९९९.
४) शासन परिपत्रक, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई १००५/प्र.क्र.३०५/पापु-१४, दिनांक २४ जानेवारी, २००६.
५) शासन परिपत्रक, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई १००६/प्र.क्र.१०६/पापु-१४, दिनांक १६ मे, २००६.
६) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २००८/प्र.क्र.१४९/पापु-१४, दिनांक २१ ऑगस्ट, २००९.
७) शासन परिपत्रक, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई १०१३/प्र.क्र.८४१/पापु-१४, दिनांक ४ जानेवारी, २०१४.
८) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २०१४/प्र.क्र.४८/पापु-१४, दिनांक ६ मे, २०१४.

**परिपत्रक :-**

राज्यात बहुतांशी वर्षी अपुऱ्या पर्जन्यमानामुळे किंवा अन्य कारणांमुळे ग्रामीण/नागरी क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत असते. शासनाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ ग्रामीण/नागरी क्षेत्रात घ्यावयाच्या उपाययोजनांकरिता वेळोवेळी स्थायी आदेशांद्वारे सविस्तर सूचना दिलेल्या आहेत.

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील प्रकरण ४ च्या कलम २५ नुसार जेथे जेथे पिण्याच्या पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता आहे अशा क्षेत्रास वर्षाच्या कोणत्याही कालावधीत (अगदी पावसाळयातही) पाणी टंचाई क्षेत्र म्हणून घोषीत करण्याचे अधिकार जिल्हा प्रशासनाला आहेत.

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील उपरोक्त तरतूदी विचारात घेता ज्या ठिकाणी पाणी टंचाई क्षेत्र घोषीत होईल त्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वप्रथम सार्वजनिक उद्भवातील पाण्यावर संभाव्य दुष्परिणाम थांबविण्याच्या दृष्टीने प्रस्तुत अधिनियमातील तरतूदी नुसार प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी. ही उपाययोजना करुनही संबंधित गावांत/वाडयांत पिण्याच्या पाण्याची टंचाई भासल्यास म्हणजेच दरडोई दर दिवशी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता २० लिटर्स पेक्षा कमी झाल्यास टंचाई अंतर्गत घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांमधील उपयुक्त टंचाई निवारक उपाययोजना घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत.

शासनाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ ग्रामीण/नागरी क्षेत्रात द्यावयाच्या उपाययोजनांकरिता वेळोवेळी स्थायी आदेशाव्दारे सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. त्या धर्तीवर राज्यातील संभाव्य पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचे निवारण करण्यासाठी खालीलप्रमाणे दक्षता घेण्याबाबत/उपाययोजना राबविण्याबाबत पुन:श्च सूचना देण्यात येत आहेत.

१) बऱ्याचदा राज्यात पावसाचे प्रमाण समाधानकारक असले तरी त्याचे प्रमाण सर्वत्र समान नसते. त्यामुळे राज्यातील काही जिल्ह्यांत/भागांत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत असते. हे लक्षात घेऊन शासनाच्या संदर्भाधिन स्थायी आदेशातील सूचनांच्या अनुषंगाने टंचाई कालावधीत तत्परतेने कार्यवाही सुरु करणे अपेक्षीत आहे.

२) पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना प्रस्तावित करताना त्या खरोखरच गरजेप्रमाणे आवश्यक आहेत काय याची खात्री करावी. टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणारी उपाययोजना मंजूर करताना ती किमान खर्चाची असल्याची दक्षता घेण्यात यावी. उपाययोजना कार्यान्वीत होण्यासाठी लागणारा वेळ व उपाययोजना कार्यान्वीत केल्यानंतर त्याव्दारे प्रत्यक्ष उन्हाळ्यात लोकांना पाणी उपलब्ध होईल किंवा कसे हे विचारात घेऊन उपाययोजना मंजूर करण्याबाबत वेळोवेळी सुचना देऊनही असे निदर्शनास आले आहे की, टंचाई कृती आराखड्यात प्रस्तावित उपाययोजनांना मे/जून महिन्यात मंजूरी दिली जाते व उपाययोजना प्रत्यक्ष कार्यान्वीत होईपर्यंत पावसाळा सुरु होतो. यासाठी टंचाई कालावधीसाठी तयार करण्यात येणाऱ्या टंचाई कृती आराखडयातील उपाययोजनांना वेळीच मंजुरी देऊन त्या प्रत्यक्षात कार्यान्वित होऊन, उन्हाळयातील टंचाईच्या काळात पिण्याचे पाणी उपलब्ध होईल याची दक्षता घेण्यात यावी.

३) संभाव्य पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचे निवारण करण्याच्या दृष्टीने गावातील पिण्याच्या पाण्याच्या अस्तित्वात असलेल्या योजना नादुरुस्त झाल्या असतील तर त्या फेब्रुवारी पूर्वी दूरुस्त करुन, ग्रामस्थांस उन्हाळयात सदर योजनांपासून किमान पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होईल अशी दक्षता सर्व संबंधित यंत्रणांनी घ्यावी. जेणेकरुन टंचाई निवारण कार्यक्रमाखाली आणखी अन्य तत्कालिन उपाययोजना करुन ग्रामस्थांना पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता भासणार नाही.

४) **विंधण विहिरीचा कार्यक्रम :-** संभाव्य टंचाईग्रस्त गावांना नवीन विंधण विहिरी घेण्याचा पर्याय किफायतशीर ठरणार असेल तर तेथे पाणी टंचाई सुरु होण्यापूर्वी नवीन विंधण विहिरी घेता येतील असे पहावे. केवळ पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत विंधण विहिरी न घेता आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम व पाणी पुरवठयाच्या इतर योजनांतर्गत तरतुदींचाही पुरेपूर वापर करण्यात यावा.

५) **प्रगतीपथावरील नळ योजना शिघ्र गतीने पुर्ण करणे :-** संभाव्य पाणी टंचाईग्रस्त गावांतील ज्या नळ योजनांची पूर्वीच हाती घेतलेली कामे प्रगतीपथावर असतील व ती पूर्ण झाल्यास, चालू वर्षाच्या उन्हाळयात ग्रामस्थांना त्याचा लाभ मिळणार असेल तर अशा योजनांच्या कामांना प्राधान्य देऊन योजनांतर्गत निधीचा पुरेपूर वापर करुन त्या त्वरीत पूर्ण करण्यात याव्यात.

६) **तात्पुरत्या नळ योजना घेणे :-** टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत तात्पुरत्या पूरक नळ योजना किमान खर्चाच्या असाव्यात. तसेच सदर योजनांची अंदाजपत्रके व आराखडे मोका पाहणीवर आधारीत व प्रत्यक्ष भूस्तर तपासणी करुन वस्तुनिष्ठ तयार करावीत. तसेच पूर्वीच्या योजनेच्या साधनसामुग्रीचा योग्य तो वापर करण्यात यावा. योजना मंजूर करताना निविदा प्रक्रिया, साहित्याची उपलब्धता इ. सर्व बाबी लक्षात घेऊन योजना प्रत्यक्षात कार्यान्वित होण्यासाठी लागणारा कालावधी विचारात घेण्यात यावा. **दिनांक ३१ मार्च नंतर तातडीच्या पाणी पुरवठा योजनांना क्षेत्रीय स्तरावर मंजूरी देण्यात येऊ नये**.

शासन स्तरावर तसेच क्षेत्रीय स्तरावर मंजूर केलेल्या तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनांसाठी सुरुवातीला शासनाकडून अनुज्ञेय अनुदानाच्या ५०% अनुदान उपलब्ध करुन देण्यात यावे. योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित ५०% अनुदानांची मागणी करताना ती संदर्भ क्र. ३ च्या शासन परिपत्रकात नमूद विवरणपत्रातच करावी. उर्वरित ५०% अनुदान शासनाच्या परवानगी शिवाय देण्यात येऊ नये.

७) **नळ योजनांची विशेष दुरुस्ती :-** नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीचे प्रस्ताव हे टंचाई निवारणार्थ इतर उपाययोजना घेण्यापेक्षा व्यवहार्य ठरत असतील तरच जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी त्यांना असलेल्या वित्तीय अधिकारात मंजूर कराव्यात. सदर प्रस्ताव मंजूर करताना निविदा प्रक्रिया, साहित्याची उपलब्धता इ. सर्व बाबी लक्षात घेऊन योजना प्रत्यक्षात कार्यान्वित होण्यासाठी लागणारा कालावधी विचारात घेण्यात यावा. **दिनांक ३१ मार्च नंतर नळ योजनेतील विशेष दुरुस्त्यांना क्षेत्रिय स्तरावर मान्यता देण्यात येऊ नये.**

८) **विहिरी खोल करणे व गाळ काढणे :-** विहिरीची खोली आवश्यकतेपेक्षा कमी असल्यास स्त्रोताची क्षमता कमी होते म्हणून बऱ्याच वेळा नवीन स्त्रोत निर्माण करुन दयावा लागतो. नवीन स्त्रोत निर्माण करण्यापेक्षा उपलब्ध स्त्रोत पूर्णत: विकसित करणे आर्थिक दृष्टया किफायतशीर होईल. तसेच विहिरीची खोली वाढविल्याने पाण्याची आवक वाढून पाण्याच्या टंचाईची तिव्रता कमी होऊ शकेल. याबाबी विचारात घेऊन विहिरी खोल करणे कार्यक्रम प्राधान्याने राबविण्यात यावा.

९) **टँकर/बैलगाडी द्वारे पाणी पुरवठा करणे :-** आकस्मिक उपाययोजनांव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे शक्य नसल्यास टँकर/बैलगाडीने पाणी पुरवठा करणे ही एक खर्चिक बाब असल्याने ती उपाययोजना अपरिहार्य परिस्थितीतच मंजूर व्हावी. शासकीय टँकर/वाहने अपुरे पडतील अशा वेळीच खाजगी टँकरने पाणी पुरवठा करण्यास मंजूरी द्यावी. पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईच्या काळात टँकरने पाणी पुरवठा करणे ही योजना अधिक कार्यक्षमरित्या राबविली जावी व तक्रारीस वाव राहू नये या दृष्टीकोनातून संदर्भीय शासन परिपत्रक क्रमांक ४ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

अ) **गावासाठी टँकर मंजूरीचे प्रस्ताव तहसिलदार, उपविभागीय कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या स्तरावर चार दिवसांपेक्षा जास्त काळ प्रलंबित ठेवू नयेत.** या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ निर्णय घेणे आवश्यक आहे.

ब) शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, टँकरच्या निविदा प्रक्रिया, टँकरच्या खेपा याबाबतचे नियंत्रण क्षेत्रीय स्तरावरुन ठेवले जात नसल्याने, टँकरने पाणी पुरवठा करण्यासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त होत असतात. तसेच टंचाई कालावधीत गावामध्ये टँकर्स आल्यास टँकरच्या दिशेने लोकांची झुंबड उडते व त्यातून तणाव निर्माण होतो. काही वेळा अपघात होऊन लोक मृत्यू देखील पावतात. त्यामुळे ज्या गावामध्ये पाणी पुरवठा करण्यात येणार आहे, त्या ठिकाणी सर्व नागरिकांना टँकर पोहोचण्यापूर्वी सूचना देण्यात याव्यात. सूचना देण्यासाठी दूरध्वनी, एसएमएस अथवा अन्य सोईच्या पर्यायांचा विचार करण्यात यावा. संबंधित गावातील नागरिकांना पाणी उपलब्ध होण्यासाठी त्या गावामध्ये जेवढी पाण्याची आवश्यकता आहे, तेवढेच पाणी टँकरद्वारे पुरविण्याच्या दृष्टीने योग्य ते नियोजन करावे. जेणेकरुन तेथील नागरिकांना योग्य पाणी पुरवठा होऊन अनुचित प्रकार घडणार नाही, याची कृपया दक्षता घ्यावी.

क) शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, टँकरच्या फे-या नियोजीत वेळापत्रकाप्रमाणे निर्धारीत वेळेत होत नाहीत. टँकरच्या बनावट फे-या दाखवून देयके अदा करण्यात येतात. **असे गैरप्रकार टाळण्याच्या दृष्टीने टँकर्सवर जी पी एस प्रणालीचा वापर अनिवार्य करण्यात आलेला आहे. सदर प्रणाली बसविणे, त्याची देखभाल दुरुस्ती याबाबीचा सर्व खर्च संबंधित टँकर वाहतूक धारकाने करण्याबाबतची अट टँकर्स वाहतूक धारकांसोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यात नमूद करावी. पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर GPS प्रणाली बसविल्यानंतर GPS प्रणालीवर ज्या टँकरची नोंद होईल त्याच फेऱ्या देयकाकरिता अनुज्ञेय होतील. ज्या पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर GPS प्रणाली नसेल किंवा GPS प्रणाली असूनही त्या बंद असल्याकारणाने टँकर वाहतूक धारकाने टँकरच्या फेऱ्या झाल्याचा दावा केला असल्यास अशा फेऱ्या बनावट ठरतील. त्यांची देयके अदा करण्यात येऊ नये.**

१०) अ) विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणाऱ्या तात्पुरत्या पूरक नळ योजनांचे व नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीचे प्रस्ताव हे टंचाई निवारणार्थ इतर उपाय योजना

**घेण्यापेक्षा व्यवहार्य ठरत असतील तरच योग्य शिफारशींसह शासन स्तरावर विशेष बाब म्हणून मंजूरीसाठी तातडीने सादर करावेत. याबाबत असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषद स्तरावरुन जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांमार्फत प्रस्ताव शासनाकडे प्राप्त होण्यास २-३ महिन्याचा कालावधी लागतो. परिणामी योजना प्रत्यक्षात वेळीच कार्यान्वित न झाल्याने पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेण्याचा हेतू सफल होत नाही. पाणी टंचाई ही अत्यंत संवेदनशील बाब असल्याने, प्राप्त प्रस्ताव कोणत्याही स्तरावर आठ दिवसापेक्षा जास्त दिवस प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता संबंधित कार्यालयांनी घ्यावी.**

ब) तात्पुरत्या पूरक नळ योजना व नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीच्या योजनांना शासन स्तरावरुन सुध्दा विशेष बाब म्हणून दिनांक १५ एप्रिल नंतर मंजूरी देण्यात येणार नाही. जेणेकरुन एक महिन्याच्या आत कामे पूर्ण होऊन प्रत्यक्ष उन्हाळयात योजनांचा लाभ जनतेला मिळू शकेल.

११) पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या उपाययोजनांवरील खर्च भागविण्यासाठी केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निवारण सहाय्यामधून निधी प्राप्त होत असतो. **सदर निधीतून प्रत्यक्ष खर्च केलेल्या निधीची उपाययोजनानिहाय व जिल्हानिहाय माहिती दरमहा तसेच वेळोवळी शासनास सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त निधी, प्रत्यक्ष झालेला खर्च, शिल्लक निधी इत्यादी बाबतची माहिती व उपयोगीता प्रमाणपत्रे सादर केल्याशिवाय पुढील निधी वितरीत केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.** सदर बाब विचारात घेऊन उपलब्ध करुन दिलेल्या शासकीय निधीचा योग्य विनियोग करुन उपयोगीता प्रमाणपत्रे शासनास तात्काळ सादर करण्याची तसेच निधीचा गैरवापर होणार नाही याबाबत क्षेत्रीय अधिका-यांनी दक्षता घ्यावी.

**अ) आर्थिक वर्षात वाटप करण्यात आलेल्या निधीची त्या वर्षीच्या दिनांक ३१ मार्च पर्यंत घेण्यात येणाऱ्या टंचाई उपाययोजनांसाठी आवश्यकता नसल्यास शिल्लक निधी विहित वेळेत शासनाकडे समर्पित करण्यात यावा. सदर निधी पुढील आर्थिक वर्षी घेण्यात येणाऱ्या उपाययोजनेच्या खर्चासाठी शिल्लक ठेवण्यात येऊ नये. असे करणे ही एक आर्थिक अनियमितता आहे.**

ब) **रक्कम वेळेवर अदा करणे** :- शासनाकडून अनुदान उपलब्ध झालेले असताना केलेल्या कामाची देयके, प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत कोणत्याही परिस्थितीत अदा करता येईल याकडे विशेष लक्ष दयावे.

१२) **तक्रारीचे निवारण** :- जनतेकडून येणा-या पाणी टंचाईच्या तक्रारींची तत्परतेने नोंद घेऊन उपाययोजना करण्यात याव्यात. पाणी टंचाई निवारण कार्यक्रम राबविण्यात कसूर झाल्यास लोकप्रतिनिधीकडून व वृत्तपत्रातून मोठया प्रमाणात तक्रारी मांडल्या जातात. ही वस्तूस्थिती विचारात घेऊन अशा तक्रारींना वाव राहू नये म्हणून वरील प्रमाणे तातडीने कार्यवाही करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१४१३४४०४२४२८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sham Lal Goyal

Digitally signed by Sham Lal Goyal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fef8a156530c1999143668f755340[illegible]b9d3ad380fcde16709e4e63210467e734, [illegible]19d0cb2b5b2018974e0c848[illegible]4c0d347d2a12395c8dffac4670f8, cn=Sham Lal Goyal
Date: 2018.02.14 15:00:51 +05'30'

(शाम लाल गोयल)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. अध्यक्ष, विधानसभा/मा. सभापती, विधान परिषद, विधानभवन, मुंबई.
२. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/विधान परिषद, विधानभवन, मुंबई.
३. सर्व विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
४. मा. राज्यपाल यांचे सचिव.
५. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
६. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, वित्त विभाग/नियोजन विभाग व सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, महसूल व वनविभाग (मदत व पुर्नवसन), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
११. विभागीय आयुक्त, (सर्व).
१२. जिल्हाधिकारी (सर्व).
१३. संचालक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
१४. जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, (सर्व).
१५. कार्यकारी अभियंता (सर्व) ग्रामीण पाणी पुरवठा /जिल्हा परिषद.
१६. निवड नस्ती (पापु-१४).

**राज्यातील ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
## शासन परिपत्रक क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. २०/पापु-१४

जी. टी. रुग्णालय संकुल, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: २६ ऑक्टोबर, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई ३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४, दिनांक १ फेब्रुवारी, १९९९.
२) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २०९९/प्र.क्र.१४/पापु-१४, दिनांक २ फेब्रुवारी, १९९९.
३) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई १०९९/प्र.क्र.१२/पापु-१४, दिनांक ३ फेब्रुवारी, १९९९.
४) शासन परिपत्रक, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई १००५/प्र.क्र.३०५/पापु-१४, दिनांक २४ जानेवारी, २००६.
५) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २००८/प्र.क्र.१४९/पापु-१४, दिनांक २१ ऑगस्ट, २००९.
६) शासन परिपत्रक, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई १०१३/प्र.क्र.८४१/पापु-१४, दिनांक ४ जानेवारी, २०१४.
७) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २०१४/प्र.क्र.४८/पापु-१४, दिनांक ६ मे, २०१४.
८) शासन परिपत्रक, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. २०/पापु-१४, दिनांक १४ फेब्रवारी, २०१८.

परिपत्रक :-

राज्यात या वर्षी असमाधानकारक पाऊस झाला आहे. त्यामुळे राज्यातील काही जिल्ह्यांत या वर्षी तीव्र पाणी टंचाई भासण्याची शक्यता आहे. तरी, राज्यातील काही जिल्ह्यांत टँकरव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. शासनाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ ग्रामीण/नागरी क्षेत्रात घ्यावयाच्या उपाययोजना करीता वेळोवेळी स्थायी आदेशांव्दारे सविस्तर सूचना दिलेल्या आहेत.

त्या धर्तीवर यावर्षी राज्यातील संभाव्य पिण्याच्या पाण्याच्या टंचाईस तोंड देण्यासाठी खालील प्रमाणे दक्षता घेण्याबाबत/उपाययोजना राबविण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत :-

१) राज्यातील काही जिल्हयात /भागात पावसाचे प्रमाण अत्यल्प प्रमाणे असल्यामुळे त्या जिल्ह्यांत/भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे अथवा काही कालावधीतच पाणी टंचाई निर्माण होणार आहे. हे लक्षात घेऊन शासनाच्या संदर्भाधिन स्थायी आदेशातील सूचनांच्या अनुषंगाने टंचाई कालावधीत तत्परतेने कार्यवाही सुरु करणे अपेक्षीत आहे. संदर्भाधीन शासन निर्णयांच्या प्रती उपलब्ध नसल्यास त्या तातडीने उपलब्ध करुन घ्याव्यात.

२) टंचाई हाताळण्यासंदर्भात संदर्भाधीन स्थायी आदेशातील सूचना तसेच शासन परिपत्रक समक्रमांक दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ अन्वये सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार तातडीने उचित कार्यवाही करण्यात यावी.

३) **टँकर/बैलगाडी द्वारे पाणी पुरवठा करणे** :- आकस्मिक उपाययोजनांव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे शक्य नसल्यास टँकर/बैलगाडीने पाणी पुरवठा करणे ही एक खर्चिक बाब आहे. या योजनेतून कोणतीही मत्ता निर्माण होत नसून नागरिकांच्या दृष्टीने ही योजना फारशी सोईस्कर नाही. ती उपाययोजना अपरिहार्य परिस्थितीतच मंजूर व्हावी. यासाठी प्रथमत: आपआपल्या संबंधीत जिल्हयात उपलब्ध असलेल्या शासकीय टँकरचा पुरेपुर उपयोग करुन घेण्यात यावा. शासकीय टँकर/वाहने अपुरे पडतील अशा वेळीच खाजगी टँकरने पाणी पुरवठा करण्यास मंजूरी द्यावी. पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईच्या काळात टँकरने पाणी पुरवठा करणे ही योजना अधिक कार्यक्षमरित्या राबविली जावी व तक्रारीस वाव राहू नये या दृष्टीकोनातून संदर्भीय शासन परिपत्रक, दिनांक २४ जानेवारी, २००६ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४) **जिल्हास्तरावर टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रत्येक जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात टंचाई नियंत्रण व समन्वयासाठी एक स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात यावा.** सदर कक्षाचा प्रमुखपदी उप जिल्हाधिकारी दर्जाचा अधिका-याची नियुक्ती करण्यात यावी. याबाबतची माहिती शासन स्तरावर कळविण्यात यावी.

५) **तक्रारीचे निवारण** :- जनतेकडून येणा-या पाणी टंचाईच्या तक्रारींची तत्परतेने नोंद घेऊन उपाययोजना करण्यात याव्यात. पाणी टंचाई निवारण कार्यक्रमात कसूर झाल्यास लोकप्रतिनिधीकडून व वृत्तपत्रातून मोठया प्रमाणात तक्रारी मांडल्या जातात. ही वस्तूस्थिती विचारात घेऊन अशा तक्रारींना वाव राहू नये म्हणून वरील प्रमाणे तातडीने कार्यवाही करावी. वृत्तपत्रात आलेल्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाई संदर्भात बातम्याबाबत योग्य ती उपाययोजना करुन वृत्तपत्रास जिल्हाधिका-यांकडून खुलासाही पाठविण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१०२६१२१०५३८२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sham Lal Goyal

Digitally signed by Sham Lal Goyal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Watersupply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fef8a156550c1999143688f755340 [illegible]b9d3ad380fcde16709e4e63210467e734 serialNumber=[illegible]d0cb2b5b2018974e0c84 8afbd781451d1[illegible]4c0d347d2a12395c8dffac 4670f9, cn=Sham Lal Goyal
Date: 2018.10.26 13:00:20 +05'30'

(श्यामलाल गोयल)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२,
५. प्रधान सचिव, वित्त विभाग/नियोजन विभाग व ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. सचिव, महसूल व वनविभाग (मदत व पुर्नवसन), मंत्रालय, मुंबई-३२,
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई,
८. विभागीय आयुक्त, (सर्व)
९. जिल्हाधिकारी (सर्व),
१०. जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, (सर्व),
११. कार्यकारी अभियंता (सर्व) ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद
१२. निवड नस्ती (पापु-१४).

**राज्यातील ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. १९१/पापु-१४**

गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, लोकमान्य टिळक मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०० ००१

तारीखः २७ नोव्हेंबर, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई ३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४, दिनांक १ फेब्रुवारी, १९९९.

२) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २०९९/प्र.क्र.१४/पापु-१४, दिनांक २ फेब्रुवारी, १९९९.

३) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई १०९९/प्र.क्र.१२/पापु-१४, दिनांक ३ फेब्रुवारी, १९९९.

४) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २००८/प्र.क्र.१४९/पापु-१४, दिनांक २१ ऑगस्ट, २००९.

५) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २०१४/प्र.क्र.४८/पापु-१४, दिनांक ६ मे, २०१४.

६) शासन परिपत्रक, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. २०/पापु-१४, दिनांक १४ फेब्रवारी, २०१८.

परिपत्रक :-

राज्यात या वर्षी असमाधानकारक पाऊस झाला आहे. त्यामुळे राज्यातील काही जिल्ह्यांत या वर्षी तीव्र पाणी टंचाई भासण्याची शक्यता आहे. यासंदर्भात, शासनाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ ग्रामीण/नागरी क्षेत्रात घ्यावयाच्या उपाययोजनांकरीता वेळोवेळी स्थायी आदेशांव्दारे सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. यावर्षी राज्यातील संभाव्य पिण्याच्या पाण्याच्या टंचाईस तोंड देण्यासाठी उपाययोजना पूर्ण करताना तसेच योजनेचा निधी वितरित करताना सुसूत्रता येण्याच्या दृष्टीने विभागीय आयुक्त स्तरावर तसेच जिल्हाधिकारी यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) टंचाई अंतर्गत घेण्यात आलेल्या उपाययोजनांसाठी निधी वितरित करताना योजनेच्या सुरुवातीस ५०% निधी वितरित करावा तसेच योजना पूर्ण झाल्यानंतर उर्वरित ५०% निधी द्यावा, अशी अट योजनेच्या प्रशासकीय मंजूरीमध्ये नमूद करण्यात आलेली आहे. तथापि टंचाई अंतर्गत घेण्यात आलेल्या उपाययोजनांसाठी निधी वितरित करताना योजनेच्या सुरुवातीस ५०% निधी वितरित करावा. तथापि उर्वरित निधी योजनेच्या आवश्यकतेनुसार तसेच झालेल्या प्रगतीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्तांनी प्रकरणनिहाय आढावा घेऊन योजनेच्या एकूण खर्चाच्या ८० टक्के रक्कम योजना पूर्ण होण्यापूर्वी, योजना मुदतीत, टंचाई कालावधीतच पूर्ण करुन पाणी पुरवठा सुरु होण्याच्या दृष्टीने निधी संबंधितांना वितरित करण्याबाबतचा निर्णय घ्यावा.

२) तसेच शासन स्तरावरुन विभागीय आयुक्तांना निधी वितरित करताना जिल्हाधिकाऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने उपाययोजनानिहाय निधी वितरित करण्यात आला असला तरी सदर निधी अन्य उपाययोजनांसाठी अथवा त्यांच्या विभागातील अन्य जिल्हयांसाठी उपयोगात आणण्यासाठी शासनाची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. याबाबत विभागीय आयुक्तांनी विचारपूर्वक निर्णय घेऊन त्याप्रमाणे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना परवानगी द्यावी व त्याप्रमाणे शासनास कळविण्यात यावे.

३) शासनस्तरावरुन टंचाई अंतर्गत प्राप्त झालेला निधी प्राधान्याने विहिर अधिग्रहणाची देयके अदा करण्यासाठी वितरीत करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत विहिर अधिग्रहणाची देयके प्रलंबित राहु नयेत. सदर विहिर अधिग्रहणाची देयके एक महिन्याच्या कालावधीत प्रदान होणे आवश्यक आहे, याबाबतची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी घेणे आवश्यक आहे.

४) तसेच टंचाई अंतर्गत घेण्यात येणाऱ्या नागरी तथा ग्रामीण उपाययोजनांना शासन स्तरावरुन अथवा जिल्हाधिकारी स्तरावरुन प्रशासकीय मंजूरी देण्यात येते. तथापि अशा योजनांबाबत काही वाद-विवाद उत्पन्न झाल्यास विभागीय आयुक्तांनी आवश्यकतेनुसार संबंधित जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसेच संबंधित अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांच्याशी विचारविनिमय करुन याबाबतचा उचित निर्णय घ्यावा. असा विभागीय आयुक्तांनी घेतलेला निर्णय अंतिम असेल. अशा प्रकरणी शासन स्तरावर प्रस्ताव पाठवून योजना पूर्ण करण्यास अथवा योजनेची देयके अंतिम करण्यास अनावश्यक विलंब करण्यात येऊ नये.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८११२७१५३२१९१९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
Date: 2018.11.28 12:27:23 +05'30'

(पां. रा. खोटरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२,
५. प्रधान सचिव, वित्त विभाग/नियोजन विभाग व ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. सचिव, महसूल व वनविभाग (मदत व पुर्नवसन), मंत्रालय, मुंबई-३२,
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई,
८. विभागीय आयुक्त (सर्व),
९. जिल्हाधिकारी (सर्व),
१०. जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व),
११. कार्यकारी अभियंता (सर्व) ग्रामीण पाणी पुरवठा /जि.प.,
१२. निवड नस्ती (पापु-१४).

**टंचाई परिस्थितीत टँकर्सचे अधिकार उप विभागीय अधिकारी यांना प्रदान करणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : एससीवाय-२०१८/प्र.क्र.२४७/म-७,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०१८

**प्रस्तावना :**

राज्यात झालेल्या कमी पर्जन्यमानामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. राज्यात १५१ तालुक्यांमध्ये व २६८ महसूली मंडळामध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार विविध उपाययोजना लागू करण्यात आलेल्या आहेत. सध्या पिण्याच्या पाण्याचे टँकर्स मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. राज्यातील दुष्काळी परिस्थिती व पाण्याची टंचाई विचारात घेता टँकर्स मंजूर करण्याबाबतचे जिल्हाधिकारी यांना असलेले अधिकार संबंधित उप विभागीय अधिकारी यांना प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

दुष्काळी परिस्थिती व पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेऊन दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या जिल्हयांमध्ये पिण्याच्या पाण्याचे टँकर्स मंजूर करण्याचे जिल्हाधिकारी यांना असलेले अधिकार संबंधित उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

दुष्काळ घोषित केलेल्या जिल्हयांव्यतिरिक्त इतर जिल्हयांच्या बाबतीत पिण्याच्या पाण्याचे टँकर्स मंजूर करण्याचे अधिकार आवश्यकतेनुसार संबंधित उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी यांना प्रदान करण्यासाठी विभागीय आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८११२९१७५५०६५०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.**

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
... Government Of Maharashtra, ... Revenue and Forest
Department, postalCode=400032, st=Maharashtra, ...
Date: 2018.11.29 17:58:36 +05'30'

(सुभाष उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
५. सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

७. सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद / पाटबंधारे विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ, मुंबई
९. सर्व मुख्य अभियंता, ग्रामीण / नागरी पाणी पुरवठा
१०.महालेखापाल / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
११.महालेखापाल /, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य मुंबई / नागपूर
१२.वित्त विभाग (अर्थसंकल्प-/व्यय-९) मंत्रालय, मुंबई
१३.अवर सचिव (म-३/म-११) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. कार्यासन अधिकारी (पापु-१४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. निवड नस्ती, कार्यासन म-७, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

**प्रत माहितीसाठी अग्रेषित**

१. मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबइ
३. अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

**महाराष्ट्र पिण्याच्या पाणी पुरवठयाचे अधिग्रहण अधिनियम, १९८३ मधील कलम ८ मध्ये १९९२ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार पाणी टंचाईच्या कालावधीमध्ये अधिग्रहीत केलेल्या विहिरीच्या मोबदल्याचे सुधारित दर मंजूर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र.१६७/पापु-१४**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: ३० नोव्हेंबर, २०१८

**वाचा :-**

१) दिनांक १५ एप्रिल, १९८३ चा महाराष्ट्र पिण्याचे पाणी पुरवठयाचे अधिग्रहण अधिनियम १९८३

२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई ३०९९/प्र.क्र. १३/पापु-१४ दिनांक ०१ फेब्रवारी, १९९९
शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई २०१२/प्र.क्र. ५३/पापु-१४, दिनांक ३० एप्रिल, २०१२

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र पिण्याच्या पाणी पुरवठयाचे अधिग्रहण करण्याबाबत अधिनियम १९८३, दिनांक १५ एप्रिल, १९८३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे. या अधिनियमातील कलम ३ मधील तरतुदीनुसार पाणी टंचाई कालावधीत राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी विहिरी अथवा अन्य जलाशयातून पिण्याकरिता पाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने खाजगी मालकांचे जलसाठे लेखी आदेशाद्वारे अधिग्रहण करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी अथवा जिल्हाधिका-यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास प्रदान करण्यात आलेले आहेत. या अधिनियमातील कलम ८ (अ) व ८(ब) अन्वये खाजगी मालकांचे जलसाठे अधिग्रहीत करण्यात आल्यानंतर त्यांच्या मालकांना दयावयाचा मोबदला निश्चित करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र पिण्याच्या पाणी पुरवठयाचे अधिग्रहण अधिनियम, १९८३ मधील कलम-८ मध्ये सुधारणा करण्यात आली असून, सदर सुधारणेनुसार पिण्याच्या पाण्याची विहिर अधिग्रहीत केलेल्या विहिर मालकांना पाण्याचा मोबदला देण्याकरिता १९८३ च्या मूळ अधिनियमातील कलम ८ (अ) व ८(ब) अन्वये मोबदला देण्याची तरतूद अधिक्रमित करण्यात आली असून त्याऐवजी खाजगी मालक व

प्राधिकृत अधिकारी यांनी मोबदल्यासंदर्भात करार करण्याची तरतूद करण्यात आली असून मोबदल्याच्या दराची कमाल मर्यादा राज्य शासनाने वेळोवेळी ठरवावयाची आहे.

सद्य:स्थितीत संदर्भ क्रमांक-३ येथील दिनांक ३० एप्रिल, २०१२ च्या शासन निर्णयानुसार खाजगी विहिर अधिग्रहीत केल्यानंतर त्या विहिर मालाकाने पाणी काढण्यासाठी विद्युत / डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामुग्री उपलब्ध करुन दिली नसल्यास प्रतिदिन रु. ३००/- या कमाल मर्यादेत व विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विद्युतपंप /डिझेलपंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामुग्री उपलब्ध करुन दिली असल्यास प्रतिदिन रु. ४००/- कमालमर्यादेत अधिग्रहण मोबदला दिला जात आहे. दरम्यानच्या कालावधीत सर्वस्तरावर बरीच भाववाढ झालेली असल्याने, विहिर अधिग्रहणाच्या मोबदल्यात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र पिण्याचे पाणी पुरवठयाचे अधिग्रहण अधिनियम १९८३ च्या अधिनियमातील कलम ८ मध्ये दिनांक २४ एप्रिल, १९९२ च्या Maharashtra Act No. V of १९९२ अन्वये केलेल्या सुधारणेनुसार अधिग्रहण मोबदल्याच्या दराची कमाल मर्यादा ठरविण्याबाबत राज्य शासनास असलेल्या अधिकाराचा वापर करुन सन २०१२ मध्ये निश्चित केलेल्या विहिर अधिग्रहणाची मोबदल्याची कमाल मर्यादा पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

"खाजगी विहिर अधिग्रहीत केल्यानंतर त्या विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विद्युत/डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामुग्री उपलब्ध करुन दिली नसल्यास रु. ४५०/- या कमाल मर्यादेत व विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विद्युतपंप/ डिझेलपंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामुग्री उपलब्ध करुन दिली असल्यास प्रतिदिन रु. ६००/- कमालमर्यादत विहिर अधिग्रहण मोबदला देण्यात यावा".

२. वरीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या मोबदल्यासंदर्भात विहिर मालकाशी कायदेशीर करार करण्यात यावा.

३. विहिर अधिग्रहीत करताना १९८३ च्या अधिनियमातील इतर तरतूदींचाही काटेकोरपणे वापर करावा व अधिग्रहण मोबदल्याची रक्कम दर तीन महिन्यांनी वेळच्या वेळी संबंधितांना अदा करावी. सदर अनुज्ञेय असलेल्या मोबदल्याची मागणी ग्रामपंचायत / गट विकास अधिकारी यांच्यामार्फत येण्याची प्रतिक्षा न करता तपासणी करुन संबंधितांना प्रदान करण्यात येतील याची कृपया दक्षता घ्यावी.

४. पाणी टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या उपरोक्त विहिर अधिग्रहण मोबदल्याचा खर्च नैसर्गिक आपत्ती निवारण सहाय्य लेखाशिर्ष २२४५ ००९३ अंतर्गत उपलब्ध होणा-या निधीतून भागविण्यात यावा

५. वरील आदेश हा शासन निर्णय निर्गमीत झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

६. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३०७/२०१८/व्यय-३, दिनांक १.११.२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८११३०१०५४४८८८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

Pandurang
Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
Date: 2018.11.30 12:17:32 +05'30'

(पां.रा. खोटरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई,
४. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई,
५. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद सदस्य, विधानभवन, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई,
९. सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०.संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
११.विभागीय आयुक्त ( सर्व ),
१२.जिल्हाधिकारी, (सर्व),
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद, (सर्व ),
१४.अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व ),
१५.कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, (सर्व ),
१६. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व ),
१७. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा ( सर्व ),
१८. जिल्हा स्थानिक निधी लेखा परिक्षक (सर्व ),
१९. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व ),
२०. महालेखापाल, महाराष्ट्र-१,मुंबई (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता),
२१.महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता),
२२.भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक,

२३.सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी,

२४.सर्व तहसिलदार,

२५.अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,

२६.उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,

२७.निवड नस्ती, पापु-१४.

**राज्यातील दुष्काळी भागातील ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनांची थकीत विद्युत देयकांची रक्कम टंचाई निधीतून देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय- २०१८/प्र.क्र.२४६/म-७**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ११ डिसेंबर, २०१८

**वाचा:-** १) शासन निर्णय क्रमांकः- एससीवाय २०१८ /प्र.क्र.८९/म-७
दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८
२) शासन निर्णय क्रमांकः- एससीवाय २०१८ /प्र.क्र.८९/म-७
दिनांक ६ नोव्हेंबर, २०१८

**प्रस्तावना :-**

महसुल व वन विभाग संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राज्यात सन २०१८ च्या खरीप हंगामात १५१ तालुक्यात व २६८ महसुली मंडळामध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. राज्यातील दुष्काळाची गंभीर परिस्थिती विचारात घेऊन, पिण्याच्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी विविध उपाय योजना हाती घेण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून राज्यातील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची विद्युत देयके थकीत असल्यामुळे, अशा योजना सध्या बंद आहेत. सदरहू योजना चालू केल्यास, लोकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळितपणे होऊ शकतो व टँकरवरील खर्चात बचत होऊ शकेल, याकरिता ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची विद्युत देयके टंचाई निधीतून अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी मा. मंत्रिमंडळ उपसमिती बैठक क्र. ३ मध्ये खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त पार्श्वभूमीवर महसुल व वन विभाग शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ अन्वये राज्यात दुष्काळ घोषित केलेल्या १५१ तालुके व दिनांक ६ नोव्हेंबर, २०१८ अन्वये दुष्काळ घोषित केलेल्या २६८ महसुली मंडळात तसेच भविष्यात दुष्काळ घोषित झाल्यास अशा भागातील राज्यातील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची प्रलंबित असलेल्या थकीत विद्युत देयकांच्या मुद्दल रकमेपैकी ५% रक्कम सध्या मदत व पुनर्वसन विभागाकडून भरण्यात येईल व अशा योजनांचा खंडीत वीज पुरवठा सुरु करण्यात यावा. तसेच राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थिती, पाणीसाठे यांचा विचार करता नोव्हेंबर २०१८ ते जून २०१९ या ८ महीन्यांच्या कालावधीतील दुष्काळ घोषित केलेल्या १५१ तालुके व २६८ महसुली मंडळातील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची चालू विद्युत देयके मदत व पुनर्वसन विभागाच्या टंचाई निधीतून अदा करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. या प्रयोजनार्थ अदा करावयाची रक्कम २२४५ या लेखाशिर्षाखाली मागणी क्र. सी-६, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा (९२), राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च (९२) (०१)

पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (अनिवार्य), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (२२४५ २१८५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. हा निधी उर्जा विभागाकडे सुपुर्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८१२११२२१५६६२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

(सुभाष उमराणीकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग), मंत्रालय, मुंबई,
२) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव , (उर्जा) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
४) सर्व विभागीय आयुक्त,
५) सर्व जिल्हाधिकारी
६) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य,मुंबई/ नागपूर
७) महालेखापाल १/२, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य,मुंबई/ नागपूर
८) संचालक लेखा व कोषागारे, मुंबई
९) वित्तीय सल्लागार व सह सचिव (मदत व पुनर्वसन)
१०) वित्त विभाग (व्यय-९/अर्थसंकल्प-६) मंत्रालय मुंबई
११) कक्ष अधिकारी (म-३/म-११) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) निवडनस्ती, कार्यासन म-७.

**पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणाऱ्या उपाययोजना राबविण्यासाठी आवश्यक असणारा निविदा प्रक्रिया कालावधी शिथिल करणे, डिझेलच्या जनरेटरचा खर्च आणि टँकर्स भरल्यामुळे नळ योजनेसाठी लागणाऱ्या वाढीव विद्युत देयकाची रक्कम टंचाई अंतर्गत मंजूर करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र.२०६ /पापु १४**
जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: १९ डिसेंबर, २०१८

वाचा -

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई १०९९/प्र.क्र. १२/पापु १४, दिनांक ०३.०२.१९९९

२) महसूल व वन विभाग, शासन पत्र क्रमांक एससीवाय २०१८/प्र.क्र. २४६/म-७, दिनांक १५ डिसेंबर, २०१८ (बैठकीचे इतिवृत्त)

प्रस्तावना -

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ यावर्षीच्या टंचाई कालावधीत घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांकरीता निविदांसाठी अल्प मुदतीची निविदा प्रक्रिया राबविणे, विहीर, तलाव अशा उद्भवावरुन पिण्याच्या पाण्याचे टँकर्स भरण्यासाठी वीज नसलेल्या कालावधीत वा विद्युत व्यवस्था उपलब्ध नसलेल्या काही ठिकाणी डिझेलच्या जनरेटरचा वापर करावा लागतो यासाठी जनरेटरच्या भाडयाच्या अथवा जनरेटरसाठी लागणाऱ्या डिझेलचा खर्च टंचाई निधीतून प्रदान करणे तसेच ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या शासकीय विहिरीतून पिण्याच्या पाण्याचे टँकर्स भरण्यासाठी वापर केला जातो त्या ग्रामपंचायतीस वाढीव विद्युत देयक येते. सदर वाढीव विद्युत देयकाची रक्कम संबंधित ग्रामपंचायतीला देण्याबाबत इत्यादी बाबी शासनाच्या विचाराधीन होत्या. या सर्व प्रस्तावांना मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.१२.२०१८ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन टंचाई अंतर्गत पाणी पुरवठ्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत.

तातडीने पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने टंचाई अंतर्गत करावयाच्या उपाययोजनांची कामे त्वरीत पूर्ण करुन टंचाई निवारण करणे आवश्यक असते तसेच नियमित निविदा प्रक्रिया राबवून उपाययोजनेची कामे करण्यासाठी कालापव्य होत असल्याने टंचाई कालावधीत पिण्याच्या पाण्याचे टंचाई निवारणार्थ घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी काढण्यात येणाऱ्या निविदांसाठी अल्प मुदतीची निविदा प्रक्रिया राबविण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाच्या निविदेची किंमत | निविदा सूचना क्रमांक व कालावधी | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम | द्वितीय | तृतीय |
| १ | रुपये ५.०० लाखापेक्षा कमी किंमतीची कामे | ०५ दिवस | ०५ दिवस | ०३ दिवस |
| २ | रुपये ५.०० लाख ते रुपये ५०.०० लाखापर्यंतची कामे | ०७ दिवस | ०५ दिवस | ०३ दिवस |
| ३ | रुपये ५०.०० लाखापेक्षा अधिक किंमतीची कामे | १० दिवस | ०५ दिवस | ०३ दिवस |

२. तसेच विहीर, तलाव अशा उद्भवावरुन पिण्याच्या पाण्याचे टँकर्स भरण्यासाठी वीज नसलेल्या अथवा भारनियमन कालावधीत वीज नसलेल्या ठिकाणी व विद्युत व्यवस्था उपलब्ध नसलेल्या ठिकाणी डिझेलच्या जनरेटरचा वापर करण्यासाठी जिल्हा दरसूचीनुसार भाडयाने घेण्यात आलेल्या जनरेटरसाठीचे भाडे तसेच त्यासाठी लागणाऱ्या डिझेलचा खर्च टंचाई निधीतून भागविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

३. तसेच ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या उद्भवातून अन्य गावासाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर्स भरले जातात. तेथे त्या गावाच्या पाणी पुरवठा योजनेचा देखभाल दुरुस्तीचा खर्च वाढत जातो. त्या ठिकाणी सदर योजनेच्या नियमित विद्युत देयकापेक्षा जास्त विद्युत देयक येते. त्यासाठी जो अतिरिक्त विद्युत देयकाचा खर्च येतो, सदर अधिकचा विद्युत देयक खर्च टंचाई निधीमधून पाणी पुरवठा करणा-या ग्रामपंचायतीला अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

४. प्रस्तुत शासन निर्णय हा मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.१२.२०१८ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णयान्वये घेण्यात आलेले निर्णय हे दिनांक ३०.०६.२०१९ पर्यंतच लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१२१९१४४०३०३४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

R. B. Kumatgi

Digitally signed by R. B. Kumatgi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cde8446df6e4816031bf3672f18f9dbab1603da, cn=R. B. Kumatgi
Date: 2018.12.19 17:25:06 +05'30'

**(राजेंद्र कुमटगी)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, (मा.तं.), मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
७. विभागीय आयुक्त (सर्व)
८. जिल्हाधिकारी (सर्व)
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१०. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
११. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१३. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
१४. जिल्हा स्थानिक निधी लेखा परीक्षक (सर्व)
१५. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)

१६. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
१७. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
१८. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१९. उप सचिव (पापु १४), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
२०. अवर सचिव (पापु १४), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय.
२१. पापु १४ (निवडनस्ती)

पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा करण्यासाठी भाडयाने घेण्यात येणा-या खाजगी टँकर्स व ट्रक्सच्या दराबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र.१६७/पापु-१४**
जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: १९ डिसेंबर, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई ३०९९/प्र.क्र. १३/पापु-१४ दिनांक ०१ फेब्रवारी, १९९९
२) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई १००५/प्र.क्र. ३०५/ पापु-१४, दिनांक २४ जानेवारी, २००६
३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई २००८/प्र.क्र.४८/ पापु-१४, दिनांक ११ जून, २००९
४) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई २०१२/प्र.क्र.५३/ पापु-१४, दिनांक ३० एप्रिल, २०१२
५) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई २०१३/प्र.क्र. ४१८/ पापु-१४, दिनांक ०४ जानेवारी, २०१४

प्रस्तावना :-

पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. मात्र टँकर व ट्रक्सद्वारे होणारा पाणी पुरवठा हा अत्यंत खर्चिक असल्याने अत्यावश्यक असलेल्या ठिकाणीच अशाप्रकारे पाणी पुरवठा करण्यात यावा व शक्यतो शासकीय टॅकर्सचा वापर करावा असे आदेश वेळोवेळी निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि, उन्हाळयात शासकीय टँकर्स अपुरे पडतात त्यावेळी खाजगी टँकर्स भाडयाने घ्यावे लागतात. टँकरचे भाडे टँकर/ट्रक वर बसविलेल्या पाण्याच्या टाकीच्या पाणी वाहून नेण्याच्या क्षमतेनुसार १ मे. टन या एककामध्ये ( Unit) ठरवून त्याप्रमाणात खाजगी टँकर/ ट्रकचे भाडे दिनांक ३० एप्रिल, २०१२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली होते. तसेच दुर्गम व अति दुर्गम भागामध्ये अतितीव्र घाट असल्याने त्याठिकाणी मोठे टँकर जाऊ शकत नाहीत अशा

वेळेस ३००० ते ५००० लिटर्सचे छोटे टँकर त्या ठिकाणी पाठवावे लागतात. परंतू शासन मान्य दर छोट्या टँकर्सना परवडत नसल्यामुळे सदर टॅकर्सचे दर स्वतंत्रपणे ठरविण्याची बाब व मागील सहा वर्षात डिझेलच्या दरात व अन्य खर्चात झालेली वाढ विचारात घेऊन खाजगी टँकर्स व ट्रक्सच्या दरामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी भाडयाने घ्यावयाच्या खाजगी टँकर्स व ट्रक्सचे संदर्भ क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये निश्चित केलेले कमाल दर पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहेत.

| प्रति मे. टन वहन क्षमता | सध्या मिळत असलेले भाडे (रु.) | सुधारित कमाल प्रतिदिन भाडे (रु.) | सध्या कमाल प्रति किलोमीटर भाडे (रु.) | सुधारित कमाल प्रति किलोमीटर भाडे (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ मे. टन | १५८ | २७० | २.०० | ३.४० |

| टँकर / ट्रकवरील टाकींची पाणी वहन करण्याची क्षमता दुर्गम व अतीदुर्गम भागामध्ये अतितीव्र घाट असलेल्या ठिकाणी | सध्या मिळत असलेले कमाल प्रतिदिन भाडे (रु.) | सुधारित कमाल प्रतिदिन भाड (रु.) | सध्या मिळत असलेल्या प्रति. कि. मी. भाडे (रु.) | सुधारित कमाल प्रति किलोमीटर भाडे (रु.) |
|---|---|---|---|---|
| ३००० ते ५००० लिटर्स | १९८ | ३३८ | २.५० | ४.३० |

२. पाणी पुरवठा करण्या-या टँकर/ ट्रकवरील टाकीची पाणी वहन क्षमता आर.टी.ओ. मार्फत प्रमाणित करुन घ्यावी. त्यानुसार टँकर/ट्रकला देण्यात येणारे प्रतिदिन व प्रति कि.मी. भाडे १ मे. टन एककाच्या प्रमाणात देण्यात यावे.

३. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ खाजगी टँकर / ट्रक्सद्वारे करावयाच्या पाणी पुरवठ्यासाठी, टंचाईच्या तीव्रतेनुसार किती खाजगी टँकर्स / ट्रकची (पाण्याची टाकी बसविलेले) आवश्यकता निर्माण होईल याबाबतचा अंदाज घेऊन, संबंधित ठेकेदाराकडून निविदा मागवाव्यात, यासाठी निविदासूचना राज्य व जिल्हा पातळीवरील अधिक खपाच्या वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करावी, जेणेकरून त्यास व्यापक प्रसिध्दी मिळेल. प्राप्त निविदातून कमीतकमी दराची निविदा स्विकारावी.

४. टँकरद्वारे/पिण्याच्या पाणी पुरवठा करण्यासाठीच्या उपाययोजनांकरीता जो निधी वितरीत करण्यात येणार आहे, त्यामधून देयके अदा करताना खाजगी टँकरवर जी.पी.एस. प्रणाली बसविलेली असेल व जी.पी.एस. प्रणालीवर ज्या टँकरच्या फे-यांची नोंद होईल त्याच फेऱ्या देयकाकरिता अनुज्ञेय राहतील. पाणी पुरवठा करणा-या ज्या टँकरवर जी.पी.एस. प्रणाली बसविलेली नाही किंवा

जी.पी.एस. प्रणाली बंद असल्याकारणाने टँकर वाहतूक धारकाने टँकरच्या फे-या झाल्याचा दावा केला असल्यास, अशा फे-या अनुज्ञेय ठरणार नाहीत. तसेच जी.पी.एस. प्रणालीची नोंद होत नाही म्हणून देयके प्रमाणित करण्यात येऊ नये व अशा प्रकारे प्रमाणित केलेल्या देयकांसाठी निधी वितरीत करण्यात येऊ नये.

५. हे आदेश हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

६. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३०७/२०१८/व्यय-३, दिनांक ०१.११.२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१२१९१४४०२००६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sham Lal Goyal

Digitally signed by Sham Lal Goyal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Watersupply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=[illegible]156550c19991[illegible]755340[illegible]
6321046[illegible]e734,
[illegible]=19d0cb2b5b2018974e0c848[illegible]bd781451d1c4c0d347d2
a12[illegible]c4670f9, cn=Sham Lal Goyal
Date: 2018.12.21 11:47:27 +05'30'

( शाम लाल गोयल )
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
५. विभागीय आयुक्त ( सर्व )
६. जिल्हाधिकारी, (सर्व)
७. मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद, (सर्व )
८. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व )
९. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, (सर्व )
१०. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व )
११. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा ( सर्व )
१२. जिल्हा स्थानिक निधी लेखा परीक्षक (सर्व )
१३. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व )
१४. महालेखापाल, महाराष्ट्र-१,मुंबई (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता).

१५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता).
१६. उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय.
१७. अवर सचिव पापु-१४, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय.
१८. निवड नस्ती, पापु-१४.

**पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या अनुषंगाने घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी निविदा स्विकृतीचे अधिकार देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र.२१४ /पापु १४**
जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: २७ डिसेंबर, २०१८

वाचा -

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्र क्र. जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा.१/३५०/११८१, दिनांक २१ मे, २००३ (परिपत्रक क्र. ८६)

२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्र. ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२२/पापु ०७, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५

३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. मुपेयो-२०१६/प्र.क्र.८३/पापु-१९, दिनांक २५ जानेवारी, २०१७

४) महसूल व वन विभाग, शासन पत्र क्रमांक एससीवाय २०१८/प्र.क्र. २५१/म-७, दिनांक २० डिसेंबर, २०१८ (बैठकीचे इतिवृत्त)

प्रस्तावना -

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणाऱ्या उपाययोजना तातडीने पूर्ण करण्यासाठी कालापव्यय कमी करण्याच्या दृष्टीने यावर्षीच्या टंचाई कालावधीत राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्विकृतीच्या अधिकारात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या प्रस्तावास मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८.१२.२०१८ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र. ८६, दिनांक २१ मे, २००३ अन्वये प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या स्वीकृतीबाबत किंमती संदर्भात टप्पे निश्चित केले आहेत. प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन पिण्याच्या पाण्याच्या टंचाई अंतर्गत मंजूर करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा उपाययोजनांच्या निविदा स्विकृतीच्या अधिकाराबाबत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| पदनाम | किंमतीचे अधिकार |
|---|---|
| कार्यकारी अभियंता | रु. ५० लाखापर्यंत |
| अधीक्षक अभियंता | रु. २०० लाखापर्यंत |
| मुख्य अभियंता | रु. ३०० लाखापर्यंत |
| सदस्य सचिव | रु. ३०० लाखापेक्षा जास्त |

२. शासन निर्णय, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ अन्वये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्वीकृतीचे अधिकार विहित केलेले आहेत. त्यानुसार रु. ५० लाख पर्यतच्या योजनांच्या निविदा स्विकृतीचे अधिकार ग्रामसभेस, रु. ५० लाख ते रु. ७.५० कोटी रकमेपर्यंतच्या योजनांसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व रु. ७.५० कोटीपेक्षा अधिकच्या खर्चाच्या योजनांसाठी निविदा समिती, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना अधिकार विहित केले आहेत.

३. प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता जिल्हा परिषदेमार्फत टंचाई अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजना व नळ योजनांची विशेष दुरुस्ती या उपाययोजनांसाठी निविदा स्विकृतीचे अधिकार पुढीलप्रमाणे राहतील.

| अ. क्र | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्विकृतीचे अधिकार (अंदाजपत्रकीय दराने प्राप्त होणा-या निविदांसाठी) | |
|---|---|---|---|
| | | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| १ | स्वतंत्र ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजना तसेच प्रादेशिक ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजना | रु. ७.५० कोटी पर्यंत | रु. ७.५० कोटीहून अधिक |

४. प्रस्तुत शासन निर्णय हा मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८.१२.२०१८ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णयान्वये घेण्यात आलेले निर्णय हे दिनांक ३०.०६.२०१९ पर्यंतच लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१२२७१०५५३९१९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

R. B. Kumatgi

Digitally signed by R. B. Kumatgi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cd6f4b2df6e461003bf3672f18f9dbab1603da, cn=R. B. Kumatgi
Date: 2018.12.27 18:12:19 +05'30'

( राजेंद्र कुमटगी )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, (मा.तं.), मंत्रालय, मुंबई
७. सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१०.जिल्हाधिकारी (सर्व)
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१२. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१३. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)

१४. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१५. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
१६. जिल्हा स्थानिक निधी लेखा परीक्षक (सर्व)
१७. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१८. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
१९. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
२०. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
२१. उप सचिव (पापु १४), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
२२. अवर सचिव (पापु १४), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय.
२३. पापु १४ (निवडनस्ती)

पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या अनुषंगाने
घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी निधी
वितरणाच्या कार्यपध्दतीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र.२१४ /पापु १४**
जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: २७ डिसेंबर, २०१८

**वाचा -**

महसूल व वन विभाग, शासन पत्र क्रमांक एससीवाय २०१८/प्र.क्र. २५१/म-७, दिनांक २० डिसेंबर, २०१८ (बैठकीचे इतिवृत्त)

**प्रस्तावना -**

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणाऱ्या उपाययोजना तातडीने पूर्ण करण्यासाठी कालापव्यय कमी करण्याच्या दृष्टीने शासनाकडून वितरित करण्यात येणाऱ्या निधीच्या वाटपाबाबत कार्यपध्दतीमध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या प्रस्तावास मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८.१२.२०१८ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

टंचाई अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध पाणी पुरवठा उपाययोजनांसाठी महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) यांच्याकडून प्राप्त होणारा निधी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत विभागीय आयुक्त यांना वितरित करण्यात येतो. विभागीय आयुक्त यांच्याकडून जिल्हाधिकारी यांना निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर संबंधित जिल्हा परिषदा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नागरी योजनांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त अथवा मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती यांना उपलब्ध करुन दिला जातो.

२. पुढील कालावधीत टंचाई अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध पाणी पुरवठा उपाययोजनांसाठी महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) यांच्याकडून प्राप्त होणारा निधी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत विभागीय आयुक्त यांना वितरित करण्यात येईल. विभागीय आयुक्त यांनी जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना संदर्भातील निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना वितरित करावा. तसेच नागरी योजनांबाबत राबविण्यात येणा-या उपाययोजनांसाठीचा निधी विभागीय आयुक्त यांनी महापालिका आयुक्त, नगरपालिका/ नगरपरिषद मुख्याधिकारी, यांना वितरित करण्यात यावा.

३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यामार्फत राबविण्यात येणा-या उपाययोजनांसाठीचा निधी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना वितरीत करण्यात यावा.

४. टंचाई अंतर्गत घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांकरिता निधीची मागणी जिल्हा परिषदा, आयुक्त महानगरपालिका अथवा मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे नोंदवावी. निधीची मागणी करताना संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांना या पूर्वी प्राप्त झालेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्याकडे शिल्लक असलेल्या निधीची माहितीही देणे आवश्यक आहे. विभागीय आयुक्त यांनी अखत्यारितील जिल्हयासंदर्भात एकत्रित उपयोगिता प्रमाणपत्र विभागीय आयुक्त यांच्या स्वाक्षरीने तातडीने शासनास सादर करावे.

५. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा उपाययोजनांच्या बाबतीत निधीची मागणी संबंधित कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत शासनास सादर करावी. तसेच सदर निधीची मागणी करताना टंचाई अंतर्गत प्राप्त निधीची उपयोगिता प्रमाणपत्र व शिल्लक असलेल्या निधीची माहिती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या स्वाक्षरीने देणे आवश्यक आहे.

६. प्रस्तुत शासन निर्णय हा मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमितीच्या दिनांक १८.१२.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१२२७१०५९३८१८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

R. B. Kumatgi

Digitally signed by R. B. Kumatgi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD Department, postalCode=400032, st=Maharashtra,
Date: 2018.12.27 18:08:55 +05'30'

(राजेंद्र कुमटगी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, (मा.तं.), मंत्रालय, मुंबई
७. सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१०. जिल्हाधिकारी (सर्व)
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१२. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१३. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१४. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१५. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
१६. जिल्हा स्थानिक निधी लेखा परीक्षक (सर्व)
१७. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१८. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
१९. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
२०. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
२१. उप सचिव (पापु १४), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
२२. अवर सचिव (पापु १४), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय.
२३. पापु १४ (निवडनस्ती)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

## सन १९८३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०

# महाराष्ट्र पिण्याच्या पाणीपुरवठ्याचे अधिग्रहण करण्याबाबत अधिनियम, १९८३

( दिनांक ६ जुलै, २००६ पर्यंत सुधारित )

## Maharashtra Act No. XX of 1983

# The Maharashtra Drinking Water Supply Requisition Act, 1983

*( As modified upto 6th July 2006 )*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : रु. ४.०० ]

# महाराष्ट्र पिण्याच्या पाणीपुरवठ्याचे अधिग्रहण करण्याबाबत अधिनियम, १९८३

(दिनांक ६ जुलै २००६ पर्यंत सुधारित)

## अनुक्रमणिका


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| | उद्देशिका | |
| | कलमे | |
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ. | १ |
| २. | व्याख्या. | १ |
| ३. | टंचाईच्या काळात जनतेला कोणत्याही विहिरीतून पिण्याकरिता पाणीपुरवठा करण्याचा आदेश देण्याचा अधिकार. | २ |
| ४. | कोणत्याही विहिरीतून पाणीपुरवठा करण्याचा आदेश काढण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे. | २ |
| ५. | कोणत्याही विहिरीतून पाणी पुरविण्यात यावे किंवा कसे हे ठरविण्यासाठी माहिती मिळविण्याचा व कोणत्याही जमिनीत प्रवेश करण्याचा अधिकार | ३ |
| ६. | पाणीपुरवठा करण्याचा आदेश जेव्हा देण्यात येईल तेव्हा अशा पाणीपुरवठ्यासाठी जमिनीत प्रवेश करण्याचा हक्क. | ३ |
| ७. | पाणीपुरवठ्याचा आदेश देण्यात येईल तेव्हा उपकरणे किंवा यंत्रसामग्री किंवा पाण्याचे नळ पुरविण्याचे अधिकार | ४ |
| ८. | मालकाला त्याच्या विहिरीतील पाण्याचा वापर करण्याबद्दल द्यावयाची रक्कम. | ४ |
| ९. | अपिले. | ५ |
| १०. | या अधिनियमान्वये केलेल्या कार्यवाहीस संरक्षण. | ५ |
| ११. | नियम करण्याचा अधिकार. | ५ |
| १२. | सूट. | ६ |
| १३. | सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश ५ याचे निरसन व व्यावृत्ती | ६ |
| १४. | अडचणी दूर करणे. | ६ |


(शा.म.मु.) एच १५७५ (६,०६७---११-०६)

# सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०[१]

## (महाराष्ट्र पिण्याच्या पाणीपुरवठ्याचे अधिग्रहण करण्याबाबत अधिनियम, १९८३)

[ राष्ट्रपती यांची दिनांक १३ एप्रिल, १९८३ रोजी संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण, भाग चार मध्ये दिनांक १५ एप्रिल, १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

या अधिनियमात पुढील अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५. @ (२०-१-१९९२)†

**टंचाईच्या काळात कोणत्याही विहिरीमधून, तलावातून आणि जलशयातून पिण्याकरिता पाणीपुरवठ्याचे अधिग्रहण करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** टंचाईच्या काळात, कोणत्याही विहिरीमधून, तलावातून किंवा अन्य जलाशयातून पिण्याकरिता पाणीपुरवठ्याचे अधिग्रहण करण्याची तरतूद करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींची तरतूद करण्याकरता एक विशेष कायदा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे ज्यामुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची
१९८३ चा महा. अध्या. ५. खात्री होती ; व म्हणून त्यांनी, महाराष्ट्र पिण्याच्या पाणीपुरवठ्याचे अधिग्रहण करण्याबाबत अध्यादेश, १९८३ हा, दिनांक २६ फेब्रुवारी, १९८३ रोजी प्रख्यापित केला ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे आता, राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौतिसाव्या वर्षी याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र पिण्याच्या पाणीपुरवठ्याचे अधिग्रहण करण्याबाबत अधिनियम, १९८३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, दिनांक २६ फेब्रुवारी, १९८३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात— व्याख्या.

(क) " विहिरीचा मालक " या शब्दप्रयोगात विहिरीचा प्रत्यक्ष कब्जा जिच्याकडे असेल त्या व्यक्तीचा समावेश होतो ;

(ख) " विहीर " या संज्ञेत, विंधण विहीर किंवा तलाव किंवा कोणताही जलाशय यांचा समावेश होतो.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण) दिनांक १० मार्च, १९८३ , भाग आठ. पृष्ठे ४७ ते ५६ पहा.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

@ सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ३ द्वारे सन १९९२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ निरसित करण्यात आला.

एच १५७५—१अ

**टंचाईच्या काळात जनतेला कोणत्याही विहिरीतून पिण्याकरिता पाणीपुरवठा करण्याचा आदेश देण्याचा अधिकार.**

३. (१) जर जिल्हाधिकाऱ्यांची किंवा जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांची (यात यापुढे ज्याचा निर्देश " अधिग्रहण प्राधिकारी " असा करण्यात आला आहे), त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशी खात्री होईल की, कोणत्याही स्थानिक क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्यामुळे कालव्याच्या सिंचनक्षेत्रात असलेल्या कोणत्याही जमिनीतील किंवा कोणत्याही अन्य जमिनीतील कोणत्याही विहिरीचे जलसिंचनासाठी किंवा कोणत्याही अन्य प्रयोजनासाठी वापरले जाणारे पाणी जनतेकडून तात्पुरते पिण्याच्या प्रयोजनाकरिता संपूर्णतः किंवा अंशतः वापरले जाणे आवश्यक किंवा इष्ट आहे तर, अधिग्रहण प्राधिकाऱ्याने, अधिग्रहण प्राधिकाऱ्याला किंवा त्याच्या अभिकर्त्यांना किंवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अन्य व्यक्तींना किंवा व्यक्तींच्या वर्गांना त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून व अशा वेळेत व मुदतीत आणि अशा रीतीने विनिर्दिष्ट करण्यात येईल तितके पाणी पुरविण्यास किंवा पुरविण्याची व्यवस्था करण्यास किंवा ते काढण्याची किंवा त्याचा उपसा करण्याची मुभा देण्यास विहिरीच्या मालकाला लेखी आदेशाद्वारे वेळोवेळी फर्मांविले पाहिजे.

(२) या कलमान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशात अधिग्रहण प्राधिकाऱ्याकडून सुधारणा केली जाऊ शकेल आणि कोणत्याही वेळी तो त्याच्याकडून रद्द केला जाऊ शकेल.

(३) (क) या कलमान्वये काढलेला कोणताही आदेश, जर विहिरीचा मालक ही एक व्यक्ती असेल तर,—

(एक) तो आदेश तिच्या स्वाधीन करून किंवा तिला तो देऊन ; किंवा

(दोन) जर ती व्यक्ती सापडत नसेल तर, तिच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ व्यक्तीकडे त्या आदेशाची एक अधिप्रमाणित प्रत देऊन ; किंवा

(तीन) डाकेने

बजावला पाहिजे.

ज्याचा महामंडळावर किंवा व्यवसाय संस्थेवर परिणाम होत असेल अशा आदेशाच्या बाबतीत, १९०८
तो दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या पहिल्या अनुसूचीतील यथास्थिति नियमावली २९ च्या, चा ५.
नियम २ मधील किंवा नियमावली ३० च्या नियम ३ मधील समन्स बजावण्याच्या रीतीने बजावला पाहिजे.

(ख) अधिग्रहण अधिकाऱ्याने त्याच्यां मते आदेशान्वये ज्यांना विनामूल्य पाणी उपलब्ध करून देण्यात येईल त्या व्यक्तींच्या निदर्शनास तो ज्या उत्तम रीतीने येईल त्या रीतीने उक्त आदेशास स्थानिक क्षेत्रात व्यापक प्रसिद्धी दिली पाहिजे.

(४) त्यावेळी अंमलात असलेल्या या कलमान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन करण्यास नकार देणाऱ्या किंवा त्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अपराध सिद्ध झाल्यानंतर एक वर्षापर्यंत असू शकेल इतकी कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतकी द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**कोणत्याही विहिरीतून पाणीपुरवठा करण्याचा आदेश काढण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे.**

४. कलम ३ अन्वये कोणताही आदेश काढण्याच्या प्रयोजनासठी, अधिग्रहण प्राधिकाऱ्याने, विवक्षित मुदतीत विहिरीत उपलब्ध असलेला किंवा उपलब्ध होण्याची शक्यता असलेला एकूण पाणीपुरवठा, मालकाची त्या काळातील त्याला स्वतःला पिण्याकरिता, सिंचनाकरिता किंवा अन्य प्रयोजनाकरिता असलेली किमान गरज आणि जेथे पिण्याच्या पाण्याची टंचाई असेल त्या स्थानिक क्षेत्रात राहणाऱ्या लोकांना वाटून देण्याकरता म्हणून वाजवीरीत्या किती पाणी देता येईल, या गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत.

**कोणत्याही विहिरीतून पाणीपुरवण्यात यावे किंवा कसे हे ठरविण्यासाठी माहिती. मिळवण्याचा व कोणत्याही जमिनीत प्रवेश करण्याचा अधिकार.**

५. (१) अधिग्रहण प्राधिकाऱ्यास कलम ३ खालील आदेश काढण्यात किंवा चालू ठेवण्यात यावा किंवा कसे हे ठरविण्याच्या दृष्टीने, कोणत्याही विहिरीच्या मालकास, ती विहीर ज्या जमिनीत असेल त्या जमिनीसंबंधीची आणि त्या विहिरीतून किती पाणीपुरवठा होऊ शकेल यासंबंधीची त्याच्याकडे असलेली, निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येत अशी माहिती आणि गेल्या काही वर्षात त्याने त्या विहिरीचा कोणत्याही प्रयोजनासाठी व किती प्रमाणात वापर केला होता ती माहिती, अधिग्रहण प्राधिकाऱ्याला सादर करण्यासंबंधी निदेश देता येईल. ही माहिती, निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत सादर केली पाहिजे.

(२) अधिग्रहण प्राधिकाऱ्यास, कोणत्याही विहिरीच्या मालकास वाजवी नोटीस दिल्यानंतर, अशा कोणत्याही जमिनीत, आवश्यक वाटतील अशा सहकाऱ्यांसह व कामगारांसह प्रवेश करता येईल आणि कलम ३ खाली आदेश काढण्यात किंवा चालू ठेवण्यास यावा किंवा कसे आणि कोणत्या रीतीने व कोणत्या शर्तीस अधीन राहून, असा आदेश काढण्यात यावा, हे ठरविण्याच्या दृष्टीने तपासणी व सर्वेक्षण करता येईल. या प्रयोजनासाठी, अधिग्रहण प्राधिकाऱ्यास, मालकास, अशा तपासणीच्या व सर्वेक्षणाच्या वेळी उपस्थित राहण्यास सांगता येईल आणि उपस्थित असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, आवश्यक ते सर्व प्रश्न विचारता येतील, मालकाच्या मालकीच्या कोणत्याही उपकरणांचा वा यंत्रसामग्रीचा वापर करता येईल आणि आवश्यक ती माहिती गोळा करण्यासाठी आवश्यक त्या अन्य सर्व गोष्टी करता येतील.

(३) जो कोणी, या कलमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे अनुपालन करण्यास नकार देईल किंवा त्या निदेशाचे उल्लंघन करील किंवा या कलमान्वये अधिग्रहण प्राधिकाऱ्याला किंवा त्याच्या सहायकांना किंवा कामगारांना दिलेल्या कोणत्याही अधिकाराचा कायदेशीर वापर करण्यात आडकाठी करील, त्यास, अपराध सिद्धझाल्यानंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**पाणीपुरवठा करण्याचा आदेश जेव्हा देण्यात येईल तेव्हा, अशा पाणीपुरवठ्यासाठी जमिनीत प्रवेश करण्याचा हक्क.**

६. (१) ज्या ज्या वेळी, कोणत्याही विहिरीतून पाणीपुरवठा करण्यासाठी, कलम ३ अन्वये आदेश काढण्यात येईल त्यावेळी, अधिग्रहण प्राधिकारी आणि त्याने त्या संदर्भात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्ती, यांना पाणीपुरवठा नियमित मिळविण्यासाठी व मंजूर पाणीपुरवठ्याचे वाटप करण्याच्या व्यवस्थेवर देखरेख व त्याचे नियमन करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा अशा पाणीपुरवठ्याशी संबंधित अशा अन्य कोणत्याही कामासाठी त्या जमिनीत वाजवी वेळेत, प्रवेश करण्याचा हक्क असेल, आणि अधिग्रहण प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींना किंवा व्यक्तींच्या वर्गांना अधिग्रहण प्राधिकारी लादील अशा शर्तीस अधीन राहून, लगतच्या जमिनीतून ये-जा करण्यास प्राधिकृत केल्याचे आणि विहीर ज्या जमिनीत असेल त्या जमिनीत, मालकाच्या मालकीच्या किंवा अधिग्रहण प्राधिकाऱ्यांच्या मालकीच्या असलेल्या कोणत्याही उपकरणाचा किंवा यंत्रसामग्रीचा पाणी काढण्याकरिता किंवा पाण्याचा उपसा करण्याकरिता वापर करण्यास प्राधिकृत केल्याचे आणि अधिग्रहण प्राधिकाऱ्याने त्यांना वेळोवेळी मंजूर केलेले पाणी घेण्यास प्राधिकृत केल्याचे समजण्यात येईल.

(२) या अधिनियमान्वये कोणत्याही परिमाणात पाणी घेणारी किंवा पाणी घेण्याचा प्राधिकार असलेली कोणतीही व्यक्ती, जर या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे किंवा त्याखाली लादलेल्या कोणत्याही शर्तीचे पालन करण्यास नकार देईल किंवा तरतुदीचे उल्लंघन करील तर, तिला, अपराध सिद्धझाल्यानंतर शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

पाणीपुरवठ्याचा आदेश देण्यात येईल तेव्हा, उपकरणे किंवा यंत्रसामग्री किंवा पाण्याचे नळ पुरविण्याचे अधिकार.

७. (१) जेव्हा कोणत्याही विहिरीतून पाणीपुरवठा करण्यासंबंधी कलम ३ अन्वये आदेश काढण्यात येईल तेव्हा, अधिग्रहण प्राधिकाऱ्याने आणि त्याने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तींनी, विहिरीवर किंवा विहिरीजवळ, पाणी काढण्याकरिता किंवा ते उपसण्याकरिता किंवा ते मोजण्याकरिता कोणतेही उपकरण किंवा यंत्रसामग्री बसविणे आणि संबंधित जमिनीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला तसे करण्याचा आपला उद्देश कळवणारी वाजवी नोटीस दिल्यानंतर, त्या जमिनीत प्रवेश करणे आणि विहिरीतील पाणी अधिग्रहण प्राधिकाऱ्यांनी निवडलेल्या वितरण केंद्राकडे किंवा केंद्रांकडे नेण्यासाठी म्हणून अशा जमिनीमधून, जमिनीवरून किंवा जमिनीखालून पाण्याचे नळ टाकण्याकरिता व वेळोवेळी अशा उपकरणाच्या, यंत्रसामग्रीच्या किंवा पाण्याच्या नळांच्या दुरुस्तीकरिता किंवा ते बदलण्यासाठी आवश्यक ती सर्व कामे पार पाडणे, हे कायदेशीर असेल.

(२) या कलमान्वये शक्य तेवढे कमीत कमी नुकसान होईल अशा रीतीने कोणतेही काम पार पाडले पाहिजे आणि—

(क) ते काम शक्य तेवढ्या कमीत कमी वेळात केले पाहिजे ;

(ख) ते काम करण्यासाठी जमीन खणण्यात आली असेल किंवा कोणत्याही बांधकामाचा भाग तोडण्यात किंवा काढण्यात आला असेल तर, अधिग्रहण प्राधिकाऱ्याने कमीत कमी वेळात ती जमीन भरून दिली पाहिजे व ते बांधकाम पूर्ववत किंवा दुरुस्त करून दिले पाहिजे.

(ग) कोणत्याही जमिनीचा कोणताही मालक किंवा भोगवटादार याने जर, त्या कामामुळे त्याचे बरेच नुकसान झाल्याचा दावा केला असेल व अधिग्रहण प्राधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने ते सिद्ध केले तर त्याला, अधिग्रहण प्राधिकारी आदेशाद्वारे ठरवील इतकी रक्कम दिली पाहिजे.

(३) अधिग्रहण प्राधिकाऱ्याने, पोट-कलम (२), खंड (ग) अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, तिला आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, तो आदेश जर जिल्हाधिकाऱ्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही अधिग्रहण प्राधिकाऱ्यांनी काढला असेल तर, जिल्हाधिकाऱ्याकडे आणि जर तो आदेश जिल्हाधिकाऱ्याने काढला असेल तर, आयुक्ताकडे अपील करता येईल आणि कलम ९ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह अशा अपिलास लागू होतील.

(४) जो कोणी, अधिग्रहण प्राधिकाऱ्याला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तींना, या कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा कायदेशीर वापर करण्यास आडकाठी करील, त्यास अपराध सिद्धझाल्यानंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

मालकाला त्याच्या विहिरीतील पाण्याचा वापर करण्याबद्दल द्यावयाची रक्कम.

८. [1][ कलम ३ अन्वये कोणत्याही विहिरीतून पाणीपुरवठा करण्याचा आदेश देण्यात येईल तेव्हा, त्या आदेशाचे अनुपालन करणाऱ्या मालकाला, तो मालक व अधिग्रहण करणारे प्राधिकरण यांच्यातील कराराद्वारे निश्चित करण्यात येईल अशी रक्कम देण्यात येईल :

परंतु, अशी रक्कम, याबाबतीत काढण्यात येईल अशा आदेशाद्वारे, राज्य शासन, वेळोवेळी, निश्चित करील अशा कमाल मर्यादेहून अधिक होणार नाही.]

[1] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

९. (१) विहिरीच्या मालकाला, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळांमध्ये व अशा मुदतीमध्ये, त्याच्या विहिरीमधून आवश्यक तेवढा पाण्याचा पुरवठा करण्यास भाग पाडणारा आदेश कलम ३ अन्वये देण्यात येईल त्या बाबतीत, आदेशातील कोणत्याही गोष्टीमुळे व्यथित झालेल्या मालकास, त्याला आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत, जिल्हाधिकाऱ्याव्यतिरिक्त कोणत्याही अधिग्रहण प्राधिकाऱ्याने आदेश दिला असेल तर जिल्हाधिकाऱ्याकडे व जिल्हाधिकाऱ्याने आदेश दिला असेल तर, आयुक्ताकडे, अपील करता येईल. असे अपील मिळाल्यावर, अपील प्राधिकाऱ्याने अपिलकारास त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असा आदेश दिला पाहिजे. अपील प्राधिकाऱ्याने दिलेला प्रत्येक आदेश अंतिम असेल व त्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही. अपिले.

(२) पोट-कलम (१) मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याशिवाय, या अधिनियमाद्वारे दिलेला प्रत्येक आदेश व निदेश हा, अंतिम असेल व त्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही.

१०. (१) या अधिनियमान्वये किंवा त्या अन्वये दिलेला कोणत्याही आदेशानुसार किंवा कोणत्याही निदेशानुसार सद्भावनेने केलेल्या किंवा सद्भावनेने केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. या अधिनियमान्वये केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

(२) या अधिनियमान्वये किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशानुसार किंवा काढलेल्या कोणत्याही निदेशानुसार सद्भावनेने केलेल्या किंवा सद्भावनेने केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, झालेल्या किंवा होण्याची शक्यता असलेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल राज्य शासनाविरुद्ध किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कोणत्याही अधिग्रहण प्राधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

११. (१) पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन, राहून राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमाद्वारे पुढील गोष्टींची तरतूद करता येईल :—

(क) ज्यांना पाणीपुरवठा मिळविण्याची इच्छा आहे अशा व्यक्तींची नावे व पत्ते नोंदण्यासाठी किंवा त्यांना पास अथवा तिकीटे देण्यासाठी तरतूद करणे ;

(ख) प्रत्येक व्यक्तीला किंवा प्रत्येक कुटुंबाला स्वतःसाठी व शक्य झाल्यास आपल्या गुरांसाठी किती पाणी मिळविता येईल ते परिमाण ठरविणे ;

(ग) पाण्याचा पुरवठा केव्हा घ्यावयाचा त्या वेळा विनिर्दिष्ट करणे ;

(घ) पाणीपुरवठा घेणाऱ्या व्यक्तींनी आणि ज्यांच्या विहिरीतून असा पुरवठा घेतला जाईल अशा मालकांनी पाळावयाच्या शर्ती विहित करणे ;

(ङ) अधिग्रहण प्राधिकारी व विहिरीचे मालक यांनी ठेवावयाचे अभिलेख विहित करणे ;

(च) विहिरींच्या मालकांना त्यांच्या विहिरीमधून घेतलेल्या पाणीपुरवठ्याबद्दल करावयाची प्रदाने ठरविण्याची व ती प्रदान करण्याची रीत ;

(छ) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, पाणीपुरवठा मिळविणे व त्याचे वाटप यांच्याशी संबंधित इतर कोणत्याही बाबी.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून, यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येतील किंवा येणार नाहीत. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

सूट १२. हा अधिनियम, शासन किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा केवळ धार्मिक प्रयोजनासाठी असलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था यांच्या मालकीच्या किंवा ताब्यातील विहिरींना लागू होणार नाही.

सन १९८३ चा महा. अध्यादेश ५ याचे निरसन व व्यावृत्ती. १३. (१) महाराष्ट्र पिण्याच्या पाणीपुरवठ्याचे अधिग्रहण करण्याबाबत अध्यादेश, १९८३ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८३ चा महा. अध्या. ५.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, (काढलेली अधिसूचना किंवा आदेश यांसह) या अधिनियमाच्या संबंधित तरतुदीद्वारे करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

अडचणी दूर करणे. १४. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवली तर, राज्य शासनास, प्रसंगपरत्वे, ती अडचण दूर करण्यासाठी आवश्यक व इष्ट वाटेल अशी कोणतीही गोष्ट लेखी आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी लोटल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई